
# पेसा क्षेत्रातील महिला सभांची सद्यस्थिती






बाळकापरा या ठिकाणी महिला सभा



रामनगर येथील महिलांची पाणी प्रश्नावर सभा



जरूर खेडी या ठिकाणी २६ जानेवारीची ग्रामसभा

# पेसा क्षेत्रातील महिला सभांची सद्यस्थिती

## अभ्यासप्रकल्पाचा अहवाल

### इकोनेट संस्थेने २०१९-२०२० मध्ये केलेल्या अभ्यासावर आधारित अहवाल

**इकोनेट**
गुलमोहर रिट्रीट, R-II, S.No. १४-६, फातीमानगर, वानवडी,
पुणे : ४११ ०४०, महाराष्ट्र. फोन : (+९१) ७४२००२७७५५,
Email: econet.pune@gmail.com, Website: www.econetindia.org

# पेसा क्षेत्रातील महिला सभांची सद्यस्थिती

| | |
|---|---|
| **अभ्यासप्रकल्प** | पेसा क्षेत्रातील महिला सभांची सद्यस्थिती |
| **संकल्पना** | गौरी भोपटकर |
| **संशोधन** | अमृता वाळिंबे<br>अमित नारकर<br>लिंगनगौडा पाटील |
| **सर्वेक्षण** | विनय कोळी<br>जगदीश आत्राम<br>जीवन मडिवाळ<br>शरद भंडारी |
| **छायाचित्र आणि मुखपृष्ठ** | राहुल साळवी |
| **संशोधन पद्धती मार्गदर्शक** | डॉ. संजीवनी मुळ्ये |
| **विशेष आभार** | सुरेखा दळवी<br>भीम रासकर<br>ब्रायन लोबो<br>साधना वैराळे<br>अमोल वाघमारे<br>इंदवी तुळपुळे<br>दत्तात्रय गुरव<br>मानसी सदणे<br>मिलिंद थत्ते<br>अमित कुलकर्णी (पांढरकवडा-किनवट)<br>बन्सी परते (धारणी)<br>भाऊ गडगे (जव्हार) |

हिरामण खतेले (इगतपुरी)
डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट
महिला राजसत्ता आंदोलन
रिसोर्स ॲण्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट
आदिम संस्कृती अभ्यास संशोधन व मानव विकास केंद्र
परिमल सिंग
सुनील पाटील
गजानन देशमुख
संजय काळे
श्री. चिंतावार
श्री. उडतेवार
श्री. श्रीमनवार
देवेंद्र गायन

**शासकीय कार्यालये** आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
गटविकास कार्यालय, किनवट, जि. नांदेड
गटविकास कार्यालय, धारणी, जि. अमरावती
ग्रामपंचायत, जवरला, ता. किनवट, जि, नांदेड
ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच व ग्रामकोष समिती सदस्य
घोटी, ता. किनवट, जि. नांदेड
जवरला, ता. किनवट, जि. नांदेड
भावली, ता. इगतपुरी, जि. नाशिक

**संशोधन आणि प्रकाशन साह्य** मिझेरीओर, जर्मनी.

**छपाई** क्रिएटर्स, पुणे.

# ऋणनिर्देश

या अभ्यासात अनेक व्यक्तींचा सहभाग मिळाला आहे आणि आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. या अभ्यासाच्या अनुषंघाने समोर आलेल्या माहितीचा व सूचनांचा वापर करून पुढील काळात महिला ग्रामसभा सक्षमीकरण आणि त्याद्वारे आदिवासी महिलेना शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्याच्या दृष्टीने खूप उपयोग करता येईल.

वास्तविक पाहता या अभ्यासात समाविष्ट झालेल्या सर्व गावाचे/पाड्याचे/बेड्यांचे वैयक्तिकरित्या आभार मानणे शक्य नाही. तरीसुद्धा अभ्यासात समाविष्ट झालेल्या त्या सर्व गावाचे/पाड्याचे/बेड्यांचे, व्यक्तींचे, सरकारी अधिकाऱ्यांचे आणि शासकीय व निमशासकीय संस्थांचे मनापासून आभार.

तसेच या कामात श्री. अमित नारकर आणि त्याची टीम यांनी ज्या रचनात्मक पद्धतीने सर्व माहितीचे संकलन करून अतिशय कल्पकतेने त्या माहितीचे विश्लेषण करून आपल्या सूचना आम्हाला दिल्याबद्दल श्री. अमित नारकर आणि त्यांच्या सर्व टीमचे सुद्धा आम्ही मनापासून आभार मानतो.

सर्वात शेवटी पण महत्वाचे कार्यक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आमच्या सर्व क्षेत्र सहभागी व्यक्ती/समन्वयक आणि संस्था त्याचबरोबर इकोनेट टीम या सर्वांचेही आभार. या सर्वांनी या कामासाठी दिलेले योगदान व समर्पण हे खूप मोलाचे आहे.

**इकोनेट, पुणे.**

# पेसा क्षेत्रातील महिला सभांची सद्यस्थिती

**अनुक्रमणिका**


| | | |
|---|---|---|
| १. | सारांश | ०६ |
| २. | महिला सभाः पार्श्वभूमी | १३ |
| ३. | प्रकल्पक्षेत्राविषयी | २२ |
| ४. | संशोधन पद्धती | ३८ |
| ५. | आदिवासी समाज व महिला सभा | ४५ |
| ६. | सर्वेक्षणातील आकडे काय सांगतात | ४९ |
| ७. | निष्कर्ष, सूचना व शिफारसी | ५६ |
| ८. | केस स्टोरीज | ६५ |
| ९. | परिशिष्टे व संदर्भ | ६९ |

# सारांश

भारतात फार पूर्वीपासून गावचा कारभार गावातल्या लोकांनी करण्याची परंपरा आहे. पूर्वी गावागावांमध्ये गावसभा होत असत. ब्रिटीश राज्यात मात्र ही प्राचीन स्वायत्त ग्रामीण व्यवस्था खऱ्या अर्थाने उद्ध्वस्त झाली. इंग्रजांच्या काळात दुसरीकडे, दळणवळणाच्या सोयी वाढल्या. वस्तू व सेवा उत्पन्नाचे केंद्रित उद्योगधंदे शहरात वाढू लागले आणि त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीपूरक असे सर्व ग्रामीण उद्योग व कारागिरीचे व्यवसाय मोडून पडले. गावांचं 'उत्पादन केंद्र' हे स्वरूप नष्ट झालं. या काळात इथल्या ग्रामीण समाजाची स्वायत्त स्वयंपूर्ण आर्थिक व्यवस्था नष्ट होऊन त्या जागी नवीन वसाहतवादी अर्थव्यवस्था रूढ होऊ लागली. स्वायत्त स्वयंपूर्ण ग्रामराज्य चालवणारी प्राचीन ग्रामीण व्यवस्था मोडून पडली. स्वच्छता आणि पाणीपुरवठा संस्था १८६९ पासून सुरू झाल्या असल्या तरी १८८२ च्या लॉर्ड रिपन यांच्या ठरावाने इंग्रजी पद्धतीच्या 'स्थानिक स्वराज्य संस्था' खऱ्या अर्थाने सुरू झाल्या असं मानलं जातं.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. घटनेने गावाच्या विकासाचं काम राज्य सरकारवर सोपवलं. गावाच्या विकासाकरता ग्रामपंचायती स्थापन कराव्यात व ग्रामपंचायतींना स्थानिक सरकार म्हणून काम करून गावाची प्रगती करता येईल असे कायदे करावेत अशा सूचना राज्य सरकारांना दिल्या गेल्या. या सूचनांप्रमाणे त्यावेळच्या मुंबई सरकारने १९५८ साली ग्रामपंचायतींचा कायदा केला. 'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८' या नावाने हा कायदा ओळखला जातो. १९५८ च्या या अधिनियमाने प्रत्येक पंचायतीत 'ग्रामसभा' निर्माण केल्या गेल्या.

१९५८ च्या कायद्यानंतर पुढचा टप्पा आला जेव्हा बलवंतराय मेहता समितीने पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पार्श्वभूमीवर आपला अहवाल सादर केला. बलवंतराय मेहता समितीने विकेंद्रीकरणावर भर देत 'राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम गावपातळीवर लोकसहभागाने यशस्वीरित्या राबवायचे असतील तर लोकशाहीचे व सत्तेचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे' अशी शिफारस केली होती. त्यासाठी त्यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय योजना सादर केली. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद विकास गट, तालुका स्तरावर पंचायत समित्या आणि ग्रामस्तरावर ग्रामपंचायतींचा कारभार २ मे १९६२ पासून सुरू होऊन लोकशाही विकेंद्रीकरणाद्वारे ग्रामीण लोकांच्या हातात सत्ता सोपवण्याच्या या प्रयोगाला महाराष्ट्रात सुरुवात झाली. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे मात्र यापुढचं पाऊल

टाकलं गेलं. लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया, निर्णयप्रक्रियेतील 'सर्वांचा' सहभाग आणि ग्रामसभेचं महत्त्व विशेष अधोरेखित करत ७३ व्या घटनादुरुस्तीने त्यास घटनात्मक दर्जा देऊ केला. या घटनादुरुस्तीद्वारे 'पंचायत राज' या संकल्पनेचा समावेश घटनेच्या नवव्या प्रकरणात आणि २४३ व्या कलमात केला गेला.

याखेरीज १९९६ साली शासकीय स्तरावर आणखी एक मूलभूत व महत्त्वपूर्ण पाऊल टाकलं गेलं. देशातील आदिवासींना स्वशासनाचा अधिकार देणारा पेसा कायदा १९९६ साली देशपातळीवर संमत करण्यात आला. त्यापाठोपाठ १९९७ मध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणा करण्यात आल्या.

अनुसूचित जाती–जमाती यांच्यासोबतच लोकसंख्येतील अर्धा हिस्सा असलेल्या महिलांचा निर्णयप्रक्रियेतला सहभाग व हस्तक्षेप वाढावा म्हणूनही ७३ व्या घटनादुरुस्तीने ज्या सूचना केल्या त्याही विशेष महत्त्वाच्या ठरल्या आहेत.

७३ वी घटनादुरुस्ती, पंचायतराज व्यवस्थेचं सक्षमीकरण आणि महिला आरक्षण अशा महत्वपूर्ण टप्प्यांच्या जोरावर जनआंदोलनांनी आणि जनवकालतीने रेटा लावला. या रेट्यामुळे मधल्या काळात २००२ साली प्रत्येक ग्रामसभेच्या आधी 'महिला सभा' घेतली जाण्याबाबत जी अधिसूचना महाराष्ट्र शासनाने काढली. गावपातळीवरच्या आरक्षणाच्या जोरावर, पदांच्या जोरावर महिलांनी गावाच्या विकास कार्यक्रमात फक्त निर्णयापुरतं मर्यादित राहू नये, तर संपूर्ण निर्णय प्रक्रियेमध्ये पुढे असावं आणि त्यांची निर्णय प्रक्रियेतील क्षमता वाढावी या हेतूने २००२ साली महिला सभेची संकल्पना लागू करण्यात आली.

या विशेष तरतुदींमुळे गावाच्या प्रश्नांवर बोलण्यासाठी सर्वसामान्य महिलेला स्वतंत्र व्यासपीठ तयार झालं.

**प्रकल्पक्षेत्राविषयी**

सदरच्या अभ्यासामध्ये प्रत्यक्ष माहिती मिळवण्यासाठी क्षेत्र निवडताना आदिवासींची मोठी संख्या असणाऱ्या राज्याच्या सर्व प्रमुख विभागांचं प्रतिनिधित्व असावं, हे सूत्र समोर ठेवलं होतं. त्यानुसार पुढील ठिकाणी सर्वेक्षण व प्राथमिक स्रोतांमधून माहिती मिळवण्याचं काम करण्यात आलं. कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या चार विभागातील प्रत्येकी एक असे चार जिल्हे, प्रत्येक जिल्ह्यातील एक असे चार तालुके व या तालुक्यांमधील एकूण १८ ग्रामपंचायतींमधील एकूण ३३ गावं/पाडे/वाड्या/वस्त्या या अभ्यासासाठी निवडण्यात आल्या होत्या. एका मर्यादित अर्थाने, हा महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्राबाबतचा प्रातिनिधिक अभ्यास आहे, असं म्हणायला हरकत नाही. पेसा क्षेत्रातील ग्रामसभांमधला महिलांचा सहभाग व महिला सभांची वस्तुस्थिती समजून घेण्याच्या मुख्य उद्देशाने या क्षेत्रामध्ये पाहणी करून माहिती मिळवण्यात आली. पण यापलीकडे, या क्षेत्रातील आदिवासी विकास व शासनव्यवहाराबाबतची परिस्थिती समजून घेण्यासाठी व्यापक सामाजिक–आर्थिक माहितीही मिळवण्यात आली. त्यातून या क्षेत्रामधील सामाजिक–राजकीय–आर्थिक विकासाची परिस्थिती समजून येते.

**संशोधन पद्धती**

महाराष्ट्रातील वंचित समूहांसाठी काम करणाऱ्या इकोनेट संस्थेला पेसा क्षेत्रातील ग्रामसभांमधील महिलांचा सहभाग

आणि महिला सभा या संदर्भाने काम करण्याची गरज जाणवत होती. कामाची नेमकी दिशा ठरवण्यासाठी या विषयावर अभ्यास करण्याची कल्पना समोर आली. त्यादृष्टीने आपल्या कार्यक्षेत्रातील विशिष्ट ग्रामपंचायत क्षेत्र इकोनेटने अभ्यासासाठी निवडलं. त्या विशिष्ट क्षेत्रात हा अभ्यास करण्यात आला. अर्थात एका मर्यादित अर्थाने, हा महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्राबाबतचा प्रातिनिधिक अभ्यास आहे, असं म्हणायला हरकत नाही. पेसा क्षेत्रातील ग्रामसभांमधील महिलांचा सहभाग आणि महिला सभा याबाबतचं वास्तव समजून घेण्याच्या मुख्य उद्देशाने या क्षेत्रामध्ये पाहणी करून माहिती मिळवण्यात आली. पण यापलीकडे, या क्षेत्रातील आदिवासी विकास व शासनव्यवहाराबाबतची परिस्थिती समजून घेण्यासाठी व्यापक सामाजिक–आर्थिक माहितीही मिळवण्यात आली. इकोनेट संस्थेच्या कामाशी संबंधित कार्यकर्ते काम करत असलेल्या गावांची निवड करण्यात आली. ही निवड जबाबदार स्थानिक कार्यकर्ते व इकोनेट संस्थेतील कार्यकर्ते यांच्या सूचनेनुसार करण्यात आली. कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या चार विभागातील प्रत्येकी एक असे चार जिल्हे, प्रत्येक जिल्ह्यातील एक असे चार तालुके व या तालुक्यांमधील एकूण १८ ग्रामपंचायतींमधील एकूण ३३ गावं/पाडे/वाड्या/वस्त्या या अभ्यासासाठी निवडण्यात आल्या होत्या. नमुना सर्वेक्षण, गटचर्चा, मुलाखती या माध्यमांतून अभ्यास करण्यात आला.

**आदिवासी समाज आणि महिला सभा**

ग्रामसभेचा मुख्य उद्देश गावातील नागरिकांना (अर्थात गावातल्या सर्वसामान्य स्त्री व पुरुषांना) ग्रामपंचायतीच्या निर्णयप्रक्रियेत सामावून घेणे आणि गावातील लोकांचा (म्हणजेच गावातल्या सर्वसामान्य स्त्री व पुरुषांचा) विकास कार्यक्रमात प्रत्यक्षपणे सहभाग वाढावा यासाठी प्रोत्साहन देणं असा आहे. ग्रामसभांच्या माध्यमातून अनुसूचित जाती–जमातींसोबतच लोकसंख्येतील अर्धा हिस्सा असलेल्या महिलांचा निर्णयप्रक्रियेतला सहभाग व हस्तक्षेप वाढावा म्हणून ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे केल्या गेलेल्या सूचनांमुळे लोकशाही विकेंद्रीकरणाचं ठाशीव पाऊल टाकलं गेलं. पण महिला ग्रामसभांना उपस्थित रहात नाहीत, उपस्थित राहिल्या तरी पुरुषांपुढे बोलण्यास कचरतात हे वारंवार आणि विविध अभ्यासातून समोर आल्याने 'महिला सभां' विषयक धोरणात्मक निर्णय झाला. 'ग्रामसभेत कुठले विषय बोलायचे, मांडायचे, अधोरेखित करायचे याबद्दलची पूर्वतयारी करण्यासाठीची महिलांची सभा' असं त्याचं स्वरूप. आदिवासी स्वशासनाच्या परिप्रेक्ष्यातून पाहिल्यास 'पेसा' भागात या धोरणाचा विशेष उपयोग व्हावा, तांड्या–पाड्यांवरच्या आदिवासी महिलेला निर्णयप्रक्रियेत, विकासप्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी, त्याकरता सक्षम बनवण्यासाठी या धोरणाचा उपयोग करून घेतला जावा, असं अपेक्षित आहे. पेसा क्षेत्रातील महिलांचा एकंदरच ग्रामसभांमधला सहभाग वाढावा आणि त्यांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढवण्यासाठी महिला सभांद्वारे प्रोत्साहन मिळावं, त्यासाठी महिला सक्षम बनाव्यात असं अपेक्षित आहे.

महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर इथल्या परंपरागत आदिवासी व्यवस्थेत सर्वसाधारणतः आदिवासी स्त्रीस चांगली वागणूक मिळते आणि आदिवासी स्त्रियांना प्रगत समाजातील स्त्रियांच्या तुलनेने अधिक लैंगिक स्वातंत्र्य असतं असं दिसून येतं. आर्थिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रांत पुरुषांचा वावर आणि वरचष्मा असतो, हे ठळकपणे दिसून येतं. स्त्री–पुरुष समानता जी दिसते ती केवळ जगण्याच्या संदर्भात, व्यक्तिगत पातळीवर. कुटुंबातलं, खासगी आयुष्यातलं बाईचं

दुय्यमत्व आदिवासी समाजात परंपरागत दिसत नाही. 'पुरुषप्रधानतेचं वास्तव' आदिवासी समुदायांमध्येही आढळतं. आदिवासी महिला सामाजिक–आर्थिक–राजकीय निर्णयप्रक्रियेत पूर्वीही नव्हत्या आणि आजही दिसत नाहीत.

बिगरआदिवासी समाजात विशेषत: वंचित समुदायातील महिला जशा निर्णयप्रक्रियेत परिघाबाहेर फेकल्या गेलेल्या किंवा परिघावरच राहिलेल्या दिसतात, पुरुषांच्या तुलनेत दुय्यम स्थानावर दिसतात तेच चित्र आदिवासी महिलेविषयीही दिसते. त्यामुळे या महिलेचं सक्षमीकरण आणि निर्णयप्रक्रियेतली तिची भागीदारी वाढावी म्हणून होत असलेल्या नियम, कायदेकानून आणि धोरणात्मक निर्णयांचा पाठपुरावा व अंमलबजावणी हे विषय अजेंड्यावर घेण्याची आजही गरज आहे असे या विषयातल्या ज्येष्ठ व अनुभवी कार्यकर्त्यांच्या मांडणीतून अधोरेखित होते. यातून दोन गोष्टी सुस्पष्ट होतात. एक म्हणजे, आदिवासी क्षेत्रात वेगळ्या महिला सभा हव्यात कशाला हा मुद्दा निकालात निघतो; आणि दुसरे, आजच्या जगात आदिवासींच्या हक्काचे प्रश्न अधिक जटिल होत चालले असताना, आदिवासी स्त्रीचा सामाजिक–राजकीय आत्मविश्वास वाढवणं, तिला बोलकं करणं, गावाच्या, तांड्याच्या, पाड्याच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्यासाठी तिला प्रवृत्त करणं, त्यासाठी महिला सभांचा आधार घेणं, महिला सभांच्या अजेंड्यावर 'जेंडर बजेटिंग' सारखे विषय येऊ लागतील या दिशेने आणि यासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे, हे अधोरेखित होतं.

पेसा क्षेत्रातल्या प्रत्येक गावात, प्रत्येक पाड्यावर ग्रामसभा व्हायला हवी. पण तशी ती होत नाही, असे अभ्यास व कार्यकर्ते सांगतात. मग महिला सभांबाबतची वस्तुस्थिती काय असेल, हे वेगळं सांगायला नको असंही ते म्हणतात. म्हणूनच ग्रामसभा व्हायला हवी, ती योग्य पद्धतीने घेतली जायला हवी, त्यातला ग्रामस्थांचा (पुरुषांसोबत स्त्रियांचाही) सहभाग, हस्तक्षेप वाढायला हवा आणि गावा–पाड्यांवर प्रत्येक ग्रामसभेआधी महिला सभेची मागणी व्हायला हवी, महिला सभा योग्य पद्धतीने घेतली जायला हवी. त्यात महिला उपस्थिती, सहभाग व हस्तक्षेप संख्यात्मक व गुणात्मक स्वरूपात वाढायला हवा अशा अजेंड्याने काम होण्याची गरज आहे. ग्रामसभा व महिला सभेसंदर्भातले हे मूलभूत मुद्दे अलग–अलग पद्धतीने न हाताळता एकत्रित अजेंडा म्हणून सर्वंकष दृष्टिकोनातून हाताळले तर ते अधिक संयुक्तिक, फलदायी व दूरदर्शी ठरेल. नव्या जगात आदिवासी हक्कांच्या लढाईचा मार्ग ग्रामसभांच्या आणि महिला सभांच्या पोटातून जाऊ शकतो. म्हणूनच हस्तक्षेपाचा अवकाश दिवसेंदिवस आक्रसत असताना घटनादत्त व कायद्याने देऊ केलेलं ग्रामसभा व महिला सभेचं सक्षम माध्यम पुरेशा ताकदीनं व विविधढंगी पद्धतीनं वापरलं जायला हवं, हे निश्चित!

**सर्वेक्षणातील आकडे काय सांगतात**

महिलांची सामाजिक–आर्थिक–राजकीय परिस्थिती आणि ग्रामसभेतील त्यांचा सहभाग व महिला सभांसंदर्भातील वास्तव तपासण्यासाठी प्रामुख्याने गाव–पाड्यावरील वास्तव्याचा काळ, वय, शिक्षण, वैवाहिक स्थिती, उपजीविका व त्यांचे सामाजिक–राजकीय संबंध या निकषांचा आधार घेण्यात आला.

महिला सभांबद्दल २० (८.५४ टक्के) महिलांना ठाऊक आहे.

१८ वर्षं पूर्ण झालेल्या नवमतदारापासून ३५ वर्षांपर्यंतच्या तरूण महिला मतदारांना केंद्रस्थानी ठेवून ग्रामसभा व महिला सभांबाबत सर्वंकष दृष्टिकोनातून जनजागृती व प्रशिक्षण यादृष्टीने प्रयत्न झाल्यास बदलाचा वेग वाढू शकतो.

ग्रामसभा व महिला सभेबाबत बहुसंख्या महिलांना माहिती नाही असं दिसून आलं. माहिती आहे आणि घरातून प्रोत्साहनही मिळते, तरीही ते ग्रामसभेस आणि/किंवा महिला सभेस जाण्यामध्ये परिवर्तित होत नाही, असंही आकडेवारीतून दिसून येतं.

महिला सभांमध्ये सहभागी होता का? या प्रश्नाला २३४ पैकी केवळ ७ (३ टक्के) महिलांनी सकारात्मक उत्तर दिलं.

अभ्यासप्रकल्पासाठी निवडलेल्या क्षेत्रात विविध अनुसूचित जमातींचं वास्तव्य आहे. कोरकू व गोंड (अमरावती जिल्ह्यातील धारणी परिसर), गोंड व कोलाम (नांदेडमधील किनवट परिसर), महादेव कोळी व महादेव ठाकूर (नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी परिसर), वारली व कोकणा (पालघर जिल्ह्यातील जव्हार परिसर) असं वैविध्य यात आढळतं. गरिबी, मूलभूत साधनसुविधांचा अभाव, पिचलेपण आणि आदिवासींचे हक्क व कायदेकानून याविषयीचं अज्ञान हे सारं कमीअधिक प्रमाणात या सर्व समुदायांत आढळतं. यापैकी कुठल्याही समुदायाच्या सामाजिक–आर्थिक–राजकीय व्यवहारात व निर्णयप्रक्रियेत महिला दिसत नाहीत असं मत इथल्या कार्यकर्त्यांनी नोंदवलं. शेती, शेतमजुरी आणि अपवादाने स्वयंरोजगार व नोकरी याद्वारे एका अर्थी स्वावलंबी असलेल्या आदिवासी महिला सामाजिक–आर्थिक–राजकीय निर्णयांच्या बाबतीत मात्र परावलंबी दिसतात.

सर्वेक्षणात उलटसुलट पद्धतीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं पडताळून पाहिली, की एक गोष्ट सूर्यप्रकाशासारखी लख्खपणे समोर येते ती म्हणजे आदिवासी भागातला पंचायतराज, आदिवासी स्वशासन याविषयीचा अंधार छेदण्यासाठी सर्जनशील प्रबोधनाला, सर्वंकष व सातत्यपूर्ण प्रयत्नांना पर्याय नाही.

**निष्कर्ष, सूचना व शिफारसी**

- ग्रामसभा यथायोग्य पद्धतीने आणि प्रामाणिकपणे घेतल्या जाव्यात, ग्रामसभांमधला महिलांचा सहभाग वाढावा, प्रत्येक ग्रामसभेआधी महिला सभा व्हव्यात आणि महिला सभांना महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून चर्चेत सहभाग घ्यावा, व्यवस्थेत हस्तक्षेप करावा यासाठी मूलभूत जाणीवजागृतीची गरज आहे. अर्थात त्यासाठी या मुद्द्यांचा सुटा सुटा विचार न करता पंचायतराज व्यवस्था, विकेंद्रित लोकशाही मूल्ये आणि आदिवासी स्वशासन हा गाभा मानून सर्वंकष विचारपद्धतीने वाटचाल करायला हवी. ती मूलभूत चौकट मानून उपक्रम, कार्यक्रम आखायला हवेत.
- ग्रामसभेबाबतची व महिला सभेबाबतची परिपूर्ण माहिती लोकांपर्यंत पोहोचणं आवश्यक आहे. त्यासाठी प्रयत्न काही ठिकाणी होतो आहे, पण तो सर्वत्र होणं आवश्यक आहे.
- ग्रामसभा व महिलासभेविषयी योग्य व पुरेशा माहितीचा अभाव सर्व अभ्यास, निरीक्षणं, मुलाखतींमधून स्पष्ट पुढे येतो. म्हणूनच माहितीच्या प्रचार–प्रसाराद्वारे सक्षमीकरण गरजेचं आहे.
- महाराष्ट्रातल्या ज्या भागात जनचळवळीने पंचायतराज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी जाणीवपूर्वक काम केलं त्या भागात ग्रामसभा व महिला सभेने पंचायतीच्या कार्यालयात दाराआड चालणारा गावकारभार चावडीवर खुला

करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे. त्यामुळे मागास जाती–जमाती व विशेषतः स्त्रियांमध्ये राजकीय सहभागाच्या प्रेरणा निर्माण झाल्याचे दिसतं.

- प्रशिक्षण दिलं तर मुली, बायका बोलायला, सहभाग घ्यायला, हस्तक्षेप करायला पुढे येतात असा महाराष्ट्रातला आजवरचा अनुभव आहे. म्हणूनच जबाबदार नागरिकत्वासाठी गावातील तरुण–तरुणींना संवेदनशील, कृतिशील बनवण्यावर लक्ष केंद्रित करायला हवं.
- महिला सभेत झालेले ठराव हे ग्रामसभा व ग्रामपंचायतीवर बंधनकारक असावे याकरता नवा शासकीय अध्यादेश काढला जावा यासाठी प्रयत्न व्हावा. गावामध्ये विकासकामं करताना महिला सभेने सुचवलेल्या विकासकामांना प्राधान्यक्रम मिळावा अशा स्वरूपाचा कायदाच शासनाने करावा यासाठी प्रयत्न होणं आवश्यक आहे.
- स्त्री–पुरुष सर्व ग्रामसेवकांना महिला सभांच्या बाबतीत संवेदनशील व जबाबदार कसं बनवता येईल हे पहावं लागेल.
- ग्रामसेवकांच्या भरतीत महिलांसाठी २० टक्के आरक्षण आहे. महिला ग्रामसेवकांच्या नेमणुका होण्यासाठी रेटा लावला पाहिजे. अगदी जाणीवपूर्वक महिला ग्रामसेवकांना महिला सभांसाठी संवेदनशील बनवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
- महिला सभांचं इतिवृत्त तयार करण्याची जबाबदारी गावातील शिक्षिका, आरोग्यसेविका इत्यादी शासकीय–निमशासकीय महिला कर्मचाऱ्यांवर सोपवण्यात यावी.
- ग्रामसभा व महिला सभांची कास धरत गावपातळीवरचा महिलांचा सहभाग अधिक सक्रिय व अर्थपूर्ण होण्यासाठी मूलभूत सामाजिक रचनेमध्ये बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. ग्रामसभेचे अधिकार, महिला सभेचं महत्त्व, ग्रामपंचायतीची कामं, निरनिराळ्या समित्या, जबाबदार नागरिकत्व याविषयी जनजागृती करत असतांनाचं तरुण आणि तरुणींबरोबर लिंगभाव संवेदनशीलतेवर काम करणं महत्त्वाचं आहे. गावपातळीवर समाजामध्ये दिसून येणाऱ्या सत्ताकेंद्रांचा स्थानिक पातळीवर सखोल अभ्यास करून त्यातून वाट कशी काढायची याविषयी महिलांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे.
- आदिवासी भागात ग्रामसभेबाबत आणि महिला सभेबाबत लोकांना योग्य व पुरेशी माहिती नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी जनचळवळी आणि बिगरशासकीय संस्था–संघटनांनी वापरलेली जनजागृतीची माध्यमं तर वापरता येतीलचं, शिवाय नव्या काळाला अनुसरून त्यात कुठली भर घालता येईल, हेही आवर्जून बघावे लागेल. तंत्रज्ञानाने आता हातात वेगवेगळी गॅजेट्स पोचवली आहेत. वॉट्सॅप, यूट्यूब, फेसबुकसारखी समाजमाध्यमं आता आदिवासी स्त्री–पुरुषांपर्यंतही पोचली आहेत. हातात मोबाईल असणं ही गोष्ट नवखी न राहिल्यामुळे परस्परांना न भेटताही माहितीची देवाणघेवाण करण्यात आदिवासी लोकही सक्रिय झाल्याचं दिसतं. त्यामुळे एकीकडे सभा–

बैठका–रॅली ही रूढ माध्यमे, वॉट्सॅप–फेसबुक–दृक्–श्राव्य चित्रफिती अशी नव्या तंत्रज्ञानातून उपलब्ध झालेली माध्यमं आणि उत्सव, लोकनृत्य, लोकगीतं, लोककथा अशी आदिवासी समुदायांची पारंपरिक–सांस्कृतिक माध्यमं यांचा मेळ साधत जनजागृती करता येईल.

- महिला सभेच्या बैठका ग्रामपंचायतीत न घेता त्या शाळा, समाजमंदिर इत्यादी महिलांच्या नियमितपणे येण्या–जाण्याच्या ठिकाणी/भागात घेता येतील यासाठी प्रयत्न करून पाहायला हवा.
- सामान्यतः जत्रा–यात्रा–उत्सव–सणांच्या निमित्ताने बहुसंख्य स्त्री–पुरुष आपापल्या गावात असण्याची शक्यता वाढते. पोटापाण्यासाठी स्थलांतर करणारे स्त्री–पुरुषही अशा दिवसांत आवर्जून गावी येण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच अशा निमित्तांच्या आगेमागे ग्रामसभा व महिला सभा घेण्यात याव्यात.
- आदिवासी भागात विविध तांड्यांवर, पाड्यांवर, वाड्या–वस्त्यांवर ग्रामसभा व महिला सभा होतील याबाबत कटाक्ष ठेवायला हवा. त्यासाठी आग्रह धरायला हवा.
- बचतगटांना पूर्वी बचत, कर्ज असा मर्यादित अजेंडा होता. ग्रामसभेसाठी महिलांना नेण्याचा, महिला सभा घडवण्याचा, महिला सभेतले विषय/ठराव ग्रामसभेपर्यंत नेण्याचा नवा अजेंडा आता बचतगटांना मिळाला आहे. हा अजेंडा वास्तवात कसा आणायचा हे पहायला हवं. त्यादृष्टीने महिला मंडळ व बचतगटात ग्रामसभेची माहिती देणं, तयारी करून घेणं, विषय कोणते मांडायचे याची चर्चा करणं गरजेचं आहे.
- गावपातळीवर आरोग्यसेविकेचं असलेलं महत्त्वपूर्ण स्थान व तिची बहुपेडी भूमिका लक्षात घेऊन महिला सभांसाठी आरोग्यसेविकांना विशेष निमंत्रण देऊन बोलवण्यात यावं, असं महिला सभेच्या तरतुदीत सुचवलं आहे. त्यादृष्टीने बचतगटांना त्याची जाणीव करून देणं, त्यासाठी उद्युक्त करणं आणि दुसरीकडे आरोग्यसेविकांनीही आपणहून पुढाकार घ्यावा, महिला सभेत सहभागी व्हावं, हस्तक्षेप करावा यासाठी प्रयत्न करायला हवेत. बचतगट व आरोग्यसेविकांच्या संघटनांच्या सहकार्याने या संदर्भातील जाणीवजागृती, प्रबोधन–प्रशिक्षण कार्यक्रम राबवता येतात का, हे पहायला हवं.
- महिला सभांद्वारे गावाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेत सहभाग घेता येतो, सकारात्मक हस्तक्षेप करता येतो आणि बदल घडवता येतो हे अधोरेखित करणाऱ्या यशकथा शोधून लिखित व दृक्–श्राव्य माध्यमांद्वारे विशेषतः बचतगट व महिला मंडळांच्या माध्यमातून अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करता येईल.

❑ ❑ ❑

## प्रकरण १

# महिला सभा : पार्श्वभूमी

महाराष्ट्रात १२ ऑक्टोबर २००२ रोजी तत्कालीन राज्यपाल महम्मद फैजल यांच्या स्वाक्षरीने महिला सभेविषयीचा वटहुकूम (ऑर्डिनन्स क्र. १२, १६ ऑक्टोबर २००२, मुंबई ग्रामपंचायत कायद्यातील कलम ७ विभाग ३ मधील दुरुस्ती) जारी झाला. २६ जानेवारी २००३ रोजी राज्यातल्या सर्व गावांमध्ये महिलासभा घेण्याची घोषणा तत्कालीन ग्रामविकास, स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री आर. आर. पाटील यांनी केली आणि महाराष्ट्र हे महिला सभा सुरू करणारं देशातलं पहिलं राज्य ठरलं. आज सतरा वर्षांनंतर महाराष्ट्रातल्या निवडक आदिवासी क्षेत्रासंदर्भाने महिला सभा आणि ग्रामसभांमधील महिलांच्या सहभागाबाबतची वस्तुस्थिती अभ्यासतांना मुळात त्यांचा इतिहास समजून घ्यायला हवा. भारतीय अर्थ–राजकीय व्यवस्थेतलं ग्रामसभांचं अस्तित्व आणि स्वरूप, विकेंद्रित लोकशाहीतलं स्थान, त्यातला महिलांचा सहभाग हे एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला ग्रामसभांपूर्वी महिलासभा घेतली जावी यासाठी शासकीय पातळीवर अधिसूचना काढण्याची अत्यावश्यकता का जाणवली हे सुरुवातीला लक्षात घ्यायला हवं.

थोडा धांडोळा घेतला तर असं दिसतं की भारतातल्या पंचायत राज व्यवस्थेच्या अनुषंगाने ऐतिहासिक आढावा घेण्याचं महत्त्वपूर्ण काम या क्षेत्रातल्या जुन्याजाणत्या मंडळींनी आणि संस्थांनी करून ठेवलं आहे. विशेषतः महाराष्ट्रात या संदर्भाने बऱ्यापैकी दस्तावेजीकरण झालं आहे. पंचायतराजसंबंधाने प्रबोधन–प्रशिक्षण करणाऱ्या बिगरशासकीय संस्थांनी आजवर सहजसोप्या मराठीत विविध पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत. ग्रामसभा व महिला सभांची पार्श्वभूमी समजून घेताना, संकलित स्वरूपात मांडताना नवी ग्रामपंचायत (राज्य साधन केंद्र), ग्रामपंचायतीची निर्मिती, रचना व निवडणुका (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन), पंचायतराज मार्गदर्शिका (अफार्म), पंचायतराजः संकल्पना आणि वास्तव – नवनीत शहा (डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट) या पुस्तिका प्रामुख्याने आधारभूत ठरल्या आहेत. इंटरनेटवरील स्पर्धापरीक्षांशी निगडीत वेबसाईट्स तसेच विकिपीडिया आणि विकासपीडिया यावरही यासंदर्भाने बरीच अधिकृत माहिती नेमकेपणाने उपलब्ध आहे. 'महिला सभा – पार्श्वभूमी' हे प्रकरण लिहिताना या सर्व स्रोतांतील साहित्याचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला आहे.

भारताच्या इतिहासात डोकावून पाहिलं तर असं दिसतं की, गावातल्याच लोकांनी आपल्या गावाचा कारभार पाहणं ही गोष्ट भारतामध्ये काही नवीन नाही. भारतात फार पूर्वीपासून गावचा कारभार गावातल्या लोकांनी करण्याची परंपरा

आहे. पूर्वी गावागावांमध्ये गावसभा होत असत. सभेत लोक गावाच्या अडचणी सांगत, अडचणींचं निवारण करण्यासाठी पंचांची निवड होई, हे पंच वयोवृद्ध असत, ते लोकांशी चर्चा करून अडचणी समजून घेत, एकमेकांशी आणि लोकांशी सल्लामसलत करून त्या अडचणींवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करत. लोक पंचांचा निर्णय ऐकत. गावासाठी श्रमदान करत, सामान जमवत, वर्गण्या काढत आणि स्वतः काम करून गावाच्या अडचणींचं निवारण करत. या ग्रामसंस्था महसूल जमा करणं, तंटेबखेडे सोडवणं, गावाचं रक्षण करणं, सार्वजनिक विहिरी, रस्ते, पूल, इमारती बांधणं आणि त्यांची देखभाल करणं अशी कितीतरी लोकोपयोगी काम करत असत. अशा तऱ्हेने गावाचा कारभार गावकरी करण्याची परंपरा भारतात फार पूर्वीपासून आहे. महाराष्ट्र सरकारने १९८४ साली प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थांच्या मूल्यमापनाची समिती नेमली होती. या समितीने माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या 'डिस्कवरी ऑफ इंडिया' या ग्रंथात प्राचीन ग्रामीण व्यवस्थेविषयी जी माहिती दिलेली आहे तिचा उल्लेख आवर्जून आपल्या अहवालात केला होता. त्या माहितीनुसार प्राचीन ग्रामीण व्यवस्था स्वयंपूर्ण आणि स्वनियंत्रित होती असं म्हणता येईल. गावाचा सर्व कारभार, महसूल, संरक्षण, न्यायदान अशी सर्व कामे लोकांनी निवडून दिलेले गावचे पंचायतीचे पंच चालवत होते. दळणवळणाची साधनं फारच कमी होती पण तत्कालीन अर्थाने आर्थिकदृष्ट्या गावं स्वयंपूर्ण होती. शेतीशिवाय गावात बारा बलुती, अठरा अलुती या नावाने सुमारे तीस प्रकारचे शेतीपूरक व ग्रामीण जीवनाच्या दैनंदिन गरजा भागवणारे विविध प्रकारचे उद्योग व्यवसाय चालत होते. गावाच्या बहुतेक सर्व गरजा शेती व शेतीपूरक व्यवसाय यातूनच भागवल्या जात होत्या.

तत्कालीन समाजव्यवस्थेतील स्थानिक ग्रामपंचायतींचं महत्त्व जाणून ब्रिटिश अधिकारी चार्ल्स मेटकाफ यांनी गावांना लहान प्रजासत्ताक राज्य असं संबोधलं होतं. ग्रामव्यवस्थेचं पुढील स्वरूपाचं वर्णन त्यांनी केलं होतं – 'हा गाव समाज आणि त्याची ग्रामव्यवस्था व एकसंधपणा एखाद्या छोट्या राज्याप्रमाणे आहे. आपल्या सर्व गरजा त्या स्वतः भागवतात. बाहेरच्या जगावर त्या फारशा अवलंबून नाहीत आणि त्यामुळे बाह्य व परकीय प्रवाहापासून त्या मुक्त आहेत. त्यांचं एकसंध स्वरूप हे त्यांच्यातील सुख–समाधान, स्वातंत्र्य आणि त्यांचा आनंद यास कारणीभूत आहे.'

ही स्वायत्त स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था जशी परकीय आक्रमणं सुरू झाली त्या वेळेपासून विस्कळीत होऊ लागली. परंतु ब्रिटिशांच्या अगोदरची परकीय आक्रमणं ही ग्रामीण व्यवस्था उद्ध्वस्त करू शकली नाही. किंबहुना त्या व्यवस्थेला त्यांनी फारसा हातही लावला नाही. ब्रिटीश राज्यात मात्र ही प्राचीन स्वायत्त ग्रामीण व्यवस्था खऱ्या अर्थाने उद्ध्वस्त झाली. देश इंग्रजांनी जिंकला. त्यांनी गावाच्या हातातून गावाचा कारभार काढून घेतला. गावाचा कारभार करण्यासाठी त्यांनी सरकारी नोकर नेमले. ते गावाचा कारभार गावाच्या इच्छेप्रमाणे करत नसत. त्यामुळे एकीकडे गावगाडा नीट चालेनासा झाला, तो मोडकळीस आला. इंग्रजांच्या काळात दुसरीकडे, दळणवळणाच्या सोयी वाढल्या. वस्तू व सेवा उत्पन्नाचे केंद्रित उद्योगधंदे शहरात वाढू लागले आणि त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीपूरक असे सर्व ग्रामीण उद्योग व कारागिरीचे व्यवसाय मोडून पडले. गावांचं 'उत्पादन केंद्र' हे स्वरूप नष्ट झालं. या काळात इथल्या ग्रामीण समाजाची स्वायत्त स्वयंपूर्ण आर्थिक व्यवस्था नष्ट होऊन त्या जागी नवीन वसाहतवादी अर्थव्यवस्था रूढ होऊ लागली. स्वायत्त स्वयंपूर्ण ग्रामराज्य चालवणारी प्राचीन ग्रामीण व्यवस्था मोडून पडली.

गावगाडा नीट चालेनासा झाल्यामुळे त्याचा दुष्परिणाम आपल्या सत्तेवर होईल हे लक्षात घेऊन १८६९ साली इंग्रजांनी गावागावात स्वच्छता व पाणीपुरवठा मंडळं स्थापन केली. गाव स्वच्छ राखण्याची व गावासाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्याची जबाबदारी गावकऱ्यांवर सोपवली गेली. अशा स्वच्छता आणि पाणीपुरवठा संस्था १८६९ पासून सुरू झाल्या असल्या तरी १८८२ च्या लॉर्ड रिपन यांच्या ठरावाने इंग्रजी पद्धतीच्या 'स्थानिक स्वराज्य संस्था' खऱ्या अर्थाने सुरू झाल्या असं मानलं जातं. पुढे १९२० साली त्यांनी ग्रामपंचायतीचा कायदा केला. त्या कायद्याप्रमाणे लोकनियुक्त सदस्य ग्रामपंचायतीचा कारभार पाहू लागले. पूर्वीच्या मुंबई प्रांतात ग्रामपंचायती स्थापन करण्यासाठी १९२० साली प्रथम कायदा करण्यात आला. पुढे मुंबई सरकारने ग्रामपंचायतींचे अधिकार वाढवायचे ठरवून व त्यांना न्यायदानाचे हक्क देण्याचे ठरवून मुंबईचा १९३३ ग्रामपंचायत कायदा केला. १९३५ साली भारत सरकारचा प्रांतिक स्वायत्ततेचा कायदा संमत झाल्यानंतर प्रांतिक सरकारच्या कामाच्या यादीत एक हस्तांतरित विषय म्हणून 'स्थानिक स्वराज्य' हा विषय घेण्यात आला. त्यानंतर लोकनियुक्त मंत्रिमंडळं अधिकारावर आली. त्यांनी आणखी काही सुधारणा केल्या. नियुक्त सभासद नेमण्याचं बंद केलं, अनुसूचित जाती व मुस्लिमेतर अल्पसंख्याकांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्याची तरतूद केली, तालुका बोर्ड रद्द करून ग्रामपंचायती प्रभावी करण्यावर भर दिला. शेतकरी कर्ज निवारण कायदा, शेतकरी उत्पन्न बाजार कायदा, कुळ कायदा असे महत्त्वाचे कायदे केले. शेती सुधारणेवर आणि सहकारी चळवळ मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला. ब्रिटिश राजवटीमुळे उद्ध्वस्त झालेल्या ग्रामीण समाजाच्या आर्थिक प्रश्नाकडे एकत्रित स्वरूपात पाहण्याची जाणीव निर्माण झाली आणि त्यानुसार १९३९ झाली प्रत्येक जिल्ह्यात 'जिल्हा विकास मंडळ' स्थापन करण्यात आलं. इंग्रजांनी निर्माण केलेल्या, राज्य शासनावर अवलंबून असलेल्या स्थानिक संस्था थोड्या धडधाकट करून उभ्या करण्याचा प्रयत्न लोकनियुक्त प्रांतिक मंडळांनी त्यावेळी केला.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. देशाचा कारभार कसा असावा या संदर्भातील राज्यघटना निर्माण झाली. 'ग्रामपंचायतींची स्थापना करून स्वराज्याचे घटक म्हणून काम करणे त्यांना शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार त्यांना द्यावेत' असा आदेश राज्यघटनेद्वारे राज्य सरकारांना देण्यात आला. घटनेने गावाच्या विकासाचं काम राज्य सरकारवर सोपवलं. गावाच्या विकासाकरता ग्रामपंचायती स्थापन कराव्यात व ग्रामपंचायतींना स्थानिक सरकार म्हणून काम करून गावाची प्रगती करता येईल असे कायदे करावेत अशा सूचना राज्य सरकारांना दिल्या गेल्या. या सूचनांप्रमाणे त्यावेळच्या मुंबई सरकारने १९५८ साली ग्रामपंचायतींचा कायदा केला. 'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८' या नावाने हा कायदा ओळखला जातो. या कायद्यात ग्रामपंचायतींची स्थापना करावी आणि ग्रामपंचायतींच्या सदस्यांची निवड सर्व मतदारांनी करावी यासंबंधी तरतूद केली, ग्रामपंचायतीची कामं ठरवून दिली आणि काम करण्याकरता लागणाऱ्या निधीची व्यवस्था केली गेली. सर्व सदस्यांनी मधून-मधून एकत्र यावं, सर्वांनी चर्चा करावी आणि चर्चा करून सर्वानुमते लोकशाही पद्धतीने गावाच्या कारभाराचे निर्णय घ्यावेत यासाठी सभा घेण्याची कायद्यात तरतूद केली. १९५८ च्या या अधिनियमाने प्रत्येक पंचायतीत 'ग्रामसभा' निर्माण केल्या गेल्या.

ग्रामसभा ही ग्रामपंचायतीच्या मतदारांची संस्था आहे. ग्रामपंचायतीच्या हद्दीत असणाऱ्या गावातील व वाड्या-वस्त्या यातील ग्रामपंचायतीचे मतदार हे या संस्थेचे सदस्य आहेत. ग्रामसभेच्या या सदस्यांनी एकत्र यावं, ग्रामपंचायतीने वर्षभरात गावाच्या विकासाची जी कामं केली असतील त्यांची माहिती घ्यावी, ग्रामपंचायतीने पुढच्या वर्षी विकासाची जी

कामं करायचं ठरवलं असेल त्याची माहिती घ्यावी, ग्रामपंचायतीने वर्षभर केलेल्या खर्चाचा हिशेब घ्यावा आणि पुढील वर्षी किती खर्च केला जाणार आहे याची माहिती घ्यावी, ग्रामपंचायतीचे हिशेब तपासताना हिशेब तपासनीस अधिकाऱ्याला ज्या शंका आल्या असतील त्या शंका जाणून घ्याव्यात आणि त्या शंकांना ग्रामपंचायतीने जी उत्तरं दिली असतील ती उत्तरं समजून घ्यावी, ग्रामपंचायत करत असलेल्या कारभाराची प्रश्न विचारून माहिती घ्यावी आणि ग्रामपंचायतीला सूचना कराव्यात, लोकांच्या गरजा काय आहेत त्या ग्रामपंचायतीला सांगाव्यात आणि गावाच्या भल्यासाठी कोणत्या योजना अगोदर घ्याव्यात हे सुचवावं, ग्रामपंचायतीला सल्ला द्यावा आणि मार्गदर्शन करावं. थोडक्यात ग्रामसभेच्या सदस्यांनी गावाच्या विकासात सहभागी व्हावं, ग्रामपंचायतीच्या कारभारावर नजर ठेवावी आणि ग्रामपंचायतीवर निवडून आलेल्या सदस्यांनी चांगली कामं केली तर प्रोत्साहन द्यावं व त्यांच्याकडून कामं नीट होत नसतील तर त्यांना त्याची जाणीव करून द्यावी अशी अपेक्षा आहे. म्हणूनच दलित, आदिवासी, महिला व तरुणांच्या आशा, आकांक्षा, व्यथा, वेदनांना वाव देणारे, गावाचे शहाणपण, सदिच्छा व कर्तृत्व व्यक्त करणारं लोकांचं व्यासपीठ म्हणजे 'ग्रामसभा' असं म्हटलं जातं.

१९५८ च्या कायद्यानंतर पुढचा टप्पा आला जेव्हा बलवंतराय मेहता समितीने पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पार्श्वभूमीवर आपला अहवाल सादर केला. बलवंतराय मेहता समितीने विकेंद्रीकरणावर भर देत 'राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम गावपातळीवर लोकसहभागाने यशस्वीरित्या राबवायचे असतील तर लोकशाहीचे व सत्तेचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे' अशी शिफारस केली होती.  त्यासाठी त्यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय योजना सादर केली. ही शिफारस केंद्र सरकारने स्वीकारली आणि आवश्यक त्या फरकाने ही शिफारस आपापल्या राज्यात कायदा करुन लागू करावी अशा सूचना राज्य सरकारांना त्याच वर्षी केल्या. पहिल्याच वर्षी राजस्थान राज्याने पहिलं पंचायतराज आपल्या राज्यात स्थापन केलं. महाराष्ट्र राज्य शासनाने 'वसंतराव नाईक समिती'च्या शिफारसीनुसार 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१' हा कायदा केला. १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियम नियमानुसार पूर्वी ग्रामपंचायती व ग्रामसभा अस्तित्वात आल्या होत्या. त्याची सांगड जिल्हा परिषद व पंचायत समितीशी घालण्यात आली आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद विकास गट, तालुका स्तरावर पंचायत समित्या आणि ग्रामस्तरावर ग्रामपंचायतींचा कारभार २ मे १९६२ पासून सुरू होऊन लोकशाही विकेंद्रीकरणाद्वारे ग्रामीण लोकांच्या हातात सत्ता सोपवण्याच्या या प्रयोगाला महाराष्ट्रात सुरुवात झाली.

हा प्रयोग योग्य रीतीने चालू आहे की नाही हे पाहण्यासाठी ल. ना. बोंगिरवार समिती (१९७०), मंत्रिमंडळाची उपसमिती (१९८०), प्राचार्य पी. बी. पाटील समिती (१९८४–८६) अशा समित्या नेमल्या गेल्या. या विविध समित्यांनी चौकशी व अभ्यास केला. आपल्या सूचना व शिफारसी राज्य शासनास दिल्या. त्यापैकी काही सूचना व शिफारसी स्वीकारून महाराष्ट्र सरकारने १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत कायद्यात आणि १९६१ च्या जिल्हा परिषद व पंचायत समिती कायद्यात वेळोवेळी सुधारणा केल्या. या सुधारित कायद्याप्रमाणे १९९५ सालापर्यंत ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदा यांचा कारभार महाराष्ट्रामध्ये चालू होता. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे मात्र यापुढचं पाऊल टाकलं गेलं. लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया, निर्णयप्रक्रियेतील 'सर्वांचा' सहभाग आणि ग्रामसभेचं महत्त्व विशेष अधोरेखित करत ७३ व्या घटनादुरुस्तीने त्यास घटनात्मक दर्जा देऊ केला.

एकंदरीनेच देशाच्या विकासात गावाच्या विकासाला फार महत्त्व आहे. गावाचा विकास करण्याकरता ग्रामपंचायती स्थापन करून त्या बळकट कराव्यात असे भारताच्या घटनेतील ४० व्या कलमात निर्देश दिले आहेत. परंतु हा विषय राज्य सरकारच्या अधिकारात असल्याने काही राज्य सरकारं आपले अधिकार कमी करून पंचायतराज व्यवस्था बळकट करण्यास तयार नाहीत असं वास्तव समोर आलं. म्हणून भारताच्या घटनेत दुरुस्ती करून लोकांच्या हाती सत्ता देण्याचं महत्त्वाचं पाऊल उचललं गेलं ते ७३ व्या घटनादुरुस्तीने. २२ डिसेंबर १९९२ रोजी ७३ वी घटनादुरुस्ती केली गेली. या घटनादुरुस्तीद्वारे 'पंचायत राज' या संकल्पनेचा समावेश घटनेच्या नवव्या प्रकरणात आणि २४३ व्या कलमात केला गेला. भारतातील पंचायतराज संस्थांना ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे घटनात्मक दर्जा (संविधानिक दर्जा) प्राप्त झाला. याद्वारे प्रत्येक गावामध्ये सर्व प्रौढ स्त्री–पुरुषांचा समावेश असणारी ग्रामसभा व ग्रामपंचायत असणं बंधनकारक करण्यात आलं. भारतातील सर्व राज्यांमध्ये त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था स्थापन करणं, पंचायत व्यवस्थेच्या तिन्ही स्तरांमध्ये महिलांसाठी १/३ जागा राखीव ठेवणं बंधनकारक करण्यात आलं. देशातील प्रत्येक राज्यात पंचायतराज संस्थांचा कार्यकाल पाच वर्ष करण्यात आला. पंचायतराजच्या तिन्ही स्तरांमध्ये महिला आणि अनुसूचित जाती–जमातीसाठी पदाधिकाऱ्यांची पदं राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली.

पंचायतराज संस्थांसाठी प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र निवडणूक यंत्रणा स्थापन करण्याचं बंधन घालण्यात आलं. केंद्रीय वित्त आयोगाच्या धर्तीवर प्रत्येक राज्याने राज्य वित्त आयोगाची स्थापना करणं आवश्यक करण्यात आलं. या घटना दुरुस्तीनंतर राज्य सरकारांना त्यांच्या राज्यात पंचायतराज पद्धती सुरू करण्याकरता कायदे करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. लोकांच्या हाती सत्ता देण्याकरता पंचायतराज पद्धती बळकट करणारी तसंच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि एकंदरीने समाजातील महिलांचा निर्णय प्रक्रियेतील आणि विकासातील सहभाग वाढावा यासाठीचं घटनात्मक पाऊल टाकणारी ही ७३ वी घटनादुरुस्ती म्हणूनच मैलाचा दगड मानली जाते.

७३ व्या घटनादुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने 'मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती दुरुस्ती विधेयक १९९४' या नावाचा कायदा २२ एप्रिल १९९४ रोजी केला आणि दोन्ही कायद्यात आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या. हा दुरुस्त कायदा एप्रिल १९९५ पासून महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आला. नव्या पंचायत राज्याच्या नव्या नियमांनुसार ग्रामपंचायतीच्या निवडणुका १९९५ सालच्या एप्रिल महिन्यापासून महाराष्ट्रात घेण्यात येऊ लागल्या आहेत. महाराष्ट्रात १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाने आणि १९६१ च्या महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायद्याने अगोदरच सुरू झालेल्या पंचायतराज पद्धतीला ७३ व्या घटना दुरुस्तीने घटनात्मक दर्जा मिळाला. अर्थातच 'पंचायतराज'ची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचं बंधन राज्य सरकारवर आलं. ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकांचा आर्थिक विकास व्हावा व त्यांना सामाजिक न्याय मिळावा यासाठी योजना तयार करण्याचे अधिकार राज्य शासन ग्रामपंचायतीला देईल तसेच घटनेच्या अकराव्या अनुसूचित कामांच्या योजना आणि ग्रामपंचायतीकडे सोपवलेल्या आर्थिक विकासाच्या आणि सामाजिक न्यायाच्या योजनांच्या अंमलबजावणीचे अधिकार राज्य शासन ग्रामपंचायतीला देईल असं अपेक्षित आहे. ग्रामपंचायती राज्य संस्थांच्या आर्थिक स्थितीचं अवलोकन करण्यासाठी राज्य शासनाने ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार 'वित्त आयोग' निर्माण केला आहे. त्याची मुदत पाच वर्षांची आहे. दर पाच वर्षांनी वित्त आयोग राज्य शासनाकडून नेमला जाईल. हा आयोग जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती

या पंचायतराज संस्थांच्या आर्थिक स्थितीची पाहणी करेल आणि राज्यपालांकडे योग्य त्या शिफारसी करेल असं अपेक्षित आहे.

१९५८ च्या कायद्यानुसार ग्रामसभा घेण्याचं बंधन ग्रामपंचायतीवर होतंच; पण आता ग्रामसभांना घटनात्मक दर्जा मिळाला आहे. विशेष म्हणजे ७३ व्या घटनादुरुस्तीने अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्याचे अधिकारही ग्रामसभेला दिले आहेत. ग्रामपंचायतीचे मतदार हे ग्रामसभेचे सदस्य आहेत. या सदस्यांना ग्रामसभेच्या बैठकांना उपस्थित राहण्याचा आणि ग्रामपंचायतीच्या विकासासंबंधी माहिती मिळविण्याचा घटनात्मक अधिकार प्राप्त झाला आहे. तसंच त्यांना गावाच्या विकासाकरता सूचना करण्याचा आणि गावाच्या विकासात सहभागी होण्याचाही घटनात्मक अधिकार मिळाला आहे. ग्रामसभेचा मुख्य उद्देश गावातील सामान्य माणसाला ग्रामपंचायतीच्या निर्णयप्रक्रियेत सामावून घेणं आणि गावातील लोकांचा विकास कार्यक्रमात प्रत्यक्षपणे सहभाग वाढावा यासाठी प्रोत्साहन देणं असा आहे. त्यामुळे सर्वांच्या सोयीच्या अशा सार्वजनिक ठिकाणी ग्रामसभा घेण्यात यावी, वर्षातून सहा ग्रामसभा वेगवेगळ्या ठिकाणी घेतल्या जाव्यात, एकाच गावाची ग्रामपंचायत असली तरी पहिल्या ग्रामसभेनंतरच्या ग्रामसभा गावाच्या वाड्या–वस्त्यांवर घ्याव्यात, वर्षातील सहा ग्रामसभांपैकी एक ग्रामसभा दलित वस्तीत घेतली जावी अशा अनेक सूचना व तरतुदी ७३ व्या घटनादुरुस्तीच्या संदर्भाने करण्यात आल्या आहेत. ग्रामसभेला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आलं आहे. याखेरीज १९९६ साली शासकीय स्तरावर आणखी एक मूलभूत व महत्त्वपूर्ण पाऊल टाकलं गेलं. देशातील आदिवासींना स्वशासनाचा अधिकार देणारा पेसा कायदा १९९६ साली देशपातळीवर संमत करण्यात आला. त्यापाठोपाठ १९९७ मध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणा करण्यात आल्या. पुढेही त्यात वेळोवेळी सुधारणा केल्या गेल्या. पेसा कायद्याशी मेळ खाणारी नियमावली २०१४ साली बनवण्यात आली. महाराष्ट्रातील ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यातील काही तालुके पूर्ण आदिवासी तालुके म्हणून आणि काही तालुके अंशतः आदिवासी तालुके व त्यातील गावे अनुसूचित क्षेत्रात (पेसा क्षेत्रात) समाविष्ट झाली आहेत. पेसा क्षेत्रातील ग्रामसभांना विशेष अधिकार प्राप्त झाले आहेत. त्या अधिकारांचा अधिकाधिक उपयोग करून घेणं अपेक्षित आहे. त्यासाठी १८ वर्षांवरील सर्व स्त्री–पुरुष ग्रामस्थांना सक्षम करणं अपेक्षित आहे. ग्रामसभांचं बळकटीकरण व सर्व स्त्री–पुरुष ग्रामस्थांचं सक्षमीकरण म्हणूनच अत्यावश्यक ठरतं.

अनुसूचित जाती–जमाती यांच्यासोबतच लोकसंख्येतील अर्धा हिस्सा असलेल्या महिलांचा निर्णय प्रक्रियेतला सहभाग व हस्तक्षेप वाढावा म्हणूनही ७३ व्या घटनादुरुस्तीने ज्या सूचना केल्या त्याही विशेष महत्त्वाच्या ठरल्या आहेत. लोकशाही विकेंद्रीकरणाचं ठाशीव पाऊल टाकताना महिलांसाठी सत्तेतल्या राखीव जागांचाही विचार ७३ व्या घटनादुरुस्तीने मांडला. स्वातंत्र्यानंतरची अनेक वर्ष गावातील सधन शेतकरी वरिष्ठ जातीचे पुरुष हेच गाव कारभारी होते. त्यामुळे या 'वरिष्ठ जातीतले पुरुष म्हणजे गावकरी आणि यांच्या वाड्या–वस्त्या म्हणजेच गाव' अशी संकल्पना रूढ होती. पण या वास्तवाला कायदेशीर छेद देण्यासाठी गावाच्या रचनेत सत्तेच्या सारीपाटावर सर्वसामान्य महिलेचं स्थान निर्माण करण्याचं महत्त्वाचं काम ७३ व्या घटनादुरुस्तीने केलं. महिलांना सत्तेत ३३% राखीव वाटा मिळाला. १९९३ मध्ये महाराष्ट्रात राज्य महिला आयोग स्थापन झाला. देशातलं पहिलं महिला धोरण महाराष्ट्राने तयार केलं. १९९३ साली महिलांना दिला गेलेला सत्तेतला वाटा वाढवून महिला आरक्षणाचं प्रमाण ५०% करण्यात आलं ते २०११

साली. महाराष्ट्रात ग्रामपंचायतीमध्ये महिलांसाठी आता ५०% जागा राखीव असतात. विशेष म्हणजे सामान्यत: ग्रामपंचायत स्तरावर सरपंचावर अविश्वासाचा ठराव आणण्यासाठी एकूण सदस्यांच्या १/३ सदस्यांनी लेखी मागणी करावी लागते तर तो ठराव पास होण्यासाठी एकूण सदस्यांच्या २/३ सदस्यांनी तो ठराव पास करावा लागतो. पण महिला सरपंचावर अविश्वास ठराव पास होण्यासाठी ३/४ बहुमताची आवश्यकता असते. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे आणि त्यानंतर झालेल्या अशा बदलांमुळे महिलांचा सत्तेतला प्रवेश व वावर सुकर करण्यासाठी घटनात्मक व कायदेशीर वाटा निर्माण होत गेल्याचं दिसून आलं.

७३ वी घटनादुरुस्ती, पंचायतराज व्यवस्थेचं सक्षमीकरण आणि महिला आरक्षण अशा महत्वपूर्ण टप्प्यांच्या जोरावर जनआंदोलनांनी आणि जनवकालतीने रेटा लावला. या रेट्यामुळे मधल्या काळात २००२ साली प्रत्येक ग्रामसभेच्या आधी 'महिला सभा' घेतली जाण्याबाबत जी अधिसूचना महाराष्ट्र शासनाने काढली तिलाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिलासभेची गरज जनआंदोलनांना, सामाजिक संस्था–संघटनांना का जाणवत होती, हेही समजून घ्यायला हवं.

७३ व्या घटनादुरुस्तीमुळे गावपातळीवर सत्तेत राखीव जागांमुळे १/३ वाटा मिळाल्यानंतर महाराष्ट्रातल्या ग्रामीण महिलांमध्ये जागृतीची किरणं डोकावू लागली होती. त्यास स्त्रीवादी चळवळ, महिला आंदोलनं, सामाजिक संस्था–संघटना आणि एनजीओ यांनी दिशा आणि बळ देण्याचं काम केलं. चूल आणि मूल यापलीकडे जाताना प्रत्येकीला थेट सत्तेत सहभागी व्हायचं नसलं तरी विकासाच्या, निर्णयाच्या प्रक्रियेत तिने सहभागी व्हायला हवं हे सर्वसामान्य स्त्रीला जाणवून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. गावाच्या कारभारातही आपण लक्ष घालायला हवं, त्यावर लक्ष ठेवायला हवं, यथायोग्य हस्तक्षेप करायला हवा या विचाराचं बीज महिलांच्या मनात पेरण्याचं काम त्याद्वारे झालं. ग्रामसभेतला महिलांचा सहभाग वाढवण्यावर भर देण्यात आला. परंतु त्या प्रक्रियेत आणि त्या संदर्भातील अभ्यास व निरीक्षणातून असं लक्षात आलं की, सामान्यत: आपल्याकडच्या अर्थ–राजकीय व्यवस्थेतील पुरुषसत्ताक मानसिकतेच्या परंपरागत ओझ्याचा परिपाक म्हणून, महिला ग्रामसभांना उपस्थित रहात नाहीत आणि ग्रामसभेला जरी हजर असल्या तरी पुरुषांपुढे बोलण्यास कचरतात, तसंच आपली मतं मोकळेपणाने मांडत नाहीत. प्रश्न तर नेमकेपणाने अधोरेखित झाला होता. या प्रश्नाला छेद देऊ शकेल, अशा उत्तराची अपरिहार्यता जाणवत होती. महिला सभा नावाचं व्यवहार्य  उत्तर त्यातून पुढे आलं.

२००२ साली ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने एक उच्चस्तरीय समिती नेमली होती. 'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८' संदर्भाने बदल व सूचना सुचवण्याची जबाबदारी त्या समितीवर सोपवलेली होती. या समितीच्या सूचनांमध्ये इतर सूचनांबरोबरच 'प्रत्येक ग्रामसभेपूर्वी महिला सभा घेण्यात यावी' या सूचनेचा समावेश होता. ग्रामसभांमध्ये महिलांचा सहभाग नसण्याच्या वास्तवाला छेद देण्यासाठी सुचवण्यात आलेलं सकारात्मक पाऊल या अर्थाने सामाजिक संस्था, संघटना व चळवळींनी त्याकडे पाहिलं. विचारमंथनानंतर ही सूचना उचलून धरायचं ठरवलं. निर्णय व विकासप्रक्रियेतील महिलांच्या सहभागाला कायदेशीर प्रोत्साहन देऊ पाहणाऱ्या या सूचनेला धोरणात्मक चौकट मिळावी, लवकरात लवकर त्यासंदर्भाने ग्रामविकास विभागाद्वारे ठराव केला जावा, विधानसभेच्या

पटलावर हा विषय मांडला जावा व हे विधेयक संमत व्हावं यासाठी महाराष्ट्रातील महिला आंदोलने, स्वयंसेवी संस्था व चळवळी आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांनी रेटा लावला. त्या प्रयत्नांना यश आलं.

गावपातळीवरच्या आरक्षणाच्या जोरावर, पदांच्या जोरावर महिलांनी गावाच्या विकास कार्यक्रमात फक्त निर्णयापुरतं मर्यादित राहू नये तर संपूर्ण निर्णय प्रक्रियेमध्ये पुढे असावं आणि त्यांची निर्णय प्रक्रियेतील क्षमता वाढावी या हेतूने २००२ साली महिला सभेची संकल्पना लागू करण्यात आली. २००२ साली अधिसूचना जारी करून महाराष्ट्र शासनाने गावाच्या विकासासाठी आणि गावाच्या विकास कार्यक्रमात महिलांचाही सहभाग असावा म्हणून महिलांसाठी स्वतंत्र सभा घेणं कायद्याने बंधनकारक केलं. ग्रामसभेच्या महिला सदस्यांची म्हणजेच महिला मतदारांची सभा प्रत्येक ग्रामसभेच्या पूर्वी शक्यतो आदल्या दिवशी घेण्यात येणं या अधिनियमामुळे आता अनिवार्य आहे. त्या सभेत पारित झालेले सर्व ठराव ग्रामसभेत जसेच्या तसे घेतले जाणं अपेक्षित आहे.

महाराष्ट्रात महिला सभांसाठी केल्या गेलेल्या विशेष तरतुदी अशा आहेत –

- प्रत्येक ग्रामसभेपूर्वी महिला सभेचं आयोजन केलं पाहिजे.
- महिला सभेची वेळ व ठिकाण महिलांच्या सोयीनुसार ठरविण्यात यावी.
- महिला सभेसाठी कोरमची कुठलीही अट नाही.
- महिला सभेचं स्वतंत्र इतिवृत्त असलं पाहिजे.
- शासनाच्या महिलांच्या संदर्भातील सर्व योजनांचे लाभार्थी महिला सभेमध्ये निवडले गेले पाहिजेत.
- महिला सभेत गावातील पाणी प्रश्नावर प्रामुख्याने चर्चा करणं, त्यासंबंधीचं नियोजन व धोरण ठरवणं बंधनकारक आहे.
- महिला बालकल्याण योजनेतील १०% निधीच्या नियोजन व विनियोगासंबंधी सर्व निर्णय महिला सभेमध्ये घेणं बंधनकारक आहे.
- गाव विकास समिती कलम ४९ अंतर्गत असणाऱ्या विविध समित्यांमधील प्रतिनिधींची निवड महिला सभेमध्ये झाली पाहिजे.
- ग्रामसेवकाने महिला ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा आढावा सादर करावा.
- महिला सभेमध्ये गावपातळीवर सक्रिय असणारे बचत गट, महिला मंडळं व सांस्कृतिक मंडळाच्या प्रतिनिधींना बोलवून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला जावा.
- महिला सभेमध्ये गाव–वस्त्यांवरील आरोग्यसेविकेला विशेष आमंत्रण देऊन बोलवण्यात यावं.

या विशेष तरतुदींमुळे गावाच्या प्रश्नांवर बोलण्यासाठी सर्वसामान्य महिलेला स्वतंत्र व्यासपीठ तयार झालं. घरकामाच्या व रोजंदारीच्या वेळी जर सभा घेतल्या तर ती त्यास उपस्थित राहू शकत नाही. ग्रामपंचायतीत सभा झाली, तर ती बोलायला बिचकते. मासिक पाळीच्या  दिवसांत देवळात आयोजित केलेल्या सभेला ती जात नाही. हे अनुभवाला आल्याने महिला सभेची वेळ व ठिकाण महिलांच्या जास्तीत जास्त उपस्थितीसाठी प्रोत्साहनपर ठरेल, हे पाहण्याची सूचना या तरतुदीने केली. गावाच्या राजकारणात मुरलेले पुरुष महिला सभा नियमबाह्य ठरवण्यात, उधळून लावण्यात माहीर ठरू शकतात. गणपूर्तीचा नियम त्यासाठी सोयीस्कर वापरू शकतात. असं घडू नये म्हणून महिला सभेस कोरमची कुठलीही अट नाही, असं महिला सभेच्या विशेष तरतुदीत आवर्जून नोंदवण्यात आलं आहे. महिला, बालकल्याण व पाणी याबाबतची चर्चा, नियोजन या सभेत होणं बंधनकारक असलं तरी त्यापलीकडे जाऊन गावाचे एकंदर प्रश्न, गावाचा विकास या अनुषंगाने महिलांनी बोलणं, चर्चेत सहभागी होणं, हस्तक्षेप करणं अपेक्षित आहे.

महिला सभेच्या विशेष तरतुदीनुसार ग्रामसेवक महिला सभेविषयी संवेदनशील असणं गृहीत आहे. प्रत्येक ग्रामसभेआधी महिला सभा होईल हे ग्रामसेवकाने पाहिलं पाहिजे, महिला सभेस उपस्थित राहिलं पाहिजे, महिलांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना जबाबदारीने व समर्पक उत्तरं दिली पाहिजेत, महिला सभेस योग्य ती माहिती पुरवली पाहिजे. मुख्य म्हणजे ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा आढावा ग्रामसेवकाने महिला सभेस सादर केला पाहिजे. या अर्थाने महिला सभेबाबत ग्रामसेवकाकडून कुठलीही टाळाटाळ होऊ नये, ग्रामसेवकाने पुरेशा गांभीर्याने महिला सभेचा विषय हाताळावा आणि या सभेत पारित झालेले सर्व ठराव ग्रामसभेत जसेच्या तसे घेतले जातील हे पाहणं अभिप्रेत आहे.

गावपातळीवर आरोग्यसेविकेची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. आरोग्याच्या मूलभूत प्रश्नाशी आणि त्यामुळे घराघराशी तिची नाळ जोडलेली असते. बाळंतपण आणि मुलाबाळांच्या आजारपणात सर्वसामान्य महिलेला तिचा मोठा आधार वाटतो. महिला सभेत आरोग्यसेविकेला विशेष निमंत्रण देऊन बोलवण्यात यावं, असं तरतुदीत नोंदवलं आहे. गावातील सर्वसामान्य महिला आणि शासकीय व्यवस्था यांच्यातला संवेदनशील दुवा म्हणून ती विश्वासार्ह भूमिका बजावू शकते, अशी आशा या तरतुदीने व्यक्त केली आहे.

सामान्यतः सामाजिक–आर्थिक–राजकीय क्षेत्रात दुय्यमत्व घेऊन परिघावर वावरणाऱ्या महिलेने निर्णयप्रक्रियेत भागीदारी करावी, यासाठी पोषक असा कायदेशीर रेटा देण्याचा प्रयत्न महिला सभेच्या या विशेष तरतुदींनी केलेला दिसतो. असं म्हटलं जातं की लोकशाही विकेंद्रीकरणाचा रस्ता जबाबदेही व सक्षम ग्रामसभांच्या पोटातून जातो. ग्रामसभा सक्षम व जबाबदेही होण्यासाठी १८ वर्षांवरील स्त्री–पुरुष गावकऱ्यांचा त्यातला जागरूक सहभाग व हस्तक्षेप वाढणं अपेक्षित आहे. त्यासाठी पारंपरिक पुरुषप्रधान मानसिकतेच्या ओझ्याखाली वावरणारी स्त्रीदेखील गावाच्या अर्थ–राजकीय विश्वात वावरू लागणं, सहभागी होणं गरजेचं आहे. त्यादृष्टीने महिला सभेच्या विशेष तरतुदींनी परिपक्व कायदेशीर चौकट निर्माण करण्यात आली, असं म्हणता येतं.

❑ ❑ ❑

## प्रकरण २

# प्रकल्पक्षेत्राविषयी

भारतात जवळपास ७०० आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्र राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आणि त्यातील ३ आदिम जमाती आहेत. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १६.५ टक्के म्हणजे ५० हजार ७५७ चौ. किमी इतके मोठे आदिवासी क्षेत्र आहे. राज्यातल्या १५ जिल्ह्यांमध्ये आणि ६८ तालुक्यांमध्ये आदिवासींची मोठी संख्या आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात आदिवासींची लोकसंख्या एक कोटीहून अधिक आहे. म्हणजे राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के. देशातील एकूण आदिवासींपैकी १० टक्के आदिवासी महाराष्ट्रात रहातात. देशात आदिवासी लोकसंख्येबाबत मध्यप्रदेशा खालोखाल महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. सह्याद्री, सातपुडा आणि विंध्य पर्वतांच्या प्रदेशात राज्यातला आदिवासी वास्तव्य करून आहे. याशिवाय इतरत्रही आदिवासींची तुरळक वस्ती आहे.

**तक्ता २.१ – महाराष्ट्र – पाचव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेला भाग**

| | |
|---|---|
| जिल्हे (पूर्णपणे समाविष्ट) | ० |
| जिल्हे (आंशिकरित्या समाविष्ट) | १३ |
| तालुके (पूर्णपणे समाविष्ट) | २३ |
| तालुके (आंशिकरित्या समाविष्ट) | ३६ |
| ग्राम पंचायती | २८३५ |
| गावे ५ | ५९०५ |

महाराष्ट्रातील आदिवासींची अर्थव्यवस्था, समाजसंघटन, धर्मविधी, कला इत्यादी भारतातील आदिवासींप्रमाणेच आहेत. शेती हा मुख्य व्यवसाय, त्याशिवाय अन्नसंकलन, मासेमारी व शिकार हे राज्यातील आदिवासींचे इतर व्यवसाय आहेत. नैसर्गिक संसाधनांवर होत असलेल्या अतिक्रमणामुळे आदिवासींचे पारंपरिक व्यवसाय धोक्यात आले आहेत. परिणामी, उपजीविकेच्या शोधात आदिवासींना स्थलांतर करावं लागत आहे.

राज्याच्या मुख्यतः उत्तरेकडील डोंगराळ भागात आदिवासी समूह मोठ्या संख्येने आढळतात. कोकण, उत्तर महाराष्ट्र (खानदेश) आणि विदर्भात (पूर्व आणि पश्चिम दोन्ही) आदिवासींची संख्या मोठी आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही मोजक्या तालुक्यांमध्ये आदिवासींची मोठी संख्या आढळते. सदरच्या अभ्यासामध्ये प्रत्यक्ष माहिती मिळवण्यासाठी क्षेत्र निवडताना आदिवासींची मोठी संख्या असणाऱ्या राज्याच्या सर्व प्रमुख विभागांचं प्रतिनिधित्व असावं, हे सूत्र समोर ठेवलं होतं. त्यानुसार पुढील ठिकाणी सर्वेक्षण व प्राथमिक स्रोतांमधून माहिती मिळवण्याचं काम करण्यात आलं.

### तक्ता २.२ – प्रकल्पक्षेत्र

| जिल्हा | तालुका | ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा |
|---|---|---|---|
| अमरावती | धारणी | बैरागड | कोमडाढाणा |
| | | | टंगटंगढाणा |
| | | चटवाबोड | कसाईखेडा |
| | | कुटंगा | हरदा |
| | | | सावळखेडा |
| | | रंगूबेली | धोकडा |
| | | | खामदा |
| | | | किन्नीखेडा |
| | | | रंगूबेली |
| नांदेड | किनवट | अंबाडीतांडा | शिवरामखेड |
| | | | वरगुडा |
| | | घोटी | नवाखेड |
| | | जरूर | जरूर |
| | | जवरला | काजीपोड |
| | | | जवरला |
| | | कणकी | डोंगरगाव |
| नाशिक | इगतपुरी | आंबेवाडी | आंबेवाडी |
| | | | नांदुरकीची वाडी |
| | | भावली | धामडकी |
| | | | गवांदे (धारवाडी) |
| | | इंदोरे | इंदोरे |
| | | खडकेद | खडकेद |
| | | खेड | देवाची वाडी |
| | | | काननवाडी |
| | | | खेड |
| | | | ठाकूरवाडी |
| | | कुरुंगवाडी | कुरुंगवाडी |
| | | मानवेढे | जामुंडे |
| | | वासाळी | रामनगर |
| | | | सांबरवाडी |
| | | | वासाळी |
| पालघर | जव्हार | कासटवाडी | जयेश्वर |
| | | | रामनगर |

अभ्यासप्रकल्पासाठी निवडलेल्या क्षेत्रामध्ये विविध अनुसूचित जमाती आहेत. या प्रत्येक जमातीची स्वतःची वैशिष्ट्यं आहेत. सामाजिक–आर्थिक–राजकीय विकासाच्या बाबतीत त्यांच्यामध्ये भिन्नता आहे. उपजीविकेचे स्रोत, संसाधनांची मालकी याबाबतीत फरक आहे. आदिवासी म्हणजे एकजिनसी समाज नसतो. त्या समाजामध्येही – जमाती–जमातीमध्ये, जमातीअंतर्गतही विभिन्नता असते. ती समजून घेणं, प्रत्येक जमातीचा स्तर समजून घेणं, त्या–त्या जमातीमधील उतरंडी समजून घेणं अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक ठरतं.

अमरावती जिल्ह्यातील धारणीच्या परिसरामध्ये कोरकू आणि गोंड, नांदेडच्या किनवटमध्ये गोंड आणि कोलाम, नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीमध्ये महादेव कोळी आणि महादेव ठाकूर, तर पालघर जिल्ह्यातील जव्हारच्या परिसरामध्ये वारली आणि कोकणा जमातींची प्रमुख वस्ती आहे. या अनुसूचित जमातीपैकी गोंड हे ऐतिहासिकदृष्ट्या अधिक संघटीत आहेत. तर विकासाच्या निर्देशांकात महादेव कोळी आणि महादेव ठाकूर या जमाती इतर अनुसूचित जमातींच्या तुलनेत पुढारलेल्या आहेत. किनवटच्या परिसरातील कोलाम ही आदिम जमात आहे.

कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या चार विभागातील प्रत्येकी एक असे चार जिल्हे, प्रत्येक जिल्ह्यातील एक असे चार तालुके व या तालुक्यांमधील एकूण १८ ग्रामपंचायतींमधील एकूण ३३ गावं/पाडे/वाड्या/वस्त्या या अभ्यासासाठी निवडण्यात आल्या होत्या. एका मर्यादित अर्थाने, हा महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्राबाबतचा प्रातिनिधिक अभ्यास आहे, असं म्हणायला हरकत नाही. पेसा क्षेत्रातील ग्रामसभांमधला महिलांचा सहभाग व महिला सभांची वस्तुस्थिती समजून घेण्याच्या मुख्य उद्देशाने या क्षेत्रामध्ये पाहणी करून माहिती मिळवण्यात आली. पण यापलीकडे, या क्षेत्रातील आदिवासी विकास व शासनव्यवहाराबाबतची परिस्थिती समजून घेण्यासाठी व्यापक सामाजिक–आर्थिक माहितीही मिळवण्यात आली. त्यातून या क्षेत्रामधील सामाजिक–राजकीय–आर्थिक विकासाची परिस्थिती समजून येते.

## १. धारणी, जि. अमरावती

अमरावती जिल्हा हा मेळघाटमधील अतीव कुपोषणाच्या समस्येमुळे गेली किमान तीन दशके चर्चेत आहे. अमरावती जिल्ह्यामधील एकूण १४ तालुक्यांपैकी धारणी आणि चिखलदरा या दोन तालुक्यांचा समावेश पाचव्या अनुसूचीमध्ये करण्यात आला आहे. महत्त्वाचं म्हणजे हे दोन्ही तालुके पूर्णपणे अनुसूचित क्षेत्रातील तालुके म्हणून घोषित करण्यात आले आहेत. मेळघाट व्याघ्रप्रकल्पाच्या निसर्गसुंदर कुशीत वसलेला धारणी तालुका आदिवासींमधील कमालीच्या दारिद्र्याचं दर्शन घडवतो. सातपुडा पर्वताच्या रांगांमध्ये पहुडलेल्या या भागात कोरकू आणि गोंड या दोन अनुसूचित जमातींची मोठी संख्या आहे.

या अभ्यासासाठी निवडण्यात आलेली गावं ही पूर्णांशाने आदिवासी गावं आहेत. विकासापासून कोसो दूर असलेल्या या गावांतील लोकांचं जीवन केवळ कष्टाने भरलेलं आहे. रस्ते–पाणी–विजेसारख्या किमान गरजाही आजवर भागवल्या गेलेल्या नाहीत.

अभ्यासासाठी निवडलेल्या गावांमधील लोकसंख्या व त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :

**तक्ता २.३ – धारणीमधील प्रकल्पक्षेत्र**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | आदिवासी समुदाय | लोकसंख्या | साक्षरतेचे प्रमाण (%) | उपजीविका |
|---|---|---|---|---|---|
| बैरागड | कोमडाढाणा | गोंड, कोरकू | ४९८ | ८१ | शेती, शेतमजुरी |
| | टंगटंगढाणा | गोंड, कोरकू | १७३ | ७३ | शेती, शेतमजुरी |
| चटवाबोड | कसाईखेडा | कोरकू | ११२५ | ७० | शेती, शेतमजुरी |
| कुटंगा | हरदा | गोंड | ७३० | ७८ | शेती, शेतमजुरी |
| | सावळखेडा | कोरकू | ६१८ | ७० | शेती, शेतमजुरी |
| रंगूबेली | धोकडा | गोंड | २२१ | ७५ | शेती, शेतमजुरी |
| | खामदा | कोरकू | ३२७ | ८० | शेती, शेतमजुरी |
| | किन्नीखेडा | कोरकू | १८८ | ७२ | शेती, शेतमजुरी |
| | रंगूबेली | गोंड | ३०३ | ८२ | शेती, शेतमजुरी |

या भागातील घरं कौलारू, झाडपट्टीने बनवलेली आहेत. पक्की बांधकामं केलेली घरं क्वचितच आढळतात. पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी नळपाणी योजनेतून सोय केली आहे. गावाजवळून वाहणारे ओढे–नाले, नदी, विहिरी, आणि हापसे (बोअरवेल) हे पाण्याचे मुख्य स्रोत आहेत. शेती मुख्यतः पावसाच्या पाण्यावरच केली जाते. पावसाळा संपल्यानंतर पोटासाठी कामाच्या शोधात मध्य प्रदेशात आणि जिल्ह्याच्या–राज्याच्या इतर भागांमध्ये स्थलांतर करण्याचं प्रमाण मोठं आहे.

सर्व गावांमध्ये अंगणवाडी केंद्रं आणि प्राथमिक शाळा आहेत. केवळ रंगूबेलीमध्ये आरोग्य उपकेंद्र आहे. शिक्षक, अंगणवाडी सेविका, आरोग्यसेवक, रोजगारसेवक, आशा आणि पेसा कायद्याच्या प्रचार–प्रसारासाठी मोबिलायझर सर्व ग्रामपंचायतींमध्ये आहेत.

वनाधिकार कायदा व पेसा कायद्याची अंमलबजावणी काही वर्षांपूर्वीच सुरू झाली आहे. त्याचे तपशील पुढीलप्रमाणेः

### वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी

वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी अत्यंत धीमेपणाने सुरू आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या ९ गावांपैकी ५ गावांमध्ये वनहक्क कायद्याची कोणतीही प्रक्रिया करण्यात आलेली नाही. केवळ रंगूबेली या गावामध्ये सामूहिक दावा मान्य करण्यात आला आहे.

**तक्ता २.४ – वैयक्तिक दावे**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/ तांडा | दाखल | मंजूर | नामंजूर | प्रक्रियेत | एकूण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| बैरागड | कोमडाढाणा | | | | | |
| | टंगटंगढाणा | | | | | |
| चटवाबोड | कसाईखेडा | | | | | |
| कुटंगा | हरदा | | | | | |
| | सावळखेडा | | | | | |
| रंगूबेली | धोकडा | १४ | १२ | ०२ | | २३.७६ |
| | खामदा व किन्नीखेडा | २२ | १८ | ०४ | | ३५.८२ |
| | रंगूबेली | ३२ | २६ | ०६ | | ५१.४८ |

**तक्ता २.५ – सामूहिक दावे**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/ तांडा | दाखल (वर्ष) | मंजूर (वर्ष) | नामंजूर (वर्ष) | प्रक्रियेत | एकूण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| बैरागड | कोमडाढाणा | | | | | |
| | टंगटंगढाणा | | | | | |
| चटवाबोड | कसाईखेडा | | | | | |
| कुटंगा | हरदा | | | | | |
| | सावळखेडा | | | | | |
| रंगूबेली | धोकडा | | | | | |
| | खामदा व किन्नीखेडा | | | | | |
| | रंगूबेली | २०१२ | २०१२ | | | २०८.५७ |

**पेसा कायद्याची अंमलबजावणी**

२०१४ साली पेसा नियम अस्तित्त्वात आल्यानंतर प्रकल्पक्षेत्रातील गावांमध्ये पेसा कायद्यानुसार अंमलबजावणी सुरू झाली आहे, असं स्थानिक कार्यकर्त्यांनी नोंदवलं आहे. प्रकल्पक्षेत्रातील गावांमध्ये पेसाची अंमलबजावणी सुरू होऊन केवळ २–३ वर्षंच झाली आहेत.

**तक्ता २.६ – पेसा कायद्याची अंमलबजावणी**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | अंमलबजावणीचे वर्ष |
|---|---|---|
| बैरागड | कोमडाढाणा | २०१८ |
| | टंगटंगढाणा | २०१७ |
| चटवाबोड | कसाईखेडा | २०१७ |
| कुटंगा | हरदा | २०१८ |
| | सावळखेडा | २०१८ |
| रंगूबेली | धोकडा | २०१८ |
| | खामदा | २०१८ |
| | किन्नीखेडा | २०१७ |
| | रंगूबेली | २०१८ |

## २. किनवट, नांदेड

पाचव्या अनुसूचीमध्ये मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील केवळ किनवट आणि माहूर या दोनच तालुक्यांचा आंशिक समावेश होतो. पूर्व विदर्भ आणि तेलंगण यांच्या सीमेवरील डोंगराळ वनाच्छादित भागात कोलाम आणि गोंड आदिवासींचं वास्तव्य आहे. नांदेड जिल्ह्यातील माहूर आणि किनवटचा आदिवासी पट्टा भौगोलिकदृष्ट्या याच भागात येतो. हा भाग पूर्वी हैदराबाद संस्थानामध्ये होता. आजही तेलंगणातील आदिलाबादशी या भागाचे सामाजिक–सांस्कृतिक–आर्थिक संबंध टिकून आहेत. नांदेड हे जिल्ह्याचं ठिकाण किनवटपासून १६० किलोमीटर अंतरावर आहे. किनवटमधील आदिवासी गावांचा किनवट–नांदेडपेक्षा यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्याशी अधिक संबंध आहे. प्रशासकीयदृष्ट्या किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या अखत्यारीत हा भाग येतो.

मराठवाड्याला भेडसावणाऱ्या दुष्काळाचे चटके किनवटमधील आदिवासी भागालाही बसतात. निजामाच्या काळामध्ये आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी विशेष सोयी केल्याचं जुनेजाणते लोक सांगतात. रस्ते–वीज–पाणी–शाळा अशा मूलभूत सुविधा या भागामध्ये गावागावापर्यंत पोचल्या आहेत. उच्चशिक्षणाच्या अपुऱ्या सोयी, रोजगाराच्या–उपजीविकेच्या संधींची वानवा व वनखात्याशी संघर्ष या समस्या येथील आदिवासी समूहांना भेडसावताना दिसतात.

अभ्यासासाठी निवडलेल्या गावांमधील लोकसंख्या व त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :

**तक्ता २.७ – किनवटमधील प्रकल्पक्षेत्र**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/ तांडा | आदिवासी समुदाय | लोकसंख्या | साक्षरतेचे प्रमाण (%) | उपजीविका |
|---|---|---|---|---|---|
| अंबाडीतांडा | शिवरामखेड | गोंड | १८४७ | | शेती, शेतमजुरी, इतर रोजंदारी काम, वनोपज गोळा करणे, बांबू काम |
| | वरगुडा | गोंड | १३८ | | |
| घोटी | नवाखेड | गोंड | ३२५ | | |
| जरूर | जरूर | गोंड | २७६ | | |
| जवरला | काजीपोड | कोलाम | ७८ | | |
| | जवरला | गोंड | १८४७ | | |
| कणकी | डोंगरगाव | गोंड | ४४२ | | |

या भागातील बहुतांश घरं पक्कं बांधकाम केलेली आहेत. कोलाम समुदायाच्या वस्त्यांमध्ये कच्च्या घरांचं प्रमाण आढळतं. पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी नळपाणी योजनेतून सोय केली आहे. गावाजवळून वाहणारे ओढे–नाले, विहिरी आणि बोअरवेल हे पाण्याचे मुख्य स्रोत आहेत. शेती मुख्यतः पावसाच्या पाण्यावरच केली जाते. पावसाळा संपल्यानंतर पोटासाठी रोजंदारीच्या कामावर आणि जंगलातून गौण वनोपज गोळा करणं, मासेमारी अशा कामांवर अवलंबून रहावं लागतं.

सर्व गावांमध्ये अंगणवाडी केंद्रं आणि प्राथमिक शाळा आहेत. ग्रामपंचायतीच्या निवडक मुख्य गावांमध्येच आरोग्य उपकेंद्रं आहेत. अर्थात, तिथे मिळणाऱ्या आरोग्यसेवेबाबत प्रश्न आहेतच. शिक्षक, अंगणवाडी सेविका व मदतनीस, आरोग्यसेवक, रोजगारसेवक, आशा वर्कर आहेत. पेसा कायद्याच्या प्रचार–प्रसारासाठी मोबिलायझरची नियुक्ती झालेली नाही.

वनाधिकार कायदा व पेसा कायद्याची अंमलबजावणी सुरू आहे. त्याचे तपशील पुढीलप्रमाणेः

### वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी

अभ्यासासाठी निवडलेल्या बहुतांश गावांमध्ये वनाधिकार कायद्यांतर्गत वनहक्क दावे मिळाल्याचं दिसतं. ७ गावांपैकी ३ गावांमध्ये वैयक्तिक दाव्यांबाबत काही प्रक्रिया झाल्याचं कार्यकर्त्यांकडून मिळालेल्या माहितीवरून दिसत नाही. एक दखल घेण्याजोगी बाब म्हणजे ७ पैकी ६ गावांमध्ये सामूहिक वनहक्क दावे मंजूर झाले आहेत.

**तक्ता २.८ – वैयक्तिक दावे**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/ तांडा | दाखल (वर्ष) | मंजूर (वर्ष) | नामंजूर (वर्ष) | प्रक्रियेत | एकूण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| अंबाडीतांडा | शिवरामखेड | २२ | १८ | ०४ | | ४.५ एकर |
| | वरगुडा | ०८ | ०८ | | | १८.५ एकर |
| घोटी | नवाखेड | | | | | |
| जरूर | जरूर | | | | | |
| जवरला | काजीपोड | २३ | २३ | | | ५७.५ एकर |
| | जवरला | ०२ | ०२ | | | ५ एकर |
| कणकी | डोंगरगाव | | | | | |

**तक्ता २.९ – सामूहिक दावे**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/ तांडा | दाखल (वर्ष) | मंजूर (वर्ष) | नामंजूर (वर्ष) | प्रक्रियेत | एकूण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| अंबाडीतांडा | शिवरामखेड | १ | १ | | | १०,००० एकर |
| | वरगुडा | १ | १ | | | १०,००० एकर |
| घोटी | नवाखेड | | | | | |
| जरूर | जरूर | १ | १ | | | ८५६ एकर |
| जवरला | काजीपोड | १ | १ | | | ९०० एकर |
| | जवरला | १ | १ | | | १६४३ एकर |
| कणकी | डोंगरगाव | १ | १ | | | १५६८ एकर |

**पेसा कायद्याची अंमलबजावणी**

प्रकल्पक्षेत्रातील बहुतांश गावांमध्ये पेसा कायद्याची अंलबजावणी २०१३ सालीच सुरू झाली. केवळ दोन गावांमध्ये नुकतीच म्हणजे २०१८–१९ साली अंमलबजावणी सुरू झाली आहे.

**तक्ता २.१० – पेसा कायद्याची अंमलबजावणी**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | अंमलबजावणीचे वर्ष |
|---|---|---|
| अंबाडीतांडा | शिवरामखेड | २०१३ |
| | वरगुडा | २०१३ |
| घोटी | नवाखेड | २०१३ |
| जरूर | जरूर | २०१८–१९ |
| जवरला | काजीपोड | २०१३ |
| | जवरला | २०१३ |
| कणकी | डोंगरगाव | २०१८–१९ |

या भागातील सजग आदिवासी नेतृत्त्व आणि तेलंगणातील धोरणांचा व अंमलबजावणीचा परिणाम यामुळे मुख्यतः आदिवासी स्वशासनाबाबत अधिक जागरूकता दिसून येते. याशिवाय, अभ्यासासाठी निवडलेल्या गावांमधील जवरला हे गाव तत्कालीन राज्यपाल श्री. विद्यासागर राव यांनी दत्तक घेतलं होतं. त्यांना आदिवासी प्रश्नांविषयी विशेष तळमळ असल्याने जवरलामध्ये आदिवासी स्वशासनाच्या दृष्टीने अनेक उपक्रम राबवण्यात आले. त्याचा परिणाम म्हणूनही किनवटच्या भागातील आदिवासी गावांमध्ये वनाधिकार, पेसा अशा कायद्यांबाबत अधिक समाधानकारक काम झालेलं दिसतं.

### ३. इगतपुरी, नाशिक

सातपुडा पर्वताच्या कुशीतला नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेकडचा भाग हा डोंगराळ आणि आदिवासींची मोठी संख्या असलेला आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये कोकणा, महादेव कोळी व महादेव ठाकूर या अनुसूचित जमातींची संख्या मोठी आहे. पेठ, सुरगाणा व कळवण हे पाचव्या अनुसूचीमध्ये पूर्णांशाने समावेश केलेले तालुके आहेत. इगतपुरी, दिंडोरी, त्रिंबकेश्वर, बागलाण, देवळा या तालुक्यांमधील काही गावांचा समावेश पाचव्या अनुसूचीमध्ये केलेला आहे. या अभ्यासासाठी इगतपुरी तालुक्यातील गावं निवडली होती. या गावांमध्ये मुख्यतः महादेव कोळी आणि महादेव ठाकूर या अनुसूचित जमाती आढळतात. कोकणात आदिवासींची संख्या तुरळक आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या गावांमधील लोकसंख्या व त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :

**तक्ता २.११ – इगतपुरीमधील प्रकल्पक्षेत्र**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | आदिवासी समुदाय | लोकसंख्या | साक्षरतेचे प्रमाण (%) | उपजीविका |
|---|---|---|---|---|---|
| आंबेवाडी | आंबेवाडी | कोळी महादेव | ९३० | ७१ | शेती, शेतमजुरी, रोजंदारी काम, इतर व्यवसाय |
| | नांदुरकीची वाडी | महादेव ठाकूर | २०० | ३० | |
| भावली | धामडकी | महादेव ठाकूर | ७६० | ३५ | |
| | गवांदे (धारवाडी) | महादेव ठाकूर | ११० | ४० | |
| इंदोरे | इंदोरे | महादेव कोळी, महादेव ठाकूर | २००० | ७० | |
| खडकेद | खडकेद | महादेव कोळी, महादेव ठाकूर | १२५० | ८५ | |
| खेड | देवाची वाडी | | | | |
| | काननवाडी | महादेव कोळी, महादेव ठाकूर | ३५० | ८० | |
| | खेड | महादेव कोळी | ५८० | ९० | |
| | ठाकूरवाडी | | | | |
| कुरुंगवाडी | कुरुंगवाडी | महादेव ठाकूर | १२३० | ४० | |
| मानवेढे | जामुंडे | महादेव ठाकूर | ८२० | | |
| वासाळी | रामनगर | महादेव कोळी | ८४० | ८७ | |
| | सांबरवाडी | कोळी महादेव | १३० | ७० | |
| | वासाळी | महादेव कोळी | १८५० | ८० | |

इगतपुरीमधील अभ्यासासाठी निवडलेल्या गावांमध्ये प्रामुख्याने कच्चं बांधकाम असलेली, गवताने छप्पर शाकारलेली घरं आहेत. आदिवासींची पक्कं बांधकाम केलेली मोजकीच घरं आहेत. पिण्याच्या व घरगुती वापराच्या पाण्यासाठी मुख्यतः विहिरींवर अवलंबून राहावं लागतं. काही गावांमध्ये पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा नळाद्वारे होतो. नदी, विहिरी, तलाव व झरे हे पाण्याचे मुख्य स्रोत आहेत. शेती मुख्यतः पावसाच्या पाण्यावरच होते. सिंचनाची सोय नसल्याने वर्षात पावसाळ्यामध्येच शेती पिकते. शेती हा मुख्य व्यवसाय दिसत असला, तरी खरं उत्पन्न शेतमजुरी व इतर रोजंदारीच्या कामातून मिळतं.

सर्व गावांमध्ये अंगणवाडी केंद्र आहेत. काही अपवाद वगळता प्राथमिक शाळाही आहेत. त्यापुढच्या शिक्षणासाठी आश्रमशाळेत किंवा इगतपुरीला जावं लागतं. ग्रामपंचायतीच्या निवडक मुख्य गावांमध्येच आरोग्याच्या सुविधा उपलब्ध आहेत. केवळ मोठ्या गावांमध्येच बँका व पतसंस्था आहेत.

शिक्षक, अंगणवाडी सेविका व मदतनीस, आरोग्यसेवक, रोजगारसेवक, आशा वर्कर बहुतेक सर्व गावांमध्ये आहेत. पेसा कायद्याच्या प्रचार–प्रसारासाठी मोबिलायझरची नियुक्ती झालेली आहे, पण त्यांचं काहीच काम दिसत नाही.

वनाधिकार कायदा व पेसा कायद्याची अंमलबजावणी सुरू आहे. त्याचे तपशील पुढीलप्रमाणेः

**वनाधिकार कायदा**

वनाधिकार कायद्याबाबत दावे दाखल करण्याचं काम सर्व गावांमध्ये झालेलं आहे. दाखल केलेल्या दाव्यांपैकी एकही दावा नामंजूर झालेला नाही, अशी माहिती स्थानिक कार्यकर्त्यांनी दिली. अभ्यासासाठी निवडलेल्या १४ गावा–पाड्यांपैकी ९ गावांमधून सामूहिक वनहक्क दावे सादर करण्यात आले आहेत. त्यातील दोन दावे मंजूर झाले आहेत, तर उरलेल्या दाव्यांबाबत प्रक्रिया सुरू आहे. वनाधिकार कायद्याची चांगली अंमलबजावणी ही पुढील कामासाठी मदतकारक ठरू शकते.

## तक्ता २.१२ – वैयक्तिक दावे

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | दाखल | मंजूर | नामंजूर | प्रक्रियेत | एकूण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| आंबेवाडी | आंबेवाडी | १०६ | ५६ | | ५० | ४०० |
| | नांदुरकीची वाडी | २२ | | | २२ | २५ |
| भावली | धामडकी | ३६ | १९ | | १७ | २५ |
| | गवांदे (धारवाडी) | २५ | | | २५ | ११ |
| इंदोरे | इंदोरे | ८४ | ४० | | ४४ | ६४० |
| खडकेद | खडकेद | १२३ | ६६ | | ५७ | ४०३ |
| खेड | देवाची वाडी | | | | | |
| | काननवाडी | १० | ३ | | ७ | ६० |
| | खेड | ४० | २६ | | १४ | ४३० |
| | ठाकूरवाडी | | | | | |
| कुरुंगवाडी | कुरुंगवाडी | ७५ | ३५ | | ४० | ९६० |
| मानवेढे | जामुंडे | ४० | १९ | | २१ | १२० |
| वासाळी | रामनगर | २० | ६ | | १४ | १३५ |
| | सांबरवाडी | २४ | | | २४ | ५० |
| | वासाळी | ५० | २२ | | २८ | ४३५ |

**तक्ता २.१३ – सामूहिक दावे**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/ तांडा | दाखल | मंजूर | नामंजूर | प्रक्रियेत | एकूण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| आंबेवाडी | आंबेवाडी | १ | | | १ | ४०० |
| | नांदुरकीची वाडी | १ | | | १ | २५ |
| भावली | धामडकी | १ | १ | | | ७२ |
| | गवांदे (धारवाडी) | १ | | | १ | ११ |
| इंदोरे | इंदोरे | १ | | | १ | ४०३ |
| खडकेद | खडकेद | १ | | | १ | ४०३ |
| खेड | देवाची वाडी | | | | | |
| | काननवाडी | | | | | ६० |
| | खेड | १ | | | १ | ४३० |
| | ठाकूरवाडी | | | | | |
| कुरुंगवाडी | कुरुंगवाडी | २ | १ | | १ | ९६० |
| मानवेढे | जामुंडे | | | | | १२० |
| वासाळी | रामनगर | | | | | १३५ |
| | सांबरवाडी | १ | | | १ | ५० |
| | वासाळी | १ | | | १ | ४३५ |

**पेसा कायद्याची अंमलबजावणी**

प्रकल्पक्षेत्रातील गावांमध्ये पेसा कायद्यानुसार पंचायत कायद्याची अंमलबजावणी काही वर्षांपासूनच सुरू झाली आहे. २०१३ साली दोन गावांमध्ये आणि इतर गावांमध्ये केवळ दोनेक वर्षांपासून म्हणजे २०१६–१७ पासून अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. त्या अर्थाने, पेसा कायदा आणि त्यांची अंमलबजावणी ही या गावांसाठी तशी नवी बाब आहे.

**तक्ता २.१४ – पेसा कायद्याची अंमलबजावणी**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | अंमलबजावणीचे वर्ष |
|---|---|---|
| आंबेवाडी | आंबेवाडी | २०१६ |
| | नांदुरकीची वाडी | २०१६ |
| भावली | धामडकी | २०१३ |
| | गवांदे (धारवाडी) | २०१६ |
| इंदोरे | इंदोरे | २०१७ |
| खडकेद | खडकेद | २०१५ |
| खेड | देवाची वाडी | |
| | काननवाडी | २०१७ |
| | खेड | २०१६ |
| | ठाकूरवाडी | |
| कुरुंगवाडी | कुरुंगवाडी | २०१३ |
| मानवेढे | जामुंडे | २०१६ |
| वासाळी | रामनगर | २०१७ |
| | सांबरवाडी | २०१७ |
| | वासाळी | २०१७ |

**४. जव्हार, पालघर**

पालघर हा ठाणे जिल्ह्यामधून काही वर्षांपूर्वीच वेगळा करण्यात आला. पूर्वीच्या ठाणे जिल्ह्याचा उत्तरेकडील आदिवासीबहुल भाग नवनिर्मित पालघर जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे पालघर जिल्ह्याचं रुपडं प्रामुख्याने आदिवासी आहे. पालघर व वसई या तालुक्यांमधील काही गावांचा समावेश पाचव्या अनुसूचीमध्ये करण्यात आला आहे, तर डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा हे तालुके पूर्णपणे अनुसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. पालघर जिल्ह्यामध्ये वारली हा प्रमुख आदिवासी समाज आहे. कोकणा, महादेव कोळी आणि वारली समुदायांचंही प्रमाण आढळतं.

पालघर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येमध्ये अनुसूचित जमातींचं प्रमाण ३७.३९ टक्के आहे. त्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि तलासरी या तालुक्यांमध्ये हे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक आहे. आदिवासीबहुल तालुक्यांमधील

ग्रामीण भागातील सुमारे ७० टक्के कुटुंबं दारिद्र्यरेषेखाली आहेत. साक्षरतेचं प्रमाण संपूर्ण लोकसंख्येसाठी ८५ टक्के आहे, तर अनुसूचित जमातींमध्ये हे प्रमाण ५९ टक्के इतकं कमी आहे.

या अभ्यासासाठी कासटवाडी ग्रामपंचायतीमधील जयेश्वर (बालकापरा) व रामनगर ही दोन गावं निवडण्यात आली होती. या दोन गावांमधील आदिवासी लोकसंख्येची माहिती पुढीलप्रमाणे –

**तक्ता २.१५ – जव्हारमधील प्रकल्पक्षेत्र**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | आदिवासी समुदाय | लोकसंख्या | साक्षरतेचे प्रमाण (%) | उपजीविका |
|---|---|---|---|---|---|
| कासटवाडी | जयेश्वर | महादेव कोळी, कोकणा, वारली, कातकरी | ३०५ | ८० | शेती, शेतमजुरी, रोजंदारी, स्वयंव्यवसाय |
| | रामनगर | कोकणा, वारली | २९२ | ७६ | |

शेती हा येथील जीवनाचा आधार असला, तरी शेतमजुरी व इतर रोजंदारी काम हे उपजीविकेचे प्रमुख स्रोत आहेत.

जव्हार शहरानजीक ही गावं आहेत. त्याचा परिणाम येथील जीवनावर जाणवतो. या गावांमधील घरं मुख्यतः पक्क्या बांधकामाची आहेत. पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी विहीर व कूपनलिकांचा वापर केला जातो. जनावरांसाठी बंधाऱ्यातील पाणी, तर शेतीसाठी पावसावर अवलंबून राहावं लागतं. दोन्ही गावांमध्ये अंगणवाडी आणि प्राथमिक शाळा आहेत. वैद्यकीय सुविधा मात्र गावात उपलब्ध नाही. रस्ते व दळणवळणाच्या सोयी आहेत. बँका–पतसंस्था गावात नाहीत.

**वनाधिकार कायदा**

आदिवासी समूहांसाठी महत्त्वाच्या असलेल्या वनाधिकार कायद्याबाबत या भागात बरंच काम झाल्याचं दिसून येतं. जयेश्वर व रामनगर या दोन्ही गावांमध्ये वनाधिकार कायद्यांतर्गत वैयक्तिक दावे दाखल करण्याचं काम झालं आहे. जयेश्वरमध्ये जवळपास निम्मे दावे नामंजूर झाले आहेत. सामूहिक दाव्यांची मात्र कोणतीच प्रक्रिया करण्यात आलेली नाही.

**तक्ता २.१६ – वैयक्तिक दावे**

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | दाखल | मंजूर | नामंजूर | प्रक्रियेत | एकूण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| कासटवाडी | जयेश्वर | ७५ | ३२ | ३० | १३ | ५० एकर |
| | रामनगर | ४५ | २८ | | १७ | ३५ एकर |

### तक्ता २.१७ – सामूहिक दावे

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | दाखल | मंजूर | नामंजूर | प्रक्रियेत | एकूण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| कासटवाडी | जयेश्वर | | | | | |
| | रामनगर | | | | | |

**पेसा कायद्याची अंमलबजावणी**

पेसा नियमावली अमलात आल्यानंतर पेसा कायद्याच्या अनुषंघाने ग्राम पंचायत कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्याचं दिसतं. त्या अर्थाने, पेसा कायद्याच्या दृष्टीने नुकतीच सुरुवात झालेली आहे, असं म्हणणं योग्य ठरेल.

### तक्ता २.१८ – पेसा कायद्याची अंमलबजावणी

| ग्राम पंचायत | गाव/पाडा/वस्ती/तांडा | अंमलबजावणीचे वर्ष |
|---|---|---|
| कासटवाडी | जयेश्वर | २०१७–१८ |
| | रामनगर | २०१७–१८ |

❑ ❑ ❑

## प्रकरण ३

# संशोधन पद्धती

महाराष्ट्रातील वंचित समूहांसाठी काम करणाऱ्या इकोनेट संस्थेला पेसा क्षेत्रातील ग्रामसभांमधील महिलांचा सहभाग आणि महिला सभा या संदर्भाने काम करण्याची गरज जाणवत होती. कामाची नेमकी दिशा ठरवण्यासाठी या विषयावर अभ्यास करण्याची कल्पना समोर आली. त्यादृष्टीने आपल्या कार्यक्षेत्रातील विशिष्ट ग्रामपंचायत क्षेत्र इकोनेटने अभ्यासासाठी निवडलं. त्या विशिष्ट क्षेत्रात हा अभ्यास करण्यात आला. अर्थात एका मर्यादित अर्थाने, हा महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्राबाबतचा प्रातिनिधिक अभ्यास आहे, असं म्हणायला हरकत नाही. पेसा क्षेत्रातील ग्रामसभांमधील महिलांचा सहभाग आणि महिला सभा याबाबतचं वास्तव समजून घेण्याच्या मुख्य उद्देशाने या क्षेत्रामध्ये पाहणी करून माहिती मिळवण्यात आली. पण यापलीकडे, या क्षेत्रातील आदिवासी विकास व शासनव्यवहाराबाबतची परिस्थिती समजून घेण्यासाठी व्यापक सामाजिक–आर्थिक माहितीही मिळवण्यात आली.

प्रत्यक्ष नमुना पाहणीला सुरुवात करण्याआधी दुय्यम स्रोतांमधील माहितीचं संकलन करण्यात आलं.

### अ) दुय्यम स्रोतांमधून माहितीचं संकलन

महाराष्ट्रातील आदिवासींचं आणि त्यातही प्रामुख्याने महिलाविषयक सामाजिक–आर्थिक–राजकीय वास्तव, पेसा कायदा व महाराष्ट्रातील ग्रामपंचायत अधिनियमामधील सुधारणा, महिला सभाविषयक तरतुदीची पार्श्वभूमी, आजवर झालेले यासंदर्भातले अभ्यास याबाबत प्रामुख्याने अधिकृत शासकीय प्रकाशनं, वेबसाईट, बिगर शासकीय संस्थांची प्रकाशनं यांच्या माध्यमातून माहिती मिळवण्यात आली. त्याचा तपशील पुढीलप्रमाणेः

### आकडेवारी, घटनात्मक तरतुदी आणि कायदेविषयक माहिती

आदिवासी समुदायांबाबतची अधिकृत माहिती मराठी विश्वकोशामध्ये उपलब्ध आहे. प्रकल्पक्षेत्रातील आदिवासी

समूहांबद्दलची ऐतिहासिक माहिती विश्वकोशामधून घेण्यात आली. आदिवासी संशोधन व विकास संस्थेने, विशेषतः या संस्थेचे माजी संचालक डॉ. गोविंद गारे यांनी महाराष्ट्रातील आदिवासी समूहांच्या सामाजिक–आर्थिक–राजकीय परिस्थितीबाबत संशोधन करून माहितीपर पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत. प्रकल्पक्षेत्रातील आदिवासी समूहांची सामाजिक–आर्थिक–राजकीय परिस्थिती समजून घेण्यासाठी या पुस्तिकांचा मोलाचा उपयोग झाला.

प्रकल्पक्षेत्रातील आदिवासी समूहांची लोकसंख्याविषयक माहिती २०११ च्या जनगणना अहवालामधून घेण्यात आली. प्रकल्पक्षेत्रातील गावं ज्या तालुक्यांमध्ये, जिल्ह्यांमध्ये येतात, त्यांच्याविषयीची माहिती घेण्यासाठी जिल्हा सामाजिक–आर्थिक समालोचनाच्या अहवालांचा संदर्भ घेण्यात आला. या अहवालांमधून व जनगणनेच्या अहवालांमधून प्रकल्पक्षेत्रातील गावांमधील घरांची स्थिती, गावांमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा याबाबत मोलाची माहिती मिळाली. त्याचबरोबर महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२ व केळकर समितीच्या अहवालामध्ये राज्यातील आदिवासी समूहांच्या सद्यःस्थितीबाबत नेमकं विश्लेषण करण्यात आलं आहे. त्याचाही आढावा अभ्यासाच्या पूर्वतयारीसाठी करण्यात आला. त्याचबरोबर काही संस्था–संघटना–व्यक्तींनी वेळोवेळी केलेल्या संशोधनपर कामांचे अहवालही संदर्भासाठी वापरण्यात आले.

देशातील आदिवासींना विकासाची समान संधी देण्यासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. राज्यघटनेतील पाचव्या व सहाव्या अनुसूचीमध्ये आदिवासींची लक्षणीय संख्या असलेली क्षेत्रे अनुसूचित करण्यात आली. या क्षेत्रांसाठी विशेष कायदे, धोरणं, तरतुदी करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारांवर देण्यात आली. पाचव्या अनुसूचित क्षेत्रातील भाग ज्या राज्यांमध्ये येतात, त्या राज्यांच्या राज्यपालांना या क्षेत्रासाठी काही खास धोरणं करण्याचे, कायद्यांमध्ये सुधारणा करण्याचे अधिकार देण्यात आले. याबाबतची माहिती भारतीय राज्यघटना व संबंधित अभ्यासांमधून मिळवण्यात आली.

देशातील आदिवासींनी स्वशासनाचा अधिकार देणारा पेसा कायदा १९९६ साली देशाच्या पातळीवर संमत करण्यात आला. त्यापाठोपाठ १९९७ मध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आल्या. त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने पेसा कायद्याशी मेळ खाणारी नियमावली २०१४ साली बनवण्यात आली. आदिवासींवरील ऐतिहासिक अन्याय दूर करणारा वनाधिकार कायदा २००६ साली अमलात आला. अनुसूचित जमातींसाठी आदिवासी उपयोजना या नावाने विशेष अर्थसंकल्पीय तरतूद पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून करण्यात येऊ लागली.

७३ वी घटनादुरुस्ती, पंचायतराज, महिला आरक्षण, ग्रामपंचायतीत महिलांना ५०% आरक्षणाचं पाऊल याविषयीची माहिती अधिकृत शासकीय पुस्तिका, शासकीय व इतर विश्वासार्ह संकेतस्थळं, बिगर शासकीय संस्थांनी वेळोवेळी प्रकाशित केलेल्या पुस्तिका यावरून घेण्यात आली.

महाराष्ट्रात १२ ऑक्टोबर २००२ रोजी तत्कालीन राज्यपाल महम्मद फैजल यांच्या स्वाक्षरीने महिला सभेविषयीची अधिसूचना (जी आर क्र. १२, १६ ऑक्टोबर २००२, मुंबई ग्रामपंचायत कायद्यातील कलम ७ विभाग ३ मधील दुरुस्ती) जारी झाली. २६ जानेवारी २००३ रोजी राज्यातल्या सर्व गावांमध्ये महिलासभा घेण्याची घोषणा तत्कालीन ग्रामविकास, स्वच्छता व पाणीपुरवठामंत्री आर. आर. पाटील यांनी केली आणि महाराष्ट्र हे महिला सभा सुरू करणारं देशातलं पहिलं राज्य ठरलं. या साऱ्याबाबतची माहिती अधिकृत शासकीय संकेतस्थळांवरून घेण्यात आली. याशिवाय काही संस्था–संघटना–व्यक्तींनी वेळोवेळी केलेल्या संशोधनपर कामांचे अहवाल व कार्यशाळांसाठी उपयुक्त ठरेल असे माहितीचे पुस्तिका स्वरूपातले संकलनही वापरण्यात आले.

### विविध संस्था–संघटना–व्यक्तींचं संदर्भसाहित्य

अधिकृत शासकीय प्रकाशन–साहित्याबरोबरच विविध संस्था–संघटना–व्यक्तींनी केलेल्या अभ्यासांचा व प्रकाशनांचा उपयोग झाला. यामध्ये विशेष उल्लेख केला पाहिजे तो महिला राजसत्ता आंदोलन, डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट, अफार्म व भारतीय शिक्षण संस्था, राज्य साधन केंद्र अशा प्रकल्प–संस्था–संघटनांनी केलेल्या कामाचा. पंचायतराज व्यवस्थेसंदर्भाने या सर्वांनी अतिशय मूलभूत व मोलाचं काम केलं आहे. त्याचा आधार घेऊन पुढे जाणं श्रेयस्कर ठरलं. एकूणच विकेंद्रीकरण, आदिवासी स्वशासन व विकास आणि सामाजिक–आर्थिक–राजकीय व्यवस्थेतला, निर्णयप्रक्रियेतला महिलांचा सहभाग व हस्तक्षेप याबाबत केवळ माहितीच्या पलीकडे जाऊन दृष्टी देणारी छोटी, सोप्या भाषेतली प्रकाशनं अभ्यासाची पूर्वतयारी करण्यासाठी आणि अभ्यासाला दिशा देण्यासाठी तसंच मांडणी करण्यासाठी महत्त्वाची ठरली.

### मुलाखती

जाणत्या अभ्यासू कार्यकर्त्यांच्या अनुभवाचंही प्रकाशित साहित्याइतकंच, किंबहुना थोडं अधिकच महत्त्व असतं. सदरच्या अभ्यासप्रकल्पाच्या पूर्वतयारीसाठी आणि अभ्यासविषयाबाबत काही निवडक अभ्यासक–कार्यकर्त्यांशी संवाद करण्यात आला.

### ब) प्राथमिक स्रोतांमधून माहिती संकलन

प्रकल्पक्षेत्रातील गावांची निवड करताना माहिती मिळण्यातील सुलभता हा महत्त्वाचा निकष ठरवण्यात आला होता. त्यादृष्टीने इकोनेट संस्थेच्या कामाशी संबंधित कार्यकर्ते काम करत असलेल्या गावांची निवड करण्यात आली. ही निवड जबाबदार स्थानिक कार्यकर्ते व इकोनेट संस्थेतील कार्यकर्ते यांच्या सूचनेनुसार करण्यात आली.

दुय्यम स्रोतांमधून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रकल्पक्षेत्रातून माहिती संकलनासाठी मुद्दे व प्रश्नावली तयार

करण्यात आल्या. प्रकल्पक्षेत्रामधून माहिती संकलनासाठी  नमुना सर्वेक्षण, मुलाखती व गटचर्चा या पद्धती वापरण्यात आल्या. संख्याशास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नमुना पाहणीसाठी संख्या ठरवण्यात आली व प्रश्नावली तयार करण्यात आल्या. काही गावांमध्ये त्यांची तपासणी करून त्यांना अंतिम रूप देण्यात आलं.

कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या चार विभागातील प्रत्येकी एक असे चार जिल्हे, प्रत्येक जिल्ह्यातील एक असे चार तालुके व या तालुक्यांमधील एकूण १८ ग्रामपंचायतींमधील एकूण ३३ गावं/पाडे/वाड्या/वस्त्या या अभ्यासासाठी निवडण्यात आल्या होत्या.

### १. नमुना सर्वेक्षण

प्रकल्पक्षेत्रातील एकूण आदिवासी कुटुंबांपैकी साधारण १० टक्के  कुटुंबांतील एका महिलेला  बोलतं करून सर्वेक्षकाने प्रश्नावली भरायची व त्याआधारे नमुना पाहणी करायची असं ठरवण्यात आलं होतं. वेळेची उपलब्धता लक्षात घेऊन ज्या गावांमध्ये ५० पेक्षा कमी आदिवासी कुटुंबं असतील, त्या गावात ५ कुटुंबांतल्या महिलांकडून, तर जिथे ५० पेक्षा अधिक आदिवासी कुटुंबं असतील, त्या ठिकाणी १० कुटुंबांतल्या महिलांकडून माहिती मिळवण्याचं ठरवण्यात आलं. एकाच गावात राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांची आणि त्या कुटुंबातल्या महिलांची आर्थिक–सामाजिक स्थिती परस्परांहून फारशी वेगळी नसते. त्यामुळे अत्यंत सोप्या पद्धतीने कुटुंबांची निवड करण्यात आली. गावातील घरं माहीत असणाऱ्या जाणकार व्यक्तीकडून कुटुंबांची क्रमवार यादी बनवून मग त्या यादीतून गावातील एकूण आदिवासी घरांपैकी प्रत्येक पाचवं किंवा प्रत्येक आठवं, दहावं घर निवडण्यात आलं. त्या घरात कुणी नसेल, तर त्या घराच्या जवळचं आधीचं किंवा नंतरचं घर निवडण्यात आलं. अशा प्रकारे २३४ घरातील प्रत्येकी एका महिलेकडून ग्रामसभेबद्दलची जागरूकता, सहभाग आणि महिला सभेविषयीची जागरूकता व सहभाग याविषयीची माहिती मिळवण्यासाठी प्रत्येक महिलेला प्रश्न विचारून, बोलतं करून सर्वेक्षकांनी प्रश्नावली स्वतः भरली.

**तक्ता ३.१ – नमुना सर्वेक्षण**

| जिल्हा | तालुका | ग्राम पंचायत | गाव पाडा वस्ती तांडा | नमुना संख्या |
|---|---|---|---|---|
| अमरावती | धारणी | बैरागड | कोमडाढाणा | १० |
| | | | टंगटंगढाणा | ५ |
| | | चटवाबोड | कसाईखेडा | १० |
| | | कुटंगा | हरदा | १० |
| | | | सावळखेडा | १० |
| | | रंगूबेली | धोकडा | ४ |
| | | | खामदा | १० |
| | | | किन्नीखेडा | ५ |
| | | | रंगूबेली | १० |
| नांदेड | किनवट | अंबाडीतांडा | शिवरामखेड | ५ |
| | | | वरगुडा | ५ |
| | | घोटी | नवाखेड | १० |
| | | जरूर | जरूर | ५ |
| | | जवरला | काजीपोड | ५ |
| | | | जवरला | १० |
| | | कणकी | डोंगरगाव | १० |
| नाशिक | इगतपुरी | आंबेवाडी | आंबेवाडी | १० |
| | | | नांदुरकीची वाडी | ५ |
| | | भावली | धामडकी | १० |
| | | | गवांदे (धारवाडी) | ३ |
| | | इंदोरे | इंदोरे | १० |
| | | खडकेद | खडकेद | १० |
| | | खेड | देवाची वाडी | ३ |
| | | | काननवाडी | ३ |
| | | | खेड | ३ |
| | | | ठाकूरवाडी | ३ |
| | | कुरुंगवाडी | कुरुंगवाडी | १० |
| | | मानवेढे | जामुंडे | १० |
| | | वासाळी | रामनगर | २ |
| | | | सांबरवाडी | ३ |
| | | | वासाळी | ६ |
| पालघर | जव्हार | कासटवाडी | जयेश्वर | १० |
| | | | रामनगर | ९ |

### २. गटचर्चा

एकूणच आदिवासी स्वशासन आणि त्यासंदर्भातील महिलांचा सहभाग व हस्तक्षेप या मुद्द्यांशी संबंधित विषय जोडलेला असल्याने सामूहिक चर्चा करून प्रकल्पक्षेत्रातील लोकांचं मत जाणून घेणं आवश्यक ठरेल, या हेतूने विशिष्ट मुद्द्यांवर विशिष्ट गटांसोबत चर्चा करण्यात आल्या. बहुतांश ठिकाणी सर्वेक्षणापेक्षा वेगळी माहिती मिळू शकली नाही. पण काही वेगळे पैलू समोर येण्यास मदत झाली.

### ३. मुलाखती

प्रकल्पक्षेत्रातील कार्यकर्ते, अभ्यासकांच्या मुलाखती घेऊन ग्रामसभांमधला महिलांचा सहभाग व महिला सभांचं वास्तव याबाबतची माहिती व त्यांची मतं जाणून घेतली. महिला सभेच्या जन्माची गोष्ट, आजवरचा प्रवास, खाचखळगे आणि भविष्यकालीन वाटचालीत उपयोगी ठरावेत असे हस्तक्षेपाचे बिंदू अधोरेखित होण्यास त्यातून मदत झाली.

### क) माहितीचं विश्लेषण व निष्कर्ष

प्राथमिक स्रोतामधून मिळालेली माहितीवरून संगणक प्रणालीच्या सहाय्याने विविध तक्ते बनवण्यात आले. यासाठी एक्सेल प्रणालीचा वापर करण्यात आला. आदिवासी समूह, महिलेचं वय, शिक्षण, आर्थिक स्तर, कुटुंबाचं सामाजिक–राजकीय स्थान या घटकांचा ग्रामसभा व महिला सभेविषयी माहिती–जाणीव असण्यामध्ये किती प्रभाव आहे हे या विश्लेषणामधून समजून आलं. ग्रामसभेतला महिलांचा सहभाग व महिला सभा याबाबत पुढे काम करायचं असेल, तर अगदी मुळापासूनच सर्वंकष दृष्टिकोनातून व्यवस्थेत हस्तक्षेप करण्याची, प्रबोधन–प्रशिक्षण करण्याची व त्यासाठी नेमकं, सहजसोपं, परंपरा व आधुनिकता यांचा मिलाफ साधणारं संदर्भसाहित्य निर्माण करण्याची किती गरज आहे हे ठसठशीतपणे समोर आलं.

दुय्यम स्रोतांमधून मिळालेल्या माहितीच्या विश्लेषणातून पेसा क्षेत्रातल्या ग्रामसभा व महिला सभा याबाबतची धोरणात्मक बाजू समजून घेता आली. महिला सभांबाबतचा शासकीय आदेश आला त्याला १६–१७ वर्षे उलटून गेली आहेत. त्या पार्श्वभूमीवर, आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणासंदर्भाने, सामाजिक–आर्थिक राजकीय निर्णयप्रक्रियेतल्या त्यांच्या सहभागाबाबत किती लांबचा पल्ला गाठणे अजूनही बाकी आहे, हे स्पष्ट झालं.

मुलाखती व चर्चांमधून पुढे आलेल्या मुद्द्यांशी या विश्लेषणाची सांगड घालून मांडणी व सूचना करणं शक्य झालं.

आकड्यांच्या पलीकडेही जग असते. आकड्यांमधून पुढे येणाऱ्या चित्रामागचं वास्तव अधिक व्यामिश्र आणि अधिक सच्चं असतं. अनेक गोष्टी आकडेवारीमध्ये येत नाहीत. आकडेवारीमधून ज्या मांडता येत नाहीत, त्या वास्तव अधिक उलगडून दाखवणाऱ्या गोष्टी डोळसपणे टिपण्याचा आम्ही प्रयत्न केला. विश्लेषणातून दिसणारं चित्र स्पष्ट होण्यासाठी त्यांचाही अहवालामध्ये वापरण्यात आला आहे.

**या अहवालाची मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे –**

- सारांश
- महिला सभाः पार्श्वभूमी
- प्रकल्पक्षेत्राविषयी
- संशोधन पद्धती
- आदिवासी समाज व महिला सभा
- सर्वेक्षणातील आकडे काय सांगतात
- निष्कर्ष, सूचना व शिफारसी
- परिशिष्टे व संदर्भ

❑ ❑ ❑

## प्रकरण ४

# आदिवासी समाज आणि महिला सभा

ग्रामसभेचा मुख्य उद्देश गावातील नागरिकांना (अर्थात गावातल्या सर्वसामान्य स्त्री व पुरुषांना) ग्रामपंचायतीच्या निर्णयप्रक्रियेत सामावून घेणे आणि गावातील लोकांचा (म्हणजेच गावातल्या सर्वसामान्य स्त्री व पुरुषांचा) विकास कार्यक्रमात प्रत्यक्षपणे सहभाग वाढावा यासाठी प्रोत्साहन देणं असा आहे. ग्रामसभांच्या माध्यमातून अनुसूचित जाती-जमातींसोबतच लोकसंख्येतील अर्धा हिस्सा असलेल्या महिलांचा निर्णयप्रक्रियेतला सहभाग व हस्तक्षेप वाढावा म्हणून ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे केल्या गेलेल्या सूचनांमुळे लोकशाही विकेंद्रीकरणाचं ठाशीव पाऊल टाकलं गेलं. पण महिला ग्रामसभांना उपस्थित रहात नाहीत, उपस्थित राहिल्या तरी पुरुषांपुढे बोलण्यास कचरतात हे वारंवार आणि विविध अभ्यासातून समोर आल्याने 'महिला सभां' विषयक धोरणात्मक निर्णय झाला. 'ग्रामसभेत कुठले विषय बोलायचे, मांडायचे, अधोरेखित करायचे याबद्दलची पूर्वतयारी करण्यासाठीची महिलांची सभा' असं त्याचं स्वरूप. आदिवासी स्वशासनाच्या परिप्रेक्ष्यातून पाहिल्यास 'पेसा' भागात या धोरणाचा विशेष उपयोग व्हावा, तांड्या-पाड्यांवरच्या आदिवासी महिलेला निर्णयप्रक्रियेत, विकासप्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी, त्याकरता सक्षम बनवण्यासाठी या धोरणाचा उपयोग करून घेतला जावा, असं अपेक्षित आहे. पेसा क्षेत्रातील महिलांचा एकंदरच ग्रामसभांमधला सहभाग वाढावा आणि त्यांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढवण्यासाठी महिला सभांद्वारे प्रोत्साहन मिळावं, त्यासाठी महिला सक्षम बनाव्यात असं अपेक्षित आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

एकीकडे हे चित्र दिसत असताना दुसरीकडे एक वेगळा विचारप्रवाहही आढळतो. त्यानुसार, आदिवासी समाजात मातृसत्ताक पद्धती असते, त्या ग्रामसभांमध्ये हजर असतात, निर्णयप्रक्रियेत सहभागी असतात, आदिवासी स्त्रिया असतातच पुरुषांच्या बरोबरीच्या; मग 'पेसा' क्षेत्रात कशासाठी आग्रह धरायचा महिला सभांचा; असं बोललं, मांडलं जातं. आदिवासी क्षेत्रात पंचायत राज व्यवस्था बळकट करण्यासाठी महाराष्ट्रात प्रयत्न करणारे काहीजण पुढीलप्रमाणे मांडणी करतात - महिला सक्षमीकरण हा महिलेचा विषय नाही, अख्ख्या गावाचा विषय आहे. महिला सभांमध्ये पुढे आलेले विषय गाव स्वीकारत नाही, असं आढळून येतं. असंही दिसतं की ग्रामपंचायतीचा महिला-बालकल्याणसाठीचा

जो १०% निधी आहे, त्याबद्दलच महिला सभेने बोलावं असं गृहीत धरलं जातं. खरंतर महिलांनी महिलांचे महिलांपुरते निर्णय महिला सभेत घ्यावेत असं काही अपेक्षित नाही. कायद्याने महिला सभेला सर्व विषयांवर बोलण्याची मुभा दिली आहे. गावाशी निगडित सर्व विषयांवर महिलांनी बोलावं, चर्चा करावी, हस्तक्षेप करावा, सूचना कराव्या असं कायद्याला अपेक्षित आहे. पण ना महिलांना तसं वाटतं, ना ग्रामसभेला, ना महिला सभेला, ना गावकऱ्यांना. त्यामुळे महिला सक्षमीकरण, महिला सभा हे विषय वेगळे काढण्यातून काही साधणार नाही. पूर्ण गावाच्या सभेतच महिलांनी बोललं पाहिजे आणि तिथेच सर्व निर्णय झाले पाहिजेत असा आग्रह धरायला हवा. किमान आदिवासी भागात, पेसा क्षेत्रात महिला ग्रामसभा होऊ नये. आणि आता तर पाडा स्तरावरच ग्रामसभा होणं अपेक्षित आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाडा हा नैसर्गिक समुदाय आहे. तो जैविक वाढीतून तयार झाला आहे. कृत्रिमरित्या निव्वळ 'घोषित' झालेला हा समुदाय नाही. हे नैसर्गिक गाव असल्याचा एक फायदा असा की जर सभा खुल्या जागेत झाली तर पाड्यावरच्या सभेत बायका येतात, बोलतात. त्यामुळे त्यांचं त्यासाठी सक्षमीकरण करण्याची वेगळी गरज नाही. अनुसूचित क्षेत्रात पूर्वापार चालत आलेल्या तंटानिवारणाच्या ज्या रिती आहेत त्यात अनेक भागात केवळ काही निवडक पुरुष पंच म्हणून न्यायनिवाड्यासाठी बसत नाहीत. संपूर्ण गाव बसतं. भांडणतंट्यात सहभागी महिला त्यात बोलतात आणि पाड्यावरच्या इतर महिलाही बोलतात. त्यामुळे ज्या त्या पाड्यावर सभा झाल्या तर चर्चेतील महिलांच्या उपस्थितीचा वा सहभागाचा प्रश्न येणार नाही असं म्हणायला वाव राहतो. अर्थात दुसऱ्या पाड्यावर किंवा दुसऱ्या गावात सभा असेल तर हे घडणार नाही. त्यामुळे ज्या त्या पाड्यावर ग्रामसभा व्हायला हवी असा आग्रह धरला तर महिलांच्या सहभागाचा प्रश्न निर्माण होत नाही. महाराष्ट्रातल्या बहुतेक सर्व अनुसूचित क्षेत्रात हे शक्य होऊ शकतं. करून पाहायला हवं.

आदिवासी समुदायातली एकंदर स्त्री–पुरुष समानता पाहता वेगळ्या महिला सभांची गरज नाही, असं म्हणणं वरील मांडणीतून समोर येतं.

या पार्श्वभूमीवर आदिवासी स्त्री आणि महिला सभा हा विषय तपासला तर काय दिसतं? अभ्यास, निरीक्षणं आणि महाराष्ट्रातल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांची मतं काय सांगतात?

आदिवासी समुदायांविषयीचे अभ्यास असं सांगतात की, महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर इथल्या परंपरागत आदिवासी व्यवस्थेत सर्वसाधारणतः आदिवासी स्त्रीस चांगली वागणूक मिळते आणि आदिवासी स्त्रियांना प्रगत समाजातील स्त्रियांच्या तुलनेने अधिक लैंगिक स्वातंत्र्य असतं असं दिसून येतं. पण इथल्या आदिवासी समुदायांत वारसा हक्क, मालमत्तेवरील हक्क पुरुषांकडे असतो. महत्त्वाचं म्हणजे आर्थिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रांत पुरुषांचा वावर आणि वरचष्मा असतो, हे ठळकपणे दिसून येतं. आदिवासी समाजातील श्रमविभाजन व्यावसायिक–सामाजिक गटवारीवर आधारलेलं नसतं; ते लिंगभेदावर आधारलेलं असतं. उदाहरणार्थ – गावचा 'हेडमन', 'प्रधान' किंवा 'नाईक' हा पुरुषच असतो. मासेमारीसाठी स्त्री आणि पुरुष दोघंही जातात. पण मासेमारीसाठी पाण्यात गळ टाकून स्त्री बसली आहे असं कधी दिसत नाही, ते काम पुरुषच करतो. शिकारीचा विषयही असाच. प्राण्यांची शिकार करतो पुरुष, स्त्रीने शिकार केली तर ती असते पक्ष्याची! असे वरवर पाहता किरकोळ वाटणारे पण नेमके फरक बरंच काही सांगत असतात. ते

अधिकाधिक टिपत गेल्यास असमानतेचे कंगोरे उलगडत जातात. मातृसत्ताक आदिवासी जमाती सोडल्या तर थोड्याबहुत फरकाने अशा प्रकारचं चित्र दिसतं. भारतातील खासी जमात हे मातृसत्ताक आदिवासी समुदायाचं एक उदाहरण म्हणता येईल. पण एकंदरीतच मातृसत्ताक आदिवासी जमाती भारतात फारच विरळ आहेत.

आदिवासी समाजात स्त्री–पुरुष समानता आहे असं म्हटलं जातं, मानलं जातं. आदिवासींबद्दल काही गोष्टी 'ग्लोरीफाय' करूनही सांगितल्या जातात. पण तो आपला निव्वळ समज आहे असं आदिवासीबहुल क्षेत्रातले ज्येष्ठ अभ्यासू व अनुभवी कार्यकर्ते सांगतात. त्यांच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्रातल्या आदिवासी समाजात वैविध्य खूप आहे. पण या वैविध्यपूर्ण समाजात स्त्री–पुरुष समानता जी दिसते ती केवळ जगण्याच्या संदर्भात व्यक्तिगत पातळीवर. कुटुंबातलं, खासगी आयुष्यातलं बाईचं दुय्यमत्व आदिवासी समाजात परंपरागत दिसत नाही. आदिवासींच्या दैनंदिन आणि सांस्कृतिक जीवनात समानता दिसून येईल. आनंद घेणं, उपभोगणं याबाबतीत दिसून येईल. उदाहरणार्थ– आदिवासी स्त्री–पुरुष शिकारीला, जत्रेला, शेतावर एकत्र जातील, नाचतील–गातील एकत्र. लग्न करणं, नाही पटलं तर वेगळं होणं याबाबतचं निर्णयस्वातंत्र्य घेतील ते समान पद्धतीने. विवाहपूर्व संबंध, लग्न, घटस्फोट यासारखे खाजगी जीवनातले निर्णय अतिशय मुक्तपणे घेण्याची परंपरा आदिवासी स्त्रीच्या बाबतीत दिसून येते. पण सामाजिक, आर्थिक, राजकीय निर्णयप्रक्रियेत मात्र ते दिसत नाही. साधं उदाहरण घ्यायचं तर, आदिवासी समाजात कुमारी मातांचा, अनाथ मुलांचा प्रश्न कधीच आढळत नाही. कुमारी मातृत्व हा कलंक मानला जात नाही. अनाथांना आईबापाच्या नावासकट पालकत्व मिळण्याचा प्रश्न येत नाही. पण प्रश्न येतो तो वारसा हक्क आणि अंत्यसंस्कारांच्या हक्काबाबत. तो 'हक्क' पुरुषाकडेच जातो. 'पुरुषप्रधानतेचं वास्तव' आदिवासी समुदायांमध्येही आढळतं. थोडक्यात, सामाजिक आणि अर्थ–राजकीय व्यवस्थेच्या संदर्भात पाहिलं तर आदिवासी समाजातलं महिलांचं स्थान, त्यांची भूमिका ही बिगर आदिवासी समाजापेक्षा काही वेगळी नाही. त्या संदर्भातलं वास्तव सर्वसाधारण समाजातल्या महिलांसारखं दुय्यमत्वाचं दिसतं. आदिवासी महिला सामाजिक–आर्थिक–राजकीय निर्णयप्रक्रियेत पूर्वीही नव्हत्या आणि आजही दिसत नाहीत. गावचा 'हेडमन', 'प्रधान' किंवा 'नाईक' हा पुरुष असतो. गावकी बसायची तेव्हा त्यात पुरुष असायचे, त्याच तालावर आदिवासी समाजात पंच कधीही महिला नसतात; ते पुरुषच असतात. अनेक भागात केवळ काही निवडक पुरुष पंच म्हणून न्यायनिवाड्यासाठी बसत नाहीत. संपूर्ण गाव बसतं. भांडणतंट्यात सहभागी महिला त्यात बोलतात आणि पाड्यावरच्या इतर महिलाही बोलतात. काही ठिकाणी चर्चेत महिलांचा सहभाग दिसत असेलही, पण निर्णयाचा, निवाड्याचा अधिकार महिलांकडे आहे, असं चित्र मात्र दिसत नाही.

आता प्रयत्नांच्या रेट्यामुळे काही बदल घडू लागल्याची चिन्हं दिसत असली तरी जिथे निवडणुका, पदं याबाबतीत ५०% बायकांचा सहभाग हा नियम आहे, आरक्षणाचं बंधनच आहे तिथे बायका दिसू लागल्या आहेत. जे बदल घडत आहेत ते सरकारच्या इच्छेखातर, नियमांच्या चौकटीखातर. वास्तवात खासगी विश्वापलीकडच्या निर्णयप्रक्रियेत परंपरेने आदिवासी स्त्री नव्हती आणि आजही नाही. सामाजिक, आर्थिक, राजकीय निर्णयप्रक्रियेतली भागीदारी ही आदिवासी समुदायांमध्ये परंपरेचा अविभाज्य भाग म्हणून येत नाही. बिगरआदिवासी समाजात विशेषत: वंचित

समुदायातील महिला जशा निर्णयप्रक्रियेत परिघाबाहेर फेकल्या गेलेल्या किंवा परिघावरच राहिलेल्या दिसतात, पुरुषांच्या तुलनेत दुय्यम स्थानावर दिसतात तेच चित्र आदिवासी महिलेविषयीही दिसते. त्यामुळे या महिलेचं सक्षमीकरण आणि निर्णयप्रक्रियेतली तिची भागीदारी वाढावी म्हणून होत असलेल्या नियम, कायदेकानू आणि धोरणात्मक निर्णयांचा पाठपुरावा व अंमलबजावणी हे विषय अजेंड्यावर घेण्याची आजही गरज आहे असे या विषयातले ज्येष्ठ व अनुभवी कार्यकर्त्यांच्या मांडणीतून अधोरेखित होते. यातून दोन गोष्टी सुस्पष्ट होतात. एक म्हणजे, आदिवासी क्षेत्रात वेगळ्या महिला सभा हव्यात कशाला हा मुद्दा निकालात निघतो; आणि दुसरं, आजच्या जगात आदिवासींच्या हक्काचे प्रश्न अधिक जटिल होत चालले असताना आदिवासी स्त्रीचा सामाजिक–राजकीय आत्मविश्वास वाढवणं, तिला बोलकं करणं, गावाच्या, तांड्याच्या, पाड्याच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्यासाठी तिला प्रवृत्त करणं, त्यासाठी महिला सभांचा आधार घेणं, महिला सभांच्या अजेंड्यावर 'जेंडर बजेटिंग'सारखे विषय येऊ लागतील या दिशेने आणि यासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे, हे अधोरेखित होतं.

आजघडीला घटनात्मक आणि कायद्याच्या नजरेतून ग्रामसभेला जितकं महत्त्व बहाल केलं आहे, जितकं बळ दिलं गेलं आहे त्याचा उपयोग करून खऱ्या अर्थाने लोकशाही विकेंद्रीकरण होण्याची गरज आहे. त्यासाठी गावोगावी नियमानुसार ग्रामसभा होणं ही किमान गरज आहे. पण तसं होताना दिसत नाही. जिथे ग्रामसभा होतात, तिथेही स्त्री–पुरुष ग्रामस्थांचा त्यातला सहभाग व हस्तक्षेप बहुतांश ठिकाणी प्रश्नांकितच असतो, ही वस्तुस्थिती आहे. खरं तर पेसा क्षेत्रातल्या प्रत्येक गावात, प्रत्येक पाड्यावर ग्रामसभा व्हायला हवी. पण तशी ती होत नाही, असे अभ्यास व कार्यकर्ते सांगतात. मग महिला सभांबाबतची वस्तुस्थिती काय असेल, हे वेगळं सांगायला नको असंही ते म्हणतात. म्हणूनच ग्रामसभा व्हायला हवी, ती योग्य पद्धतीने घेतली जायला हवी, त्यातला ग्रामस्थांचा (पुरुषांसोबत स्त्रियांचाही) सहभाग, हस्तक्षेप वाढायला हवा आणि गावा–पाड्यांवर प्रत्येक ग्रामसभेआधी महिला सभेची मागणी व्हायला हवी, महिला सभा योग्य पद्धतीने घेतली जायला हवी. त्यात महिला उपस्थिती, सहभाग व हस्तक्षेप संख्यात्मक व गुणात्मक स्वरूपात वाढायला हवा अशा अजेंड्याने काम होण्याची गरज आहे. ग्रामसभा व महिला सभेसंदर्भातले हे मूलभूत मुद्दे अलग–अलग पद्धतीने न हाताळता एकत्रित अजेंडा म्हणून सर्वंकष दृष्टिकोनातून हाताळले तर ते अधिक संयुक्तिक, फलदायी व दूरदर्शी ठरेल. नव्या जगात आदिवासी हक्कांच्या लढाईचा मार्ग ग्रामसभांच्या आणि महिला सभांच्या पोटातून जाऊ शकतो. म्हणूनच हस्तक्षेपाचा अवकाश दिवसेंदिवस आक्रसत असताना घटनादत्त व कायद्याने देऊ केलेलं ग्रामसभा व महिला सभेचं सक्षम माध्यम पुरेशा ताकदीनं व विविधढंगी पद्धतीनं वापरलं जायला हवं, हे निश्चित!

❑ ❑ ❑

## प्रकरण ५

# सर्वेक्षणातील आकडे काय सांगतात

महिलांची सामाजिक–आर्थिक–राजकीय परिस्थिती आणि ग्रामसभेतील त्यांचा सहभाग व महिला सभांसंदर्भातील वास्तव तपासण्यासाठी प्रामुख्याने गाव–पाड्यावरील वास्तव्याचा काळ, वय, शिक्षण, वैवाहिक स्थिती, उपजीविका व त्यांचे सामाजिक–राजकीय संबंध या निकषांचा आधार घेण्यात आला. त्यातून पुढीलप्रमाणे आकडेवारी समोर आली.

**वास्तव्य**


एकूण २३४ पैकी २२१ महिलांनी सध्याच्या गावातील वास्तव्याविषयी माहिती दिली. विशेष म्हणजे यातील तब्बल १८६ महिला १० वर्षांपेक्षा अधिक काळ सध्याच्या गावात वास्तव्यास आहेत. त्यातल्या १५३ महिला १५ वर्षांपेक्षा अधिक काळ सध्या ठिकाणी वास्तव्यास आहेत. महिला सभा २००२ साली वटहुकुमाद्वारे कागदोपत्री सुरू झाल्या. या गोष्टीला १७ वर्षे झाली आहेत. त्यातील किमान १५ वर्षांची वस्तुस्थिती या महिलांच्या उत्तरांमधून समोर येते.

ग्रामसभांबद्दल माहिती असलेल्या ७१ महिलांपैकी ४५ महिला १५ वर्षांपेक्षा अधिक काळ सध्याच्या गावात वास्तव्यास आहेत, तर १० वर्षांपेक्षा अधिक काळ वास्तव्य असलेल्या १४ महिला आहेत. किमान १० वर्षे गावातील वस्तुस्थितीच्या साक्षीदार असलेल्या १८६ महिलांपैकी ५९ म्हणजे केवळ एक तृतीयांश महिलांना ग्रामसभेबाबत माहिती आहे. यातही ग्रामसभांबद्दल माहिती असलेल्या ७१ महिलांपैकी ५० महिलांनी ग्रामसभेला गेल्याचे सांगितले. यात १५ वर्षापेक्षा अधिक काळ वास्तव्यास असलेल्या महिलांची संख्या ३६ आहे, हे लक्षणीय म्हणावे लागेल. यापैकी २१ महिला कधी ना कधी ग्रामसभेत सहभागी झाल्या आहेत. या २१ पैकी १५ महिला १५ वर्षांपेक्षा अधिक काळ गावात वास्तव्यास आहेत.


महिला सभांबद्दल २० (८.५४ टक्के) महिलांना ठाऊक आहे. कधी ना कधी महिला सभेला गेल्याचं केवळ १५ महिलांनी सांगितलं. महिला सभेतील चर्चेमध्ये केवळ ७ महिला सहभागी झाल्या आहेत.

**वय**

एकूण २३४ महिलांपैकी २३० महिलांनी त्यांचं वय सांगितलं. त्यापैकी ११९ महिला १८ ते ३५ या तरूण वयोगटातल्या होत्या, ही लक्षणीय बाब आहे. ग्रामसभेबद्दल माहिती आहे का, या प्रश्नाला ७२ (३०.७६ टक्के) महिलांनी सकारात्मक उत्तर दिलं. त्यापैकी ३९ म्हणजे निम्म्याहून अधिक महिला १८ ते ३५ या वयोगटातल्या होत्या. ग्रामसभेला जाणाऱ्या ५० महिलांपैकी २५ महिला १८ ते ३५ या तरूण वयोगटातल्या, तर ३६ वर्षांच्या पुढील वयोगटातल्या २५ महिला होत्या. ग्रामसभेतल्या चर्चेमध्ये सहभागी होणाऱ्या २१ महिलांपैकी ९ महिला १८ ते ३५ या तरूण वयोगटातल्या, तर १२ महिला ३६ वर्षाच्या पुढील आहेत.




महिला सभांविषयी एकूण  महिलांना माहिती आहे. त्यापैकी १२ महिला १८ ते ३५ वयोगटातल्या असणं विशेष आहे. महिला सभांना कधी ना कधी गेलेल्या एकूण १५ महिलांपैकी १० महिला १८ ते ३५ या तरूण वयोगटातल्या आहेत. महिला सभांमध्ये सहभागी होणाऱ्या एकूण ७ महिलांपैकी ६ महिला १८ ते ३५ वयोगटातल्या आहेत. महिला सभांमध्ये सहभागी होण्यासाठी घरातून प्रोत्साहन मिळतं असं सांगणाऱ्या १३ महिलांपैकी १० महिला १८ ते ३५ वयोगटातल्या आहेत.




१८ वर्षं पूर्ण झालेल्या नवमतदारापासून ३५ वर्षांपर्यंतच्या तरुण महिला मतदारांना केंद्रस्थानी ठेवून ग्रामसभा व महिला सभांबाबत सर्वंकष दृष्टिकोनातून जनजागृती व प्रशिक्षण यादृष्टीने प्रयत्न झाल्यास बदलाचा वेग वाढू शकतो.

### वैवाहिक स्थिती

एकूण २३४ पैकी २२३ महिलांनी आपल्या वैवाहिक स्थितीविषयी माहिती दिली. त्यातील बहुतांश म्हणजे २१२ विवाहित, ३ अविवाहित तर ८ विधवा होत्या.

ग्रामसभेबद्दल माहिती आहे का या प्रश्नाला २९.४८ टक्के महिलांनी सकारात्मक उत्तर दिलं. २१.३६ टक्के महिलांनी कधी ना कधी ग्रामसभेला गेलो असल्याचं सांगितलं. ग्रामसभेला जाणाऱ्या महिलांपैकी ८.९७ टक्के महिला ग्रामसभेत प्रत्यक्ष सहभागी होतात. महिला सभांविषयी केवळ ८.५४ टक्के महिलांना माहिती आहे. या सर्व विवाहित आहेत. केवळ २.९९ टक्के महिलांनी महिला सभेमध्ये सहभाग घेतला आहे. महिला सभांमध्ये सहभागी होण्यासाठी घरातून प्रोत्साहन मिळते, असे ५.५५ टक्के महिलांनी सांगितलं.

ग्रामसभा व महिला सभेबाबत बहुसंख्या महिलांना माहिती नाही हे यातून दिसतं. माहिती आहे आणि घरातून प्रोत्साहनही मिळते, तरीही ते ग्रामसभेस आणि/किंवा महिला सभेस जाण्यामध्ये परिवर्तित होत नाही, असंही आकडेवारीतून दिसून येतं. ग्रामसभेबाबत माहिती असणाऱ्यांचं प्रमाण २९.४८ टक्के, सभेला जाणाऱ्यांचं प्रमाण २१.३६ टक्के, सहभागी होणाऱ्यांचं प्रमाण ८.९७ टक्के असं घटताना दिसतं. महिला सभेबाबत माहिती असणाऱ्यांचं प्रमाण ८.५४ टक्के, महिला

सभांना जाण्यासाठी प्रोत्साहन मिळणाऱ्यांचं प्रमाण ५.५५ टक्के आहे. आणि महिला सभेला जाते, असं सांगणाऱ्यांचं प्रमाण आहे केवळ २.९९ टक्के. यासंदर्भाने नव्याने आणि मुळातून काम करताना सुरुवातीच्या टप्प्यावर ही तफावत केंद्रस्थानी ठेवून ती भरून काढण्याचं काम कसं करता येईल, यादृष्टीने प्रयत्न केले तर पुढे जाणं सुकर ठरू शकेल.

## शिक्षण

एकूण २३४ महिलांपैकी १५९ महिलांनी स्वतःच्या शिक्षणाविषयी माहिती दिली.


किमान लिहिता वाचता येण्यापासून १२ वीपर्यंतचा टप्पा गृहीत धरला तर आपली शैक्षणिक माहिती देणाऱ्या १५९ महिलांपैकी या टप्प्यात तब्बल १५४ महिला येतात. ५ जणींनी पदवीपर्यंतचा टप्पा गाठला आहे. ग्रामसभेविषयी या पाचजणींपैकी ३ महिलांना ठाऊक आहे, महिला सभेविषयी एका महिलेला माहिती आहे आणि या एका महिलेने आपण महिला सभेला कधी ना कधी उपस्थित राहिले असल्याचं तसंच महिला सभेला उपस्थित राहण्यासाठी घरातून प्रोत्साहन मिळत असल्याचं सांगितलं.

आपली शैक्षणिक माहिती देणाऱ्या १५९ महिलांपैकी एकंदर ५८ महिलांना ग्रामसभेविषयी माहिती आहे. ३९ महिला कधी ना कधी ग्रामसभेला उपस्थित राहिल्या आहेत. १९ महिला ग्रामसभेतील चर्चेत सहभागी झाल्या आहेत. १५ महिलांना महिला सभेविषयी माहिती आहे. ११ महिला कधी ना कधी महिला सभेला उपस्थित राहिल्या आहेत. ५ महिलांनी कधी ना कधी महिला सभेतील चर्चेत सहभागी झाल्याचं सांगितलं. महिला सभांना उपस्थित राहून चर्चेत सहभागी होण्यासाठी घरातून प्रोत्साहन मिळत असल्याचं ९ महिलांनी सांगितलं.


माहिती असणं आणि प्रत्यक्ष उपस्थित राहणं, सहभागी होणं यातील तफावत लक्षणीय आहे. प्रयत्नांच्या सुरुवातीच्या टप्प्यावर ही तफावत भरून काढण्यावर भर देता येईल.

## उपजीविका

आपल्या उपजीविकेविषयी माहिती देणाऱ्या सर्वाधिक स्त्रियांचं शेती हे उपजीविकेचं साधन आहे. त्या एकतर आपल्या कुटुंबाच्या मालकीच्या शेतात राबतात आणि/किंवा शेतमजुरीला जातात. रोजंदारी, स्वयंरोजगार, नोकरीत गुंतलेल्या महिलांची यातील संख्या तुलनेने अगदीच मोजकी आहे. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या, शेतकरी–शेतमजूर असणाऱ्या १८१ महिलांपैकी ५८ महिलांना ग्रामसभेविषयी माहिती आहे, ४३ महिला कधी ना कधी ग्रामसभेला गेल्याचं व १६ महिला ग्रामसभेतील चर्चेत सहभागी झाल्याचं सांगतात.




१८१ शेतकरी-शेतमजूर महिलांपैकी १९ महिलांना महिला सभेविषयी ठाऊक आहे. १४ महिला कधी ना कधी महिला सभेस उपस्थित राहिल्याचं तर ७ महिला तेथील चर्चेत सहभागी झाल्याचं आणि ११ महिला अशा सहभागासाठी घरातून प्रोत्साहन मिळत असल्याचं सांगतात.




**सामाजिक–राजकीय संबंध**

सर्वेक्षणात सहभागी झालेल्या महिला बचतगटांशी आणि/किंवा थेटपणे राजकीय क्षेत्राशी संबंधित आहेत का, हेही समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या एकूण २३४ महिलांपैकी ९४ म्हणजे ४० टक्क्यापेक्षा अधिक महिला बचतगटाशी आणि/किंवा राजकीय क्षेत्राशी संबंधित आहेत.

९२ महिला बचतगटांशी संबंधित आहेत. त्यातील १४ बचतगटांच्या पदाधिकारी होत्या/आहेत तर १२ महिला राजकीय क्षेत्राशी जोडलेल्या आहेत.

बचतगटांशी पूर्वी आणि/किंवा सध्या जोडलेल्या ९२ महिलांपैकी ४० म्हणजे जवळपास ४४ टक्के महिलांना ग्रामसभेविषयी माहिती आहे. या ४० पैकी २७ म्हणजे जवळपास ६८ टक्के महिला ग्रामसभेला कधी ना कधी उपस्थित राहिल्या आहेत.

बचतगटांशी जोडलेल्या ९२ महिलांपैकी १३ जणींनी महिला सभेविषयी माहिती असल्याचं, १० महिलांनी या सभेस कधी ना कधी गेले असल्याचं, ८ जणींनी आपल्याला महिला सभेला जाण्यासाठी घरातून प्रोत्साहन मिळत असल्याचं आणि ६ जणींनी सभेतल्या चर्चेत सहभागी झाल्याचं सांगितलं.



महिला सभांमध्ये सहभागी होता का या प्रश्नाला २३४ पैकी केवळ ७ (३ टक्के) महिलांनी सकारात्मक उत्तर दिलं. महिला सभांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळतं का या प्रश्नाला २३४ पैकी केवळ १३ (५.५५ टक्के) महिलांनी सकारात्मक उत्तर दिलं. महिला सभांमध्ये सहभागी होण्यासाठी घरातून प्रोत्साहन मिळतं का या प्रश्नाला सकारात्मक उत्तर देणाऱ्या महिलांपैकी २ महिलांचा त्यांच्या कुटुंबाचा राजकीय क्षेत्राशी संबंध आहे. ८ महिला बचत गटाशी सदस्य म्हणून जोडलेल्या आहेत. या ८ पैकी १ महिला बचतगटामध्ये पदाधिकारी आहे.

आदिवासी भागातही बचतगटांचं जाळं विस्तारत असल्याचं दिसतं. बचतगटांचं माध्यम ग्रामसभेतला महिलांचा सहभाग व महिला सभेविषयी जाणीवजागृती, बळकटीकरण यासाठी आदिवासी भागातदेखील उत्प्रेरकासारखं (catalyst) वापरता येऊ शकतं अशी आशा यातून समोर येते.

अभ्यासप्रकल्पासाठी निवडलेल्या क्षेत्रात विविध अनुसूचित जमातींचं वास्तव्य आहे. कोरकू व गोंड (अमरावती जिल्ह्यातील धारणी परिसर), गोंड व कोलाम (नांदेडमधील किनवट परिसर), महादेव कोळी व महादेव ठाकूर (नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी परिसर), वारली व कोकणा (पालघर जिल्ह्यातील जव्हार परिसर) असं वैविध्य यात आढळतं. गरिबी, मूलभूत साधनसुविधांचा अभाव, पिचलेपण आणि आदिवासींचे हक्क व कायदेकानून याविषयीचं अज्ञान हे सारं कमीअधिक प्रमाणात या सर्व समुदायांत आढळतं. यापैकी कुठल्याही समुदायाच्या सामाजिक–आर्थिक–राजकीय व्यवहारात व निर्णयप्रक्रियेत महिला दिसत नाहीत असं मत इथल्या कार्यकर्त्यांनी नोंदवलं. शेती, शेतमजुरी आणि अपवादाने स्वयंरोजगार व नोकरी याद्वारे एका अर्थी स्वावलंबी असलेल्या आदिवासी महिला सामाजिक–आर्थिक–राजकीय निर्णयांच्या बाबतीत मात्र परावलंबी दिसतात. सार्वजनिक विश्वात घरातला कुणीतरी एक (पुरुष) कुटुंबाचं प्रतिनिधित्व करताना दिसतो. अर्थातच, हा पुरुषच घरातल्या सर्व महिलांचंही प्रतिनिधित्व करतो. ग्रामसभांविषयी आणि महिलासभांविषयीचं इथलं अज्ञान अमावास्येच्या अंधाराइतकं गडद आहे. अर्थातच इथल्या महिलांचं ग्रामसभेला उपस्थित राहण्याचं प्रमाण अगदीच तुरळक. चर्चेत सहभाग, हस्तक्षेप नाही म्हणावा असाच. ग्रामसभांची ही कथा, तर महिलासभांचं काय बोलावं! इथे महिलासभा होत नाहीत, झाल्याच तर कागदोपत्री होतात असं इथले कार्यकर्ते सांगतात. महिला सभा ही गोष्ट इथे सर्वसामान्य महिलांना ठाऊक नाही. त्यामुळे ती व्हावी म्हणून प्रयत्न करणं आणि झाली तर उपस्थित राहणं ही बाब विरळच. आपल्या मूलभूत साधनसुविधांचे प्रश्न आपण अशा सभांच्या माध्यमातून सोडवू शकतो, याची इथल्या बहुसंख्य महिलांना जाण नाही. पंचायतराज, आदिवासी स्वशासन आणि महिला सबलीकरणाचं वारं यांच्यापर्यंत पोहोचलं आहे, असं त्यांच्या उत्तरांमधून जाणवत नाही. ज्या महिला बचतगटांशी, महिला मंडळांशी संबंधित आहेत त्यांच्यापर्यंत सक्षमीकरणाकडे नेणाऱ्या माहितीची किरणं पोहोचत असल्याचं दिसतं. पण सर्वेक्षणात उलटसुलट पद्धतीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं पडताळून पाहिली की एक गोष्ट सूर्यप्रकाशासारखी लख्खपणे समोर येते ती म्हणजे आदिवासी भागातला पंचायतराज, आदिवासी स्वशासन याविषयीचा अंधार छेदण्यासाठी सर्जनशील प्रबोधनाला, सर्वंकष व सातत्यपूर्ण प्रयत्नांना पर्याय नाही.

❑ ❑ ❑

## प्रकरण ६

# निष्कर्ष, सूचना व शिफारसी

सदर अभ्यासप्रकल्पाच्या निमित्ताने राज्याच्या आदिवासी क्षेत्रात कार्यरत असलेल्या जुन्या-जाणत्या कार्यकर्त्यांशी व अधिकारी व्यक्तींशी विस्तृत चर्चा करण्यात आली. आतापर्यंतचा प्रबोधन प्रयत्नांचा प्रवास व पुढे जाण्याच्या वाटा यासंदर्भाने बरेच पैलू त्यातून सुस्पष्टपणे समोर आले. स्थानिक जबाबदार व्यक्ती व कार्यकर्त्यांशी झालेल्या चर्चेतून अनेक सूचनात्मक मुद्दे अधोरेखित झाले. सर्वेक्षकांनी वेळोवेळी नोंदवलेली निरीक्षणंही यासंदर्भाने महत्त्वाची ठरली. याखेरीज पी. व्ही मंडलिक ट्रस्ट, महिला राजसत्ता आंदोलन अशा पंचायत राज व महिला सक्षमीकरणात अग्रेसर असलेल्या संस्थांच्या अभ्यासांनीही पुढे जाण्याचे मार्ग सुचवले आहेत. 'पंचायत भारती' नियतकालिक (पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट), 'ग्रामसभा गौरव अभियान पुस्तिका' व 'महाराष्ट्रातील महिला ग्रामसभाः नवा सत्तासंकल्प' (महिला राजसत्ता आंदोलन – सिसोर्स ॲण्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट) या पुस्तिकांमधील शिफारसी व सूचनांचीही नोंद घेण्यात आली आहे. सदर अभ्यासप्रकल्पासाठी केलेले सर्वेक्षण, गटचर्चा, मुलाखती व इतर अभ्यास या साऱ्याच्या मंथनातून हाती लागलेला संकलनात्मक सारांश या प्रकरणात मांडण्यात आला आहे.

### १. हवा सर्वंकष दृष्टिकोन आणि सातत्यपूर्ण रेटा

- ग्रामसभा यथायोग्य पद्धतीने आणि प्रामाणिकपणे घेतल्या जाव्यात, ग्रामसभांमधला महिलांचा सहभाग वाढावा, प्रत्येक ग्रामसभेआधी महिला सभा व्हाव्यात आणि महिला सभांना महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून चर्चेत सहभाग घ्यावा, व्यवस्थेत हस्तक्षेप करावा यासाठी मूलभूत जाणीवजागृतीची गरज आहे. अर्थात त्यासाठी या मुद्द्यांचा सुटा सुटा विचार न करता पंचायतराज व्यवस्था, विकेंद्रित लोकशाही मूल्ये आणि आदिवासी स्वशासन हा गाभा मानून सर्वंकष विचारपद्धतीने वाटचाल करायला हवी. ती मूलभूत चौकट मानून उपक्रम, कार्यक्रम आखायला हवेत.
- ग्रामसभा व महिला सभा ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून गाव विकासाबाबत निर्णय घेणारं, गावाच्या विकासाचा निधी कुठे खर्च करायचा हे ठरवणारं, शासकीय योजनांसाठी लाभार्थींची निवड करणारं व सर्व गावकऱ्यांना (१८ वर्षावरील सर्व मतदार स्त्री-पुरुषांना) निर्णयात सहभागी करून घेणारं गावपातळीवरील मुख्य व्यासपीठ आहे. ग्रामसभा ही गावाच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे. विकासगंगेचा प्रवाह गावातील महिला,

दलित, आदिवासी, कष्टकऱ्यांच्या दारापर्यंत नेण्याची क्षमता ग्रामसभेत आहे. परंतु महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी ग्रामसभा व महिला सभा या सरपंच व ग्रामसेवक यांनी कपाटात सुरक्षित ठेवल्या आहेत. ग्रामसभेचे, महिला सभेचे नियम, गावाच्या विकासात या दोन्ही सभांची भूमिका व लोकांचे अधिकार कुलूपबंद अवस्थेत आहेत. या वास्तवाला छेद द्यायचा असेल तर ग्रामसभेबाबतची व महिला सभेबाबतची परिपूर्ण माहिती लोकांपर्यंत पोहोचणं आवश्यक आहे. त्यासाठी प्रयत्न काही ठिकाणी होतो आहे, पण तो सर्वत्र होणं आवश्यक आहे.

- आदिवासी क्षेत्रात महिलांना महिला सभेविषयी माहिती नाही. ग्रामपंचायतीमधील समित्या, पेसा कायद्याच्या अंतर्गत असलेल्या तरतुदी किंवा आदिवासी क्षेत्रासाठी लागू असलेल्या विविध कायदे व नियमांविषयी माहिती नाही. माहिती हा सशक्तीकरणाचा पाया असतो. हा पायाच ठिसूळ असल्यामुळे सर्वसामान्य महिलांचा निर्णयप्रक्रियेतला सहभाग व अंमलबजावणीतील देखरेख व नियंत्रण या केवळ कल्पनाच राहतात. शिवाय गावातल्या कुठल्याही सभेला घरातील कुणी एक (पुरुष) जातो, तिथे आपण कशाला जायचं, जाऊन काय करायचं असंही बहुतांश महिलांना वाटतं. ही वस्तुस्थिती छेदून पुढे जायचे मार्ग धुंडाळणं अत्यावश्यक आहे. ग्रामसभा व महिलासभेविषयी योग्य व पुरेशा माहितीचा अभाव सर्व अभ्यास, निरीक्षणं, मुलाखतींमधून स्पष्ट पुढे येतो. म्हणूनच माहितीच्या प्रचार–प्रसाराद्वारे सक्षमीकरण गरजेचं आहे.
- जिथे गावाच्या, पाड्याच्या, तांड्याच्या पातळीवर सामाजिक संस्था–संघटनांचं यासंदर्भातलं काम जाणीवपूर्वक चालू आहे, तिथे किमान २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टच्या ग्रामसभेआधी तरी महिला सभेचा आग्रह धरला जातो. 'ग्रामसभा होऊच कशी शकते? महिला सभेची नोटीस कुठे काढली आहे?' असा प्रश्न ग्रामसेवकाला विचारला जातो. मग ग्रामसभेपूर्वी एक दिवस किंवा अगदी एक तास आधी महिला सभा घेतली जाते, त्यात चर्चा होते असंही दिसतं. पण सध्यातरी आदिवासी भागात महिला सभांसाठी रेटा लावला जात असल्याचं चित्र अगदी तुरळक आहे. त्यामुळे आदिवासी क्षेत्रात महिला सभा जवळपास होतच नाहीत असं म्हणायला वाव आहे.
- नियमानुसार ग्रामसभा घेतल्या जात नाहीत, त्यामुळे लोकशाही विकेंद्रीकरणाच्या व आदिवासी स्वशासनाच्या मूळ गाभ्यालाच छेद जातो. याचे स्थानिक स्तरावर अनेक दुष्परिणाम जाणवतात. कारभार नेमका कसा चाललाय हे सर्वसामान्य स्थानिक स्त्री–पुरुषांना समजत नाही, कोणत्या विकास योजना आल्या, त्या कशा राबवल्या जातात याची माहिती कळत नाही, गावाच्या–पाड्याच्या–तांड्याच्या नावाने बजेट किती आलं, गरजू गरीब लोकांसाठी आलेल्या योजना कोणाला दिल्या गेल्या हे कळत नाही, आपले प्रश्न, विकासाबाबतच्या सूचना आपण कुठे मांडायच्या हे कळत नाही, सारे निर्णय मोजकेच लोक घेत राहतात, सार्वजनिक कामांची आखणी करताना महिलांचा विचार घेतला जात नाही, शिक्षण–आरोग्य यासारख्या मूलभूत महत्त्वाच्या सुविधा दुर्लक्षित राहण्याची शक्यता वाढते, गावाच्या प्रश्नांवर गावाचा विचारविनिमय होत नाही, गावाच्या आणि पर्यायाने सर्वसामान्य गावकरी स्त्री–पुरुषांच्या विकासाला खीळ बसते. नियमानुसार ग्रामसभा व महिला सभा होत नसल्याने सदर आदिवासी भागात पेसा कायदा, पेसा निधी याविषयी व आदिवासी हक्कांविषयीची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे अधिकच बिकट होताना दिसते. आपल्या

हक्काचा पैसा आपल्यापर्यंत येतो का, पैसा कुठून येतो, कुठे जातो, योग्य कारणांसाठी व कायद्या–नियमांच्या चौकटीनुसार वापरला जातो का हे इथल्या लोकांना ठाऊक नाही. आदिवासी महिलांच्या बाबतीत तर अंधार अधिकच गडद आहे.

- महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातल्या एकंदर आणि विशेषत: आदिवासी भागातल्या ग्रामसभा, त्यांचं कामकाज, त्यातला नागरिकांचा हस्तक्षेप आणि ग्रामसभेतली महिलांची उपस्थिती या सगळ्याविषयीच अत्यंत चिंताजनक म्हणावी अशी परिस्थिती आहे. बहुतांश ठिकाणी ग्रामसभेपूर्वी महिला सभा होत नाही, हे सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट आहे. खरं तर महिला सभा ही गोष्ट, तिचं वेगळेपण व महत्त्व सर्वसामान्य महिलांपर्यंत अजून पोहोचलेलं नाही.
- एकंदरीनेच महिलांचा ग्रामप्रशासनातील सहभागही मर्यादित असल्याचं जाणवतं. एखाद्या सक्रिय सामाजिक संघटनेशी संबंधित महिलाच ग्रामसभेला नियमित हजेरी लावतात व आपली मतं मांडतात असं आढळतं. इतर महिलांच्या बाबतीत हे लक्षात घेण्यासारखं आहे की बचतगटाच्या अधिकार्यांनी सांगितल्यामुळे त्या ग्रामसभेला जातात. त्यांच्यापैकी बहुतेक कधीही ग्रामसभेत बोलत नाहीत. त्यापेक्षा महिला सरपंचांना व्यक्तिशः भेटून आपले मुद्दे मांडणं त्या अधिक पसंत करतात. ग्रामसभा ही काही महिलांनी त्यांची मतं मांडण्याची जागा नाही असं बहुतांश महिलांचं मत असल्याचं जाणवतं.
- कुठल्याही ग्रामपंचायतीने चोख काम करायचं तर ग्रामसभा सक्षम असायला पाहिजेत. त्यातला स्त्री–पुरुषांचा सहभाग व हस्तक्षेप वाढला पाहिजे. ग्रामसभेला ७३ व्या घटनादुरुस्तीने घटनात्मक दर्जा दिला आहे. ग्रामसभेच्या कायद्यात आणि शासन निर्णयात ग्रामसभेची जबाबदारी व अधिकार काय आहेत हे स्पष्ट केलं आहे. गावच्या ग्रामपंचायतीच्या कामकाजावर देखरेख ठेवणं आणि त्याला दिशा देण्याचं कामकाज ग्रामसभेकडून अपेक्षित आहे. पण याविषयी, पेसा कायद्याविषयी आणि त्याद्वारे प्राप्त झालेल्या अधिकारांविषयी योग्य व पुरेशी माहिती नसल्याने अजूनही बऱ्याच आदिवासी गावांत केवळ कागदावरच ग्रामसभा घेतल्या जातात. महिला सभांविषयी तर अगदी अपवादानेच लोकांना माहिती आहे. अर्थातच अशा सभा होण्याचं प्रमाणही अपवादात्मकच.
- महाराष्ट्रातल्या ज्या भागात जनचळवळीने पंचायतराज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी जाणीवपूर्वक काम केलं त्या भागात ग्रामसभा व महिला सभेने पंचायतीच्या कार्यालयात दाराआड चालणारा गावकारभार चावडीवर खुला करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे. त्यामुळे मागास जाती–जमाती व विशेषतः स्त्रियांमध्ये राजकीय सहभागाच्या प्रेरणा निर्माण झाल्याचे दिसतं. संस्था–संघटनांचे कार्यकर्ते, बचतगटाच्या सदस्यांनी लक्ष घातलं की महिलांची उपस्थिती वाढते व लक्ष दिलं नाही की संख्या कमी होते, त्यावरून त्यांचा प्रभाव जाणवतो. पण अजूनही महाराष्ट्राच्या बहुसंख्य गावात ग्रामसभा होत नाहीत, महिला सभांविषयी कुणाला ठाऊक नाही असं चित्र आहे. आदिवासी भागांची अवस्था या बाबतीत तर चिंताजनक म्हणावी अशीच आहे. त्यामुळे जनचळवळीच्या प्रयत्नात नव्याने जान ओतण्याची, हे प्रयत्न खोलवर नेण्याबरोबरच विस्तारण्याची गरज आजही आहे.

- स्थानिक लोकप्रशासनाचा प्रमुख आधार असलेली ग्रामसभा ही प्रक्रिया किंवा प्रणाली अमलात येऊन २५ वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. आदिवासी स्वशासनाच्या कायदेशीर तरतुदीला दोन दशकांहून अधिक काळ लोटला आहे. महिला सभेचा वटहुकून जारी झाल्याला १७ वर्षे उलटून गेली आहेत. यांच्या कायदेशीर चौकटी परिपक्व असल्या, तरी या संदर्भातल्या प्रक्रिया व प्रणाली अजूनही दुबळ्याच दिसतात. लोकजागृतीची वेगवेगळी माध्यमं वापरणं, प्रबोधन व प्रशिक्षणाची कास धरून पंचायतराज बळकटीकरणाचा सर्वंकष दृष्टिकोन अनुसरून ग्रामसभा व महिलासभेसाठी सक्षमीकरण करत राहणं म्हणूनच गरजेचं आहे. प्रशिक्षण दिलं तर मुली, बायका बोलायला, सहभाग घ्यायला, हस्तक्षेप करायला पुढे येतात असा महाराष्ट्रातला आजवरचा अनुभव आहे. म्हणूनच जबाबदार नागरिकत्वासाठी गावातील तरुण–तरुणींना संवेदनशील, कृतिशील बनवण्यावर लक्ष केंद्रित करायला हवं.

## २. कामकाजः पुढाकार, सहभाग, हस्तक्षेप

- यथायोग्य नियमांबरहुकूम महिला सभा होईल हे पाहणं सर्वात महत्त्वाचं. त्यानंतर टप्प्याटप्प्याने महिलांची उपस्थिती वाढवणं, वेळा व ठिकाण सोयीस्कर आहे ना यावर लक्ष ठेवणं, वेगवेगळी गावं–पाडे–तांड्यांवरून महिला येतील हे पाहणं, सरकारी अधिकारी उपस्थित रहावेत म्हणून प्रयत्न करणं, ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा आढावा तिथे घेतला जाणं, महिला सभेचा स्वतंत्र अजेंडा असणं, महिला सभेचं इतिवृत्त स्वतंत्रपणे नोंदलं जाणं, उपस्थितीची अधिकृत नोंद होणं, महिला सभेतील पारित ठराव जसेच्या तसे ग्रामसभेच्या पटलावर घेतले जातील, याची खातरजमा करणं अशा पद्धतीने पुढे जावं लागेल.
- सामान्यतः ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच स्वतःहून महिला सभेच्या आयोजनाबाबतची नोटीस काढत नाहीत असं आढळून येतं. ही टाळाटाळ थांबायला हवी. ग्रामसभा होत नसेल तर त्याबाबत प्रशासनाचा अंकुश असायला हवा. काही कारवाई व्हायला हवी. खरं तर कायद्यात कारवाईचा उल्लेख आहे, पण अंमलबजावणी शून्य होते. अशी कारवाई झाली नाही, तर महिला सभा न होण्याला पुष्टी मिळते. महिला सभा नाही झाली तरी चालतं, असा चुकीचा संदेश जातो. हे चित्र बदलायला हवं.
- ग्रामसभा व महिला सभा या आपल्यावर वरून लादलेल्या आहेत व आपले हक्क हिरावून घेणारी ही बाब आहे अशा नजरेतून गावाचा सरपंच व ग्रामसेवक त्याकडे बघत असतात. यामुळे ग्रामसभा व महिला सभा काहीवेळा चहापाणी वाटप करून किंवा कागदोपत्री पार पाडल्या की संपली आपली जबाबदारी अशी भूमिका महाराष्ट्रातले अनेक सरपंच व विशेषतः ग्रामसेवक घेताना दिसतात. खरं तर ग्रामसभेबाबत, ग्रामसभेतील महिलांच्या उपस्थितीबाबत आणि महिला सभेबाबत प्रचार व प्रसार करणं तसेच महिलांना या सभांना उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहन देण्याचं काम ग्रामसेवकाचं आहे. पण ते हे काम स्वतः करत नाहीत, आपल्या डोक्यावरची जबाबदारी इतरांवर लादतात. महिला सभेतील उपस्थिती, यशापयश, सभेतील गोंधळ इत्यादीबाबत महिलांनाच जाब विचारतात आणि त्यांनाच जबाबदार धरतात. याला छेद द्यायला हवा. ग्रामसेवकाला त्याच्या जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी कायद्याचा उपयोग करून घ्यायला हवा.

- अनेक ठिकाणी महिला सभेला ग्रामसेवक हजर राहत नाहीत. ग्रामसेवक व्यवस्थित माहिती देत नाहीत. महिला सभेत झालेली चर्चा व निर्णय ग्रामसभेत चर्चेला घेतले जात नाहीत. जरी चर्चेला आले तरी त्याकडे गांभीर्याने लक्ष दिलं जात नाही. विषय चर्चेला आला नाही तर त्याचं कारण नमूद करणारं लेखी उत्तर दिलं जात नाही. जर कुणी काही बोललं तर ग्रामसेवकाकडून ठराविक साच्यातलं उत्तर मिळतं – 'तुम्ही जे सांगताय ते नियमात बसत नाही' किंवा 'या योजनेखाली करता येत नाही'. यात तो कुठलेही संदर्भ देत नाही, पुरावे देत नाही. विषय चर्चेला आला तर त्यावर गांभीर्याने चर्चाही होत नाही आणि अंमलबजावणी होत नाही, असं या अभ्यासातून व इतर संस्था–संघटनांचे अभ्यास व कार्यकर्त्यांच्या निरीक्षणातून अधोरेखित होतं. म्हणूनच ग्रामसभेच्या संपूर्ण कामकाजाचं व्हिडिओ शूटिंग व्हायला हवं. ग्रामविकास विभागाने तसं सुचवलेलं आहे. याचा निर्णय शासकीय पातळीवर झालेला आहे, पण ते सक्तीचं नसल्याने त्याची अंमलबजावणी होत नाही. या अंमलबजावणीसाठी, नियमानुसार होणाऱ्या पारदर्शक ग्रामसभेसाठी रेटा लावला पाहिजे.
- जिथे ग्रामसभा, महिला सभांबाबत जागृती झाली आहे तिथे दारूच्या प्रश्नावर बायका उभ्या राहतायतं, पण त्या पलीकडचे प्रश्न पाहणं, त्याबद्दल बोलायला लागणं, प्रसंगी संघर्षासाठी उभं राहाणं हे होताना दिसत नाही. प्रबोधन व प्रशिक्षणातून हे घडू शकतं.
- ग्रामसभेतील वातावरण महिलांच्या सहभागासाठी पोषक नाही. ग्रामसभेत होणारा गोंधळ, आरडाओरड, असभ्य भाषेचा वापर आणि एकूणच पुरुषी वर्चस्वाचे वातावरण यामुळे महिला ग्रामसभेत जाणं टाळतात किंवा गेल्या तरी आपली मतं मांडणं टाळतात. एकीकडे या सामाजिक वातावरणात बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे आणि दुसरीकडे या वातावरणातही तग धरून राहण्याची हिंमत व कौशल्य महिलांमध्ये पेरण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.
- महिला सभेत झालेले ठराव हे ग्रामसभा व ग्रामपंचायतीवर बंधनकारक असावे याकरता नवा शासकीय अध्यादेश काढला जावा यासाठी प्रयत्न व्हावा. गावामध्ये विकासकामं करताना महिला सभेने सुचवलेल्या विकासकामांना प्राधान्यक्रम मिळावा अशा स्वरूपाचा कायदाच शासनाने करावा यासाठी प्रयत्न होणं आवश्यक आहे.
- महिला सभा होऊ नये, झाली तरी ती अर्थहीन ठरावी म्हणून प्रयत्न होतात. कोरम अभावी सभा बरखास्त होण्याचे प्रकारही काही कमी घडत नाहीत. खरंतर महिला सभेला कोरमचा कुठलाही नियम लागू नाही. त्यामुळे सामाजिक संस्था–संघटनांच्या प्रयत्नातून याबाबतचं महिला प्रशिक्षण झाल्यावर ही परिस्थिती काही ठिकाणी अधिक वेगाने आणि योग्य दिशेने बदलताना दिसू लागली आहे. महिला सभेमार्फत आलेला एखादा ठराव ग्रामसभा उगीचच फेटाळू शकत नाही. त्यासाठी रीतसर कारण देणं महिला सभेच्या परिपत्रकास अपेक्षित आहे. ठराव फेटाळण्याचं कारण लिखित स्वरूपातही महिला मागू शकतात. यासाठीही आता काही ठिकाणी प्रयत्न केला जात आहे. तो विस्तारायला हवा.
- महिला सभेच्या एकूण चौकटीत ग्रामसेवकाचं स्थान व भूमिका महत्त्वाची आहे. महिला सभेची नोटीस काढणं, अधिक संख्येने महिला या सभेस उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न करणं, त्यांना योग्य ती माहिती पुरवणं,

सभेतील प्रश्नांना जबाबदारीने उत्तरं देणं, ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा आढावा सादर करणं आणि महिला सभेने पारित केलेले सर्व ठराव ग्रामसभेत घेतले जातील हे पाहण्याची जबाबदारी ग्रामसेवकावर आहे. म्हणूनच एकीकडे ग्रामसेवकांना (स्त्री–पुरुष सर्व) याबाबतीत संवेदनशील व जबाबदार कसं बनवता येईल हे पहावं लागेल. दुसरीकडे महिला ग्रामसेवकांच्या नेमणुका होण्यासाठी रेटा लावला पाहिजे. महिला सभांचं इतिवृत्त तयार करण्याची जबाबदारी गावातील शिक्षिका, आरोग्यसेविका इत्यादी शासकीय–निमशासकीय महिला कर्मचाऱ्यावर सोपवण्यात यावी, अशी मागणी व्हायला हवी. ग्रामसेवकांच्या भरतीत महिलांसाठी २० टक्के आरक्षण आहे. अगदी जाणीवपूर्वक महिला ग्रामसेवकांना महिला सभांसाठी संवेदनशील बनवता येईल का, असाही प्रयत्न करून पाहायला हवा.

- ग्रामसभेच्या कामकाजात 'महिला सभेच्या ठरावांची नोंद घेणं, विचार करणं, त्यावर चर्चा करणं' याचा अंतर्भाव आहे. कुठल्याही ग्रामसभेत जसा आधीच्या ग्रामसभेचा अहवाल वाचून कायम केला जातो तसंच महिला सभेच्या ठरावांबाबतही करायचं असतं. पण हा विषय जाणीवपूर्वक टाळला जातो. महिला सभा, त्याबाबतच्या सूचना या सगळ्याला बगल दिली तरी चालतं, कारवाई होत नाही, अशी सध्या परिस्थिती आहे. जिथे संघटनांचा रेटा आहे, तिथे महिला सभांचा विषय लावून धरण्याचा प्रयत्न होतोय पण इतरत्र अजिबात नाही. कारवाईचा अभाव आणि लोकांमधे, महिलांमध्ये जाणीव नसणं अशी कारणं त्यामागे आहेत. या संदर्भाने सक्षम कायदा व कारवाईसाठी प्रयत्न रेटायला हवा.

- ग्रामसभा व महिला सभांची कास धरत गावपातळीवरचा महिलांचा सहभाग अधिक सक्रिय व अर्थपूर्ण होण्यासाठी मूलभूत सामाजिक रचनेमध्ये बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. ग्रामसभेचे अधिकार, महिला सभेचं महत्त्व, ग्रामपंचायतीची कामं, निरनिराळ्या समित्या, जबाबदार नागरिकत्व याविषयी जनजागृती करत असतांनाचं तरुण आणि तरुणींबरोबर लिंगभाव संवेदनशीलतेवर काम करणं महत्त्वाचं आहे. गावपातळीवर समाजामध्ये दिसून येणाऱ्या सत्ताकेंद्रांचा स्थानिक पातळीवर सखोल अभ्यास करून त्यातून वाट कशी काढायची याविषयी महिलांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे.

- महाराष्ट्रात आदिवासी क्षेत्रात कार्यरत असलेल्या काही कार्यकर्त्यांच्या मते अति–एनजीओकरण हाही प्रश्न बनून आता पुढे येतोय. निधी मिळवणं आणि वापरून दाखवणं या अजेंड्याखातर काही एनजीओ ग्रामपंचायतींचा उत्साह मारायला कारणीभूत ठरत आहेत. आम्ही शिकवतो, तुम्ही शिका; आम्ही देतो, तुम्ही घ्या, असं म्हणत त्या ग्रामपंचायतींना रेसिपियंटच्या भूमिकेत ढकलत आहेत. खरं तर आम्ही मेंटर आहोत, आम्ही प्रशिक्षण देऊन जाणार आहोत, अशीच एनजीओंची भूमिका असयाला हवी.

### ३. जनजागृतीः गरज आणि माध्यमं

- आदिवासी भागात ग्रासभेबाबत आणि महिला सभेबाबत लोकांना योग्य व पुरेशी माहिती नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी जनचळवळी आणि बिगरशासकीय संस्था–संघटनांनी वापरलेली जनजागृतीची माध्यमं तर वापरता येतीलच, शिवाय नव्या काळाला अनुसरून त्यात कुठली भर घालता येईल, हेही आवर्जून बघावे लागेल. तंत्रज्ञानाने आता हातात वेगवेगळी गॅजेट्स पोचवली आहेत. वॉट्सॅप, यूट्यूब, फेसबुकसारखी

समाजमाध्यमं आता आदिवासी स्त्री–पुरुषांपर्यंतही पोचली आहेत. हातात मोबाईल असणं ही गोष्ट नवखी न राहिल्यामुळे परस्परांना न भेटताही माहितीची देवाणघेवाण करण्यात आदिवासी लोकही सक्रिय झाल्याचं दिसतं. त्यामुळे एकीकडे सभा–बैठका–रॅली ही रूढ माध्यमे, वॉट्सॅप–फेसबुक–दृक्–श्राव्य चित्रफिती अशी नव्या तंत्रज्ञानातून उपलब्ध झालेली माध्यमं आणि उत्सव, लोकनृत्य, लोकगीतं, लोककथा अशी आदिवासी समुदायांची पारंपरिक सांस्कृतिक माध्यमं यांचा मेळ साधत जनजागृती करता येईल. त्यासाठी काही माध्यमं/उपक्रम वापरून पाहता येतील. ते असे –

- गावात सभा घेऊन तसंच पोस्टर प्रदर्शन, बैठक वा चर्चा अशा माध्यमातून ग्रामसभेतील महिलांचा सहभाग व महिला सभांचं महत्त्व सांगता येईल.
- छोट्या पुस्तिका तसेच दृक्–श्राव्य चित्रफिती यांच्या माध्यमातून महिलांना ग्रामसभा व महिला सभेच्या पंचायतराज व्यवस्थेतील महत्त्वाची माहिती देता येईल. स्वरूप, अधिकार, जबाबदारी या अनुषंघाने ग्रामसभा व महिला सभेविषयी जाणीवजागृती त्याद्वारे शक्य आहे.
- ग्रामसभेच्या आधी मुलांची रॅली काढून पोस्टर्सद्वारे, घोषणांद्वारे गावात माहिती देता येईल
- मुलांच्या अभिरूप ग्रामसभा कार्यक्रमाचं आयोजन करता येईल.
- घराच्या भिंतीवर ग्रामसभेच्या घोषणा रंगवाव्यात असा आग्रह धरता येईल.
- आठवडा बाजारातून जागृती सभा घेता येतील.
- बराच रेटा देऊनही महिला सभा होत नसतील तर प्रतिरूप महिला सभा घेण्यासाठी प्रयत्न करून पाहता येईल.
- जबाबदार नागरिकत्व म्हणजे काय याविषयी गावपातळीवर जागृती करता येईल.
- ग्रामपंचायतीतील समित्यांच्या कामांविषयी विशेषतः तरुण पिढीमध्ये जागृती करता येईल.
- गावपातळीवर महिला आणि पुरुषांसाठी लिंगभाव संवेदनशीलतेवर कार्यशाळा घेता येईल.
- महिला व पुरुषांचे बचत गट, युवा मंडळ, गणेश मंडळ, क्रिकेट मंडळ अशा गावपातळीवरील संघटनांचे ग्रामप्रशासनात सहभागी होण्यासाठी सक्षमीकरण करता येईल.
- गावातील व्यक्ती गावपातळीवरील निर्णयप्रक्रियेत सहभागी का होत नाहीत, त्यात कोणत्या बाबींचा अडथळा येतो, हे तपासून मार्ग काढण्यासाठी त्यांच्याबरोबर काम करता येईल. उदाहरणार्थ– उपयुक्त संकेतस्थळांची किंवा वेबसाइट्सची तसंच कार्यालयांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणं, इंटरनेट आधारित सेवांचा अधिकाधिक वापर करण्यासाठी महिला आणि पुरुषांना सक्षम करणं.
- ग्रामसभेबाबत सातत्याने आणि अनुभवातून शिकवणारे उद्बोधनपर कार्यक्रम गावकऱ्यांसाठी व्हायला हवेत. ग्रामसभा आणि महिला सभाविषयक कायद्याची माहिती वेगवेगळ्या माध्यमातून आणि सातत्याने दिली जायला हवी. किर्तन, भजन, बैठक, पोस्टर प्रदर्शनं, चित्रफिती अशी आणि इतर माध्यमं त्यासाठी वापरता येतील.

- आदिवासी संस्कृतीचा, परंपरेचा अविभाज्य भाग असलेली गाणी, नाच याद्वारे जनजागरण करता येईल. त्यासाठी नव्याने साहित्यनिर्मिती (लिखित व दृक्-श्राव्य) करणं गरजेचं आहे.
- ग्रामसभा, महिला सभा, पेसा कायदा याबाबतची नेमकी माहिती साध्या-सोप्या मराठीसोबतच ज्या-त्या ठिकाणच्या आदिवासी भाषांमध्येही लिहून वितरित केली पाहिजे. ज्या-त्या आदिवासी बोलीत यासंदर्भाने दृक्-श्राव्य चित्रफिती करणंही शक्य आहे.
- आता आदिवासी भागात हातोहाती मोबाईल आले आहेत. वॉट्सॅप, यूट्यूब आणि दिवसेंदिवस नव्याने उपलब्ध होत असलेली समाजमाध्यमं वापरून अधिक नेटाने, कमी वेळात व सोप्या पद्धतीने जाणीवजागृती कशी करता येईल, याविषयी विचारमंथन करून पावलं उचलायला हवीत.
- ग्रामपंचायत आणि ग्रामसभा याविषयी आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे जितकी पारदर्शकता वाढेल तितका ग्रामसभांमधला लोकसहभाग वाढायला नक्कीच मदत होईल.
- सर्वसामान्य स्त्रिया महिला सभेला जाणं टाळतात, असं आढळतं. मग आदिवासी भागाचं काय बोलावं? या पार्श्वभूमीवर, महिला सभेच्या बैठका ग्रामपंचायतीत न घेता त्या शाळा, समाजमंदिर इत्यादी महिलांच्या नियमितपणे येण्या-जाण्याच्या ठिकाणी भागात घेता येतील यासाठी प्रयत्न करून पाहायला हवा.
- आदिवासी समाजात शिक्षणाचं प्रमाण अतिशय कमी आणि गरिबीचं प्रमाण अतिशय जास्त आहे. त्यातच शेती आणि रोजगाराच्या बिकट होत चाललेल्या प्रश्नांमुळे पोटासाठी स्थलांतर करणाऱ्यांचं प्रमाणही दिवसागणिक वाढताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामसभा आणि महिला सभांमधली उपस्थिती वाढवण्यासाठी काही प्रयोग करून पहायला हवेत. त्यातील एक म्हणजे जत्रा-यात्रांच्या आगेमागे ग्रामसभा आणि महिला सभांचं आयोजन करणं. सामान्यतः जत्रा-यात्रा-उत्सव-सणांच्या निमित्ताने बहुसंख्य स्त्री-पुरुष आपापल्या गावात असण्याची शक्यता वाढते. पोटापाण्यासाठी स्थलांतर करणारे स्त्री-पुरुषही अशा दिवसांत आवर्जून गावी येण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच अशा निमित्तांच्या आगेमागे ग्रामसभा व महिला सभा घेण्यात याव्यात यासाठी प्रयत्न करता येतील. उपस्थिती वाढवण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो.
- विशेषत: आदिवासी भागात विविध तांड्यांवर, पाड्यांवर, वाड्या-वस्त्यांवर ग्रामसभा व महिला सभा होतील याबाबत कटाक्ष ठेवायला हवा. त्यासाठी आग्रह धरायला हवा. प्रत्यक्ष रेट्यासोबतच समाजमाध्यमांद्वारे दिलेल्या रेट्याचाही यासाठी उपयोग होऊ शकतो का, हे पहायला हवं.

## ४. बचतगटांचा आधार

- बचतगटांची उभारणी आणि त्याद्वारे महिलांचं स्वावलंबन, आर्थिक सक्षमीकरण होणं अपेक्षित आहे. पण त्याच बरोबरीने त्यांना सामाजिक-आर्थिक-राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेणं, ग्रामसभांची उपस्थिती वाढवणं, महिला सभांसाठी त्यांना उद्युक्त करणं, त्यातील हस्तक्षेपासाठी प्रोत्साहन देणं असंही बचतगटांच्या जाळ्यामार्फत व्हायला हवं असंही गृहीत आहे. शासनाच्या पातळीवर बचतगटांचा कार्यक्रम असा बहुउद्देशीय स्वरूपात राबवला जातो आणि सरकारचा कार्यक्रम असल्याने त्यांची संख्याही वाढते आहे. जिथे बचत गट

सक्रिय आहेत तिथे महिला सभेची नोटिस निघाली की बचत गटांची एकत्रित बैठक ठरते. त्या बैठकीत सर्व बचतगटांनी मिळून महिला सभेत कुठले विषय चर्चेला घ्यायचे हे ठरवणं अपेक्षित आहे. जिथे जागृती झाली आहे तिथे संस्था, संघटना, चळवळीशी संबंधित बचत गट आणि महिला मंडळाच्या महिला ग्रामसभांना हजर असतात व महिला सभा होण्यासाठी रेटा लावतात. त्यातील महिलांची उपस्थिती वाढवण्यासाठी प्रयत्न करतात असं चित्र दिसतं. ज्याठिकाणी बचतगट हे उत्प्रेरक (catalyst) बनून कार्यरत झाले आहेत त्या भागातील हे एक सकारात्मक चिन्ह आहे. बचतगटांना मजबुती देण्याचं काम अधिक नेटाने करण्याची गरज यातून सूचित होते. बचतगटांना पूर्वी बचत, कर्ज असा अजेंडा होता. आता दुसरा कुठला अजेंडाच राहिलेला नाही. त्यामुळे बचतगटांना आता नवा अजेंडा मिळाला आहे तो ग्रामसभेसाठी महिलांना नेण्याचा, महिला सभा घडवण्याचा, महिला सभेतले विषय/ठराव ग्रामसभेपर्यंत नेण्याचा. हा अजेंडा वास्तवात कसा आणायचा हे पहायला हवं.

- महिला मंडळ व बचतगटात ग्रामसभेची माहिती देणं, तयारी करून घेणं, विषय कोणते मांडायचे याची चर्चा करणं गरजेचं आहे.
- महिलांच्या सोयीच्या वेळी ग्रामसभा झाली पाहिजे हा आग्रह महिलांनी लावून धरावा, यासाठी बचतगटांतून प्रोत्साहन देता येईल.
- ग्रामसभेची नोटीस आपल्या बचत गटाच्या नावाने यावी अशी मागणी करता येईल.
- ग्रामसभेच्या, महिला सभेच्या संदर्भाने ओव्या, लोकगीतांच्या स्पर्धा बचतगटांमार्फत घेता येतील.
- गावपातळीवर आरोग्यसेविकेचं असलेलं महत्त्वपूर्ण स्थान व तिची बहुपेडी भूमिका लक्षात घेऊन महिला सभांसाठी आरोग्यसेविकांना विशेष निमंत्रण देऊन बोलवण्यात यावं, असं महिला सभेच्या तरतुदीत सुचवलं आहे. त्यादृष्टीने बचतगटांना त्याची जाणीव करून देणं, त्यासाठी उद्युक्त करणं आणि दुसरीकडे आरोग्यसेविकांनीही आपणहून पुढाकार घ्यावा, महिला सभेत सहभागी व्हावं, हस्तक्षेप करावा यासाठी प्रयत्न करायला हवेत. बचतगट व आरोग्यसेविकांच्या संघटनांच्या सहकार्याने या संदर्भातील जाणीवजागृती, प्रबोधन–प्रशिक्षण कार्यक्रम राबवता येतात का, हे पहायला हवं.
- महिला सभांद्वारे गावाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेत सहभाग घेता येतो, सकारात्मक हस्तक्षेप करता येतो आणि बदल घडवता येतो हे अधोरेखित करणाऱ्या यशकथा शोधून लिखित व दृक्–श्राव्य माध्यमांद्वारे विशेषतः बचतगट व महिला मंडळांच्या माध्यमातून अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करता येईल. वॉट्सॅप ग्रुप्स, फेसबुक पेजेस आणि यूट्यूब चॅनल्सचाही वापर यासाठी करून पाहता येऊ शकतो.

❑ ❑ ❑

# केस स्टोरीज

सदर अभ्यासप्रकल्प क्षेत्रात जाणीवजागृती व हस्तक्षेपास बराच मोठा वाव आहे. ग्रामसभा व महिला सभांबाबत कामाची उभारणी या भागात होणे गरजेचे आहे आणि शक्यही आहे. पण याविषयी इथला अंधार दाट असल्याने यशकथा/उल्लेखनीय केस स्टोरीज या भागात आढळल्या नाहीत. मात्र पुढे जाण्याच्या दृष्टीने प्रोत्साहक व मार्गदर्शक ठरतील अशी काही इतर ठिकाणची आशादायी किरणं काही पुस्तिकांमध्ये व इंटरनेटवर उपलब्ध आहेत. त्यातील काहींची ही नोंद.

**अ) बिगरशासकीय रेटा**

महिला सभेचा शासकीय अध्यादेश निघाल्यानंतर महिला सभांची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी महिला राजसत्ता आंदोलनाने २००५ साली महाराष्ट्रातल्या ११ ग्रामपंचायतींचा अभ्यास केला होता. या ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात महिला राजसत्ता आंदोलनाचं काम चालू होतं. अभ्यासात त्यांना असं दिसलं की काही ठिकाणी महिला जेव्हा 'स्वतंत्र महिला सभा घ्या' असं म्हणत ग्रामसेवकांना भेटल्या, तेव्हा त्यांना उडवाउडवीची उत्तरं मिळाली होती. एका गावात महिला स्वतःहून महिला सभेला जमल्या असताना गावच्या सरपंच बाईच्या नवऱ्याने या महिलांना पंचायतीच्या कार्यालयातून हाकलून दिलं होतं. पण संस्था-संघटनांचा रेटा बदल घडवू शकतो हेही अभ्यासात दिसून आलं. महिला राजसत्ता आंदोलनाच्या कार्यकर्ता महिलांच्या रेट्यामुळे या अकरापैकी नऊ गावात ग्रामसभेपूर्वी आता महिला सभा घेण्यात येते. महिला सभेची नोटीस काढण्यात येते. दवंडीही देण्यात येते. परंतु केवळ दवंडी व नोटिशीने महिला या सभेला जमत नाहीत. त्यासाठी काही ठिकाणी बचत गट व महिला राजसत्ता आंदोलनाच्या कार्यकर्त्या दोन-तीन दिवसांनंतर गावात होणाऱ्या महिला सभेविषयी व त्यात मांडायच्या प्रश्नांविषयी चर्चा करतात. नंतर महिला सभेला जातात. अकरापैकी नऊ

ग्रामपंचायतींच्या महिला सभांत सहभागी होणाऱ्या ९० ते ९५ टक्के महिला या महिला राज्यसत्ता आंदोलन व बचत गटांशी संबंधित आहेत. पंचायतराज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी केलेल्या सामाजिक प्रयत्नांना यश लाभतं हे त्यातून दिसून येतं.

(संदर्भः महाराष्ट्रातील महिला सभाः नवा सत्तासंकल्प, महिला राजसत्ता आंदोलन)

**ब) 'बायकांच्या'प्रश्नांच्या पलीकडे (शहापूर, जि. ठाणे)**

पॉप्युलेशन फर्स्ट या बिगर शासकीय संस्थेने 'AMCHI' या उपक्रमाद्वारे ग्रामसभेतला महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रशिक्षणाच्या माध्यमातून काही प्रयत्न केले. तसंच त्यांच्या कार्यक्षेत्रात ग्रामसभेआधी महिला सभा व्हव्यात यासाठीही प्रयत्न केले. प्रोजेक्ट ठाणे या अंतर्गत शहापूरमध्ये ११ गावात बचतगट व युवा संस्था–संघटनांच्या कार्यकर्त्यांना/सदस्यांना कार्यरत करून महिला सभांविषयी जनजागृती करण्यात यश मिळाल्याची माहिती त्यांनी इंटरनेटवर दिली आहे. दारू, पाणी याबरोबरच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमीसारख्या विविध महत्त्वाच्या योजना तसंच गावपातळीवरील वनहक्क समितीकडे आलेल्या दाव्यांची माहिती देण्यावर, त्याविषयी महिलासभांमध्ये चर्चा करण्यावर या संस्थेने भर दिला आहे. या भागात २००९ पासून नियमितपणे महिला सभा घेण्यात आणि ग्रामसभेतली महिलांची भागीदारी वाढवण्यात यश येत असल्याचाही त्यात उल्लेख आहे. एवढंच नाही तर ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत सदस्यांकडून विविध बाबींची माहिती मिळवण्यात, त्यांना प्रश्न विचारण्यात स्थानिक सर्वसामान्य महिला पुढे येऊ लागल्या आहेत असंही या संस्थेचं निरीक्षण आहे. सामान्यतः महिला दारू, पाणी किंवा बालकल्याण या विषयांच्या पलीकडे विचार करत नाहीत, असं बोललं जात असताना महिलांनी रोजगार हमी, वनहक्क याविषयीही माहिती घेणं व प्रश्न विचारणं विशेष उल्लेखनीय ठरतं. सातत्यपूर्ण प्रबोधन–प्रशिक्षणातून बिगरशासकीय संस्था हा बदल घडवू शकतात, असं पॉप्युलेशन फर्स्टच्या अभ्यासातून दिसून आलं आहे.

(संदर्भ – 'पॉप्युलेशन फर्स्ट'ची वेबसाईट)

**क) कोरमच्या प्रश्नाला छेद (रेठरे धरण, जि. सांगली)**

महिला सभेबद्दलचा शासकीय अध्यादेश निघाल्यानंतर रेठरे धरण, जि. सांगली इथल्या महिला राजसत्ता आंदोलनाशी संबंधित महिलांनी सरपंच व ग्रामसेवकाला स्वतंत्र महिला सभा घेण्यास भाग पाडलं. गावात दवंडी दिली, गटाच्या बैठकीत सांगितलं, पुष्कळ प्रचार केला पण महिला सभेस केवळ २५–३० महिला जमल्या. तेव्हा सरपंच म्हणाले, ''कोरमअभावी तुम्ही 'आमची' ग्रामसभा तहकूब करायला सांगता, मग आता 'तुमच्या' सभेला कोरम कुठे आहे? त्यामुळे आता ही महिला सभा तहकूब करा.''

ती महिला सभा तहकूब करण्यात आली व पुढची महिला सभा सात दिवसांनी घ्यायचं ठरलं. महिलांनी खूप कष्ट केले, प्रचार केला. १२५ महिला सभेला उपस्थित राहिल्या. कोरम पूर्ण झाला, सभा उत्साहात पार पडली. दोन–तीन तास सभा चालली. महिला प्रश्नांबाबत खुलेपणाने व पुढाकार घेऊन बोलल्या.

खरं तर, महिला सभेला गणपूर्तीची किंवा कोरमची कुठलीही अट नाही. ते नंतर अभ्यास केल्यावर या महिलांच्या लक्षात आलं. आता केवळ याच गावातल्या महिला नाहीत, तर महाराष्ट्रात इतरत्रही जिथे जिथे सामाजिक संस्था–संघटनांशी जोडून असलेल्या महिला महिला सभेसाठी कार्यरत आहेत, त्या सरपंच–ग्रामसेवक–शासकीय अधिकाऱ्याच्या अशा कुणाच्याही सुपीक डोक्यातून कोरमचा प्रश्न निघाला, तरी महिला सभा तहकूब होऊ देत नाहीत.

(संदर्भः महाराष्ट्रातील महिला सभाः नवा सत्तासंकल्प, महिला राजसत्ता आंदोलन)

**ड) महिला सभेला बचतगटांचा आधार (पालघर)**

पालघर जिल्ह्यातील एक आदिवासी गाव. या गावात पूर्वी पी. व्ही. मंडलिक ट्रस्टने प्रशिक्षण कार्यशाळा घेतल्या होत्या. गावात एका मित्रसंस्थेचं दीर्घ काळापासून काम सुरू आहे. तसंच या गावात काम करत असलेल्या ग्राममित्राला ट्रस्टचं मार्गदर्शन लाभतं आहे. या गावातील बहुतांश महिला सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रबोधनामुळे संघटित आहेत. त्या बचतगटाच्या सदस्य आहेत किंवा आदिवासींच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या संघटनेच्या सक्रिय सदस्य आहेत. या गावातील बचतगटाच्या सदस्य, सरकारी कर्मचारी (उदाहरणार्थ, अंगणवाडी कार्यकर्त्या, आशा इत्यादी), तसेच आदिवासींसाठी काम करणाऱ्या संघटनेच्या सदस्य महिला ग्रामसभेला सातत्याने उपस्थित असतात व त्या आपली मतं मोकळेपणाने मांडतात. या व्यतिरिक्त ज्या महिलांच्या अर्जांवर चर्चा होणार असते त्या किंवा ज्यांना आपली नावे एखाद्या योजनेसाठी नोंदवायची असतात अशा महिला सभेला हजर असतात. जर एखाद्या योजनेच्या अंमलबजावणीत दिरंगाई झाली तर महिलाही ग्रामसभेत यासंबंधी प्रश्न विचारतात. सामाजिक संस्था–संघटना आणि बचतगटाशी जोडलेल्या सदस्य महिला यांच्या माध्यमातून ग्रामसभेतील महिलांची उपस्थिती वाढवणं, महिलासभा व्हावी म्हणून रेटा लावणं, सर्वसामान्य महिला महिलासभेत बोलती होईल हे पाहणं आणि शक्य तेव्हा सर्वसामान्य महिलेने आपल्या प्रश्नांबद्दल आवाज उठवणं शक्य आहे, असा पी. व्ही. मंडलिक ट्रस्टचा अनुभव आहे.

(संदर्भ – पंचायत भारती, डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट)

**इ) प्रतिरूप महिला सभा (अंजनगाव बारी, जि. अमरावती)**

या गावात महिला सभा होत नसल्याबद्दल महिला राजसत्ता आंदोलनाचे कार्यकर्ते व बचतगटाच्या महिलांनी ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषद ग्रामविकास मंत्रालयापर्यंत वेळोवेळी तक्रारी केल्या. ग्रामसभेपूर्वी महिला सभा

घेण्यात यावी अशी मागणी केली. तरीही ग्रामपंचायत महिला सभा आयोजित करत नाही म्हणून या कार्यकर्त्यांनी गावात प्रतिरूप महिला सभा सुरू केली. एक अनुकरणीय प्रयोग म्हणून त्याची आजही दखल घेतली जाते.

(संदर्भः महाराष्ट्रातील महिला सभाः नवा सत्तासंकल्प, महिला राजसत्ता आंदोलन)

**फ) महिला सभा (नवी उमेद – अमित कुलकर्णी)**

सर्वसामान्य महिलेला महिला सभेविषयी काहीच माहिती नसते. त्यात आदिवासी महिला या सगळ्या विषयांपासून कोसो दूर. किनवटच्या आदिवासी भागातही अशीच परिस्थिती आहे. शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक–आर्थिक–राजकीय क्षेत्रातल्या अनुभवाची कमतरता यामुळे इथल्या महिलांना महिला सभेविषयी माहिती नाही, आणि त्या कुठल्या बाबतीत काही बोलतही नाहीत. पण नवी उमेद या संस्थेच्या प्रयत्नांतून यासंदर्भाने जाणीवजागृतीला सुरुवात झाली. या संस्थेशी जोडल्या गेलेल्या अनिता ताईंना महिला सभा आणि त्याचं महत्त्व याविषयी कळल्यानंतर त्यांनी स्वतःच्याच गावाच्या ग्रामसेविकाला महिला सभा घेण्याविषयी सुचवले. त्यावर महिला सभेला कुणी महिला येणार नाहीत, असे निरुस्ताही उत्तर ग्रामसेविकेकडून मिळाले. आग्रह धरल्यानंतर तुम्हीच बोलवा महिला सभा, पाच–पंचवीस बायका आल्या तरी पुरे, असेही ग्रामसेविकेने वरून ऐकवले. त्यावर अनिताताईंनी खरोखरच मनावर घेऊन महिलासभेविषयी महिलांशी बोलायला सुरुवात केली. महिला सभेचं आयोजन केलं आणि त्या सभेला अडीचशेहून जास्त महिला उपस्थित राहिल्या. इतक्या बायका आल्या म्हटल्यावर गावातले पुरुषही सभेभोवती गोळा झाले. या महिला सभेमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली, ठराव झाले. सामान्यतः महिला आणि बालकल्याणच्या दहा टक्के निधीवापरापलीकडे बायकांच्या चर्चेची झेप जात नाही, असं म्हटलं जातं. पण या पहिल्याच सभेत आदिवासी महिलांनी विविध आदिवासी कल्याणाच्या योजनांची माहिती घेतलीच, शिवाय थेट रोजगार हमीच्या कामांचीही चर्चा केली. रोजगार हमीतून कोणती कामे घेतली पाहिजेत याबाबत ठोस मागणी केली. शोषखड्डे, शौचालयांचा विषयही चर्चेला घेतला. ठराव केले. या साऱ्या चर्चेचे रीतसर इतिवृत्त तयार केले. माहितीचा प्रचार–प्रसार आणि स्वयंसेवी मार्गदर्शन यातून बदल घडू शकतो, याचंच हे चिन्ह आहे.

अर्थात, महिला सभेतील ठराव व इतिवृत्त ग्रामसेविकेने ग्रामसभेच्या पटलावर ठेवले नाही, ही गोष्ट अलाहिदा.

❑ ❑ ❑

# परिशिष्ट

**1. Maharashtra Ordinance Number 12 of 2002**

An ordinance further to amend the Bombay Village Panchayats Act 1958 issued by Rural Development and Water Conservation Department on 16th October 2002.

This Ordinance is called as the Mumbai Gram Panchayat Amendment Ordinance 2002 and will come in force immediately henceforth.

In article 7 of the Mumbai Gram Panchayat Act 1958 sub article one will read as

Replace 4 Sabha has by 6 Sabha add there should not be a gap of more than three months between two consecutive Gram Sabha as in case Sarpanch or Deputy Sarpanch fails to call the gram sabha meeting the secretary would do so on their behalf.

Replace sub article 3 by following text unless specified the first Gram Sabha meeting of the Year shall be presided by the sarpanch and in his absence by the deputy Sarpanch for rest of the gram sabha meeting anyone from among present members selected by consensus can decide the meeting.

Following additional sub articles will be included after sub article 4

**Prior to every usual Gram Sabha meeting a meeting of women members of Gram Sabha shall be organised.**

In order to maintain discipline the gram sabha shall monitor the functioning of Government and semi Government and staff especially with regards to their regular attendance and sanctioning of the leaves the Gram Sabha is empowered to do their annual evaluation and bring its observation to the notice of senior officers

In case of Gram Sabha observes in irregular realities of duties amongst the staff it will report it to the Block Development Officer in receipt of such cases the BDO will take action within 3 months and also the gram panchayat in their regularly meetings in case of BDO fails to take any action within 3 months the complaint will be forwarded the sea of the Zilla Parishad whose decision would be final

The gram sabha sessions select beneficiaries for government schemes by the state and Central Government normally the date time and venue of the gram sabha shall be finalized in each Gram Sabha unless allowed by the gram sabha all the government and semi Government and panchayat staff at the village level should be present for the gram sabha the minutes of the gram sabha shall be recorded by the secretary or in his absence by the Village Development Officer in case both are absent The sarpanch can ask the school teacher Talati anganwadi teacher or any Panchayat staff to record minutes following additions will take place after article 8 s of the Mumbai on Gram Panchayat Act 1958. 8 a the rights and duties of the gram sabha each Gram Sabha is empowered to give its approval to social and economic development programs prior to its implementation approving the budget for the gram panchayat for execution of developmental projects presenting excuse before the gram panchayat on proposals related to acquisition of village land for any government rule or any other projects.

Following sub articles shall be added after some articles 660 of the article 45 in the Mumbai Gram Panchayat Act 1958

6 b gram panchayat shall seek the permission of the gram sabha for making expenditure on any developmental projects 6 before acquisition of any Panchayat land the concerned government department shall consult with the gram panchayat the gram panchayat will take into consideration the views of the gram sabha before giving its decision on such acquisitions

**Mr. Mohammed Faisal**
The Governor of Maharashtra
Mumbai, 12th October 2002.

------

**2. Resolution by Department of Rural Development**

*This letter issued by R. R. Patil Minister for Rural Development Water Supply and Sanitation on 8th January 2003 is addressed to elected representatives of the state legislature and informed them about the GR on Mahila Gram Sabha*

According to the recent amendment in the Mumbai Gram Panchayat Act 1958 organising Mahila Gram Sabha prior to every village Gram Sabha is mandatory the government has several times initiated legal and policy measures to enhance women's participation in the village level decision making processes in fact Maharashtra remains the first state to initiate special programs in at women's development these are over hundred in number as well as to formulate a comprehensive policy for women and to establish a special department for women in the state secretariat.

Implementation of the 33% reservation for women in the local government bodies is presenting positive results as far as women's development is concerned

How many were the women's participation is yet not been fully exploride to bring in qualitative changes women are called for the village Gram Sabha meetings the participate in large numbers get their views and suggestions are hardly ever received due attention it needs to be admitted that main hardly do anything to create an enabling environment for women women's presence in gram sabha should not be equated to their participation there is a need for conscious efforts to enhance women's participation in gram sabha as well as in other decision making processes it is essential to make women aware of their rights and build their capacity to exercise these rights they are also required to come together to oppose any violation and separation of their right by men in order to strengthen women's role in local decision making and to facilitate their effective participation in the village Gram Sabha the special provision for Mahila Gram Sabha is made by recent legal amendment the provision will certainly benefit women who constituted half the population and also leave to the effective participation in the development process the state government has decided to organise Mahila Gram Sabha in all the villages on 26th January 2003 the Governor gender for this gram sabha we include identify and discuss priority development needs in the village discuss the gaps in the program for execution of the drinking water and sanitation schemes review of self help groups with respect to structure and nature of work decision of the women's empowerment program you are requested to participate in the Mahila Gram Sabha in any suitable village in your constituency and provide your valued guidance.

**R R Patil.**

# स्त्रोत आणि संदर्भ


- पंचायतराज मार्गदर्शिका, दुसरी आवृत्ती, अफार्म प्रकाशन
- ग्रामसभा आणि ग्रामपंचायतीच्या सभा, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन प्रकाशन
- पंचायत भारती नियतकालिक, डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट प्रकाशन
- महाराष्ट्रातील महिला ग्रामसभा– नवा सत्ता संकल्प, महिला राजसत्ता आंदोलन प्रकाशन
- पंचायतराज संकल्पना आणि वास्तव– नवनीत शहा, डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट प्रकाशन
- महिला ग्रामसभा– रियालिटी, महिला राजसत्ता आंदोलन प्रकाशन
- लोकशाहीचे बलस्थान व गावाचे व्यासपीठ : ग्रामसभा, वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट
- ग्रामपंचायतीची निर्मिती: रचना आणि निवडणुका, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशनचे प्रकाशन
- ग्रामसभा गौरव अभियान, महिला राजसत्ता आंदोलन प्रकाशन
- नवी ग्रामपंचायत, राज्य साधन केंद्राचे प्रकाशन
- विकिपीडिया आणि विकासपीडिया
- मराठी विश्वकोश



जामुंडे येथील आदिवासी महिला



वासाळी येथील महिला सभा



आंबेवाडी येथील महिलासभा

# इकोनेटची ओळख

इकोनेट ही संस्था पर्यावरण मुद्द्यावर वेगवेगळ्या स्थानिक संस्थांबरोबर काम करते. या संस्थेचे मुख्यता दोन दृष्टीकोन आहेत.

Supporting Network, Organization for Empowerment (SNE)

ह्या दृष्टीकोनातून इकोनेट संस्था महाराष्ट्रातील संस्थांबरोबर जंगल व आदिवासी - विशेष आदिवासी जमाती, भटक्या जाती-जमाती यांच्या मुद्द्यांवर काम करते. या गटाची भूमिका मानव व संस्था विकास पाठबळ देणे असे आहेत.


इकोनेट

गुलमोहर रिट्रीट, R-II, S.No. १४-६, फातीमानगर, वानवडी,
पुणे : ४११ ०४०, महाराष्ट्र. फोन : (+९१) ७४२००२७७५५,
Email: econet.pune@gmail.com, Website: www.econetindia.org